

रघुवीर सामंत

रिजात प्रकाशन संस्थेनें चालविलेलें
नवयुगीन महाराष्ट्र – रसिकांचें

स्वस्त, सुंदर, सुटसुटीत, सदभिरुचि–पोषक
वैशिष्ट्यपूर्ण मासिक मुखपत्र.

## ज्योति

संपादक :— रघुवीर सामंत, बी. ए. बी. टी.
ट. ह. सह. वा. वर्गणी २ रु; नमुना अंक मागवा

? ? ? ?

आम्हाला जगायचं आहे

? ? ? ? ?

पारिजात प्रकाशन
च्या पुढील प्रकाशनांकडे
लक्ष ठेवा.

काहूर
कादंबरी

जिवंत माणूस
कादंबरी

रघुविर सामंत

पर्ल काढा

घेतल्यानें रोजच्या तक्रारी साफ बंद

Moderate & Best

P. SHANTARAM : Tailor

Opp. Portuguese Church Girgaum, BOMBAY

कमींत कमी खर्चांत कोणतेंहि औषध

माधव एजन्सी

मोहन बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

Cover block by

VENUS PROCESS WORKS

358 Girgaum Road, Bombay, 2




+

शालेय

व

बालवाङ्मय

+

लौकरच प्रकाशांत येईल.

ारिजात
नव
स्वस्त, सुंद
वैशि
संपादक :—
ट. ह. सह.
?
आम्ह
?
काह्
कादं

पारिजात
प्रकाशन

# ता रां ग ण

(चित्रबंधसंग्रह)

२४ डिसेंबर १९४०

रघुवीर सामंत

पुष्प ९ वें

बाळकृष्ण सामंत यांनीं
'पारिजात प्रकाशन'साठीं
७ मॅथ्यू रोड, मुंबई ४
येथें प्रसिद्ध केलें.

[सर्व प्रकारचे हक्क लेखकाच्या स्वाधीन]

—: मूल्य १ रुपया :—

२४ डिसेंबर १९४०

[लेखनकाल — ९-९-४० ते २१-९-४०]

बा. द. सातोस्कर बी. ए. यांनीं
सागर साहित्य छापखाना
त्रिभुवन रोड, मुंबई ४
येथें मुद्रित केलें.

मी शिक्षकाच्या भूमिकेंत वावरतांना
माझ्यासमोर विकसित होत असलेल्या
माझ्या आवडत्या, उत्साही, गोड विद्यार्थी – विद्यार्थिनींस

## श्री. रघुवीर सामंत, बी. ए. बी. टी.

### यांची प्रकाशित पुस्तकें

१ हृदय ( लघुकथा व शब्दचित्रें )
२ वाळूंतील पाउलें ( अभिनव लघुकथा )
३ सुरंगीची वेणी ( रुपांतरित लघुकथा )
४ प्रवासांतील सोबती ( कादंबरी )
५ अभ्रपटल ( कादंबरी )
६ आकाशगंगा ( कादंबरी )
७ पणत्या ( लघुनिबंध )
८ आजचीं गाणीं ( कविता )
९ मासलेवाईक प्राणी ( अभिनव स्वभावचित्रें )
१० तारांगण ( 'चित्रबंध' संग्रह )

---

### –: छपाईस तयार :–

११ काहूर ( कादंबरी )
१२ रजःकण ( लघुनिबंध )

---

# तारांगण

तारा १ : : : गरीबीचें सौजन्य

"घ्या ना चहा! निवेल मग.." विनायक मास्तर अंग चोरून गप्प गप्पच खुर्चीवर बसलेले पाहून तात्या हलुवार शब्दांत त्यांना म्हणाले.

विनायक मास्तरांचं धोतर मळलेलं विरलेलं व दोन तीन ठिकाणीं शिवलेलं होतं. कोट अंगाला आखुडला होता. सदऱ्याच्या गुंड्या वर-खालीं झाल्या होत्या; नी रंग गेलेल्या टोपीला सत्राशेंसाठ पोंचे आले होते. कानाजवळ हळूच लोंबून त्यांच्याशी गुजगोष्टी करणारं टोपीच्या आंतलं चामडं किंचित् ओशाळ्यामनानें आंत ढकलून, त्यांनीं आपल्या काळ्याभोर भरघोस मिशांतून आपली स्वच्छ दंतपंक्ति क्षणभर दाखवली न दाखवलीसं केलं नी कप हातीं घेत ते हळूंच अस्पष्ट पुटपुटले "हो घेतों कीं..."

चहा पितापितां मास्तर आपल्या सभोंवतीं गोंधळल्या नजरेनें पहात कसलासा विचार करीत होते. शेवटीं रिकामा कप खुर्चीखालीं ठेवून ते पुन्हा पूर्वीसारखेच खुर्चीवर अंग चोरून बसले व आपले हात कोंपरांत दुमडून त्यांनीं ते छातीशीं घडी करून ठेवले.

"सुटी वाटतं आतां ?–" तात्या सुपारीचं खांड पुढें करून म्हणाले; त्यांना बोलणं सुरूं करायचं होतं.

"आमच्या खेडवळ शाळेला हो कसली आली सुखाची सुटी ?–" मास्तर आपल्या मिशा धोतरानें पुसून हंसल्यासारखं करीत म्हणाले, "आम्हीच आपली घेतों झालं सुटी! ग्रामपंचायतीनें पंधरा दिवसांत दिवाळी संपवा म्हटलंय्! माझ्या तीन शिकवण्याहि सध्या बंद झाल्यात्!"

"हं हं!–" तात्या बोलले खरं;.. पण विनायक मास्तर आज असे खेड्याहून पदरचे दीडदोन रुपये खर्चून मुंबईला एकाएकीं का आले असावेत तें काहीं त्यांना समजत नव्हतं!–

"श्वशुराचं कोंकणाहून पत्र आलंय्.." मास्तर तेवढ्यांत संकोचानें म्हणाले, "नी माझ्या घरांत दीड महिन्यावर बाळंतपण आलंय्...बरं बोटी तर सध्यां लढाईमुळं बंद.. तेव्हां..."

आणि इतकंच अर्धवट सोडून मास्तर संकोचानें थांबले. तात्या त्यांच्याकडे कुतूहलानें, गांभीर्यानें नी आपुलकीनें पहात राहिले. आणि मग जरा सहानुभूतीच्या हळुवार शब्दांत म्हणाले, "मग माझ्याकडे कांहीं विशेष काम होतं कां मास्तर? सांगा ना! संकोच नको! मी कांहीं परका नाहीं तुम्हाला!.."

मास्तरांचे डोळे किंचित् काळ चमकले. पण मग दुसऱ्याक्षणीं त्यांत जन्मजात दैन्य ओथंबलं! आणि शेवटीं अत्यंत हलक्या आवाजांत पुटपुटतच ते म्हणाले, "मला,.. तात्या, तुमच्याकडून थोडशी मदत पाहिजे आहे!.. एक पंचवीस रुपये हातउसने दिलेत मला आज,...तर दिवाळीनंतरचा पगार नी शिकवण्यांचं मिळून..."

त्या उद्गारांनीं तात्या केवढ्यानें तरी दचकले! पण त्यांनीं तें शक्य तितकं सारं आंतल्या आंत दडपलं आणि खुर्चीवरून उठत मास्तरांनां म्हणाले, "वाः वाः विनायक मास्तर...तुम्ही तर फारंच बुवा...अगदीं हे ऽऽ–!"

मग तात्या पटकन् कोंपऱ्यांत गेले; त्यांनीं कपाटांतून तीन नोटा



काढल्या नी त्या विनायकमास्तरांपुढें करून ते म्हणाले,... "सुटे नाहीं आहेत, मास्तर! तुम्ही तीन्ही ठेवा सध्यां!.. मग बघूं आपण सारं...!"

मास्तर क्षणभरच घुटमळले थोडे; मग त्यांनीं त्या तीन्ही नोटा आपल्या खिशांतील जाळ्याच्या बटव्यांत कोंबल्या. आणि थोडावेळ किंचित् आर्द्र डोळ्यांनी तात्यांकडे पाहून उभे रहात पुन्हा आपल्याशींच पुटपुटल्यासारख्या आवाजानें ते म्हणाले, "मग मी घेऊं तात्या, आपली रजा,.. आतां?"

तात्याहि हळूंच पाठमोऱ्या फिरणाऱ्या मास्तरांच्या खांद्याला स्नेहाळ हातानें स्पर्श करून हंसत म्हणाले, "या या! कोंकणांतून येतानां काजूबिजू आणा! आणि मुगाचे दगडी लाडूसुद्धां!"...

मोकळ्या मनानें मास्तरहि हंसले व तात्यांच्या ब्लॉकमधून मंद पावलं टाकत बाहेर पडले.

खालीं उतरून लांब जात चाललेल्या त्या गरीब मूर्तीकडे तात्या कितीतरी वेळ पहात होते ग्यॅलरींतून!–

मग ते परत घरांत शिरतात, तों त्यांची बायको पुढें आली होती! तात्या तिला तुटक शब्दांत हळूंच म्हणाले, "काय चमत्कारिक मनुष्य आहे बघ हा?.. तुला आठवतं ग, आपण दोन वर्षांपूर्वी हायस्कूलवाचन पुस्तकं छापलीं तें! त्यावेळीं जवळ जवळ तीस पस्तीस लेख मी विनायक मास्तरांकडे नकला करायला दिले होते. त्यानंतर तीं मंजूर झालीं नी आपल्याला इतका फायदाहि झाला! पण मी अगदीं साफच विसरलों होतों या घटकेपर्यंत, मास्तरांना पैसे द्यायचं! एकएक प्रतहि पाठवली नाहीं बघ! वास्तविक आज अगदीं हक्कानें पस्तीस चाळीस रुपये मागितले पाहिजे होते त्यांनीं!... पण आतां प्राणी दोन वर्षांनी उभ्या उभ्या येतो काय नी संकोचानें वीसपंचवीस रुपये माझ्याकडे हातउसने मागतो काय? जगांत काय एकेक चमत्कार आहेत हे!– याला म्हणायचं काय? गरीबाचं सौजन्य,... दैन्य–कीं..?..."

त्या र्दिवशीं दिवसा दाट काळोख कोंदला होता. धरणीवर धो धो पाऊस कोसळत होता. गल्लोगल्ली सगळीं तळीं झालीं होतीं. शहरी हम-रस्त्यांतून गढूळ नद्या वहात होत्या.

त्या नद्यांमध्यें लांकडी होडया नव्हत्या; पण काळ्या शिडांप्रमाणें असंख्य छत्र्यांची मात्र वरखाली हालचाल होत होती. ही छत्र्यांची ऊर्ध्व-अधर गती वाऱ्याच्या झोतामुळें किंवा पाण्याच्या लाटांमुळें होत नव्हती. छत्रीला छत्री आपटू नये, त्यांची मारमारी धक्काधक्की होऊं नये हा त्यामागील मानवी हेतू... पण तो सफळ होण्याऐवजी त्या व्हावयाच्या गोष्टी जरा वरच्या पातळींत नी उंचीवर होत होत्या एवढच !–

त्या उघड्या छत्र्यांच्या छत्रांखालीं त्यांच्या आकार–डिझाइनप्रमा-णेंच निरनिराळ्या आकार–मनोवृत्तींचे छत्रपती वावरत होते. कांहीं मिशाळ..तर कांहीं मुद्दाम गुळगुळीत केलेल्या अखंड पोरगेल्या दिसणाऱ्या चेहऱ्याचे !– कांहीं हार्डीसारखे लठ्ठ अंगापोटाचे...कांहीं लॉरेलसारखे काटकोळे रडव्या तोंडाचे !– कांहीं गजगतीनें चालणारे...कांहीं धावऱ्या मुंग्यांप्रमाणें तुरतुरणारे !– कांहीं गोगलगाईप्रमाणें अंग चोरून चालत होते;· तर कांही एडक्यांप्रमाणें मुसंडया–धक्या मारत जात होते.

पण आकाशांतील ढग मात्र साऱ्यांवर सारखेच गडगडत होते;... निर्मल पाणी साऱ्यांच्या डोक्यावर सारखंच कोसळत होतं!.. आणि पायाखालचा फुटपाथ चौफेर चिपचिपित होऊन साऱ्यांना निःपक्षपाती-पणानें सारखाच आपल्याजवळ प्रेमानं ओढूं पहात होता!..

तो फुटपाथ तर अत्यंत प्रामाणिकपणें जागोजाग पुरावे देऊन सांगत होता,...कीं मुंबईतील माणूस तोतापुरी आंब्रे आवडीनें खातात; हिरव्या सालींचीं केळीं इराण्याकडे पुष्कळ प्रमाणांत खपतात; आणि पादळ कागदांत 'नग मांडणाऱ्या' नाक्यानाक्यावरील फळवाल्यांकडून पिवळ्या-



सालीचीं मोसंब्री व शेंदरी रंगाचीं सफरचंदहि विकत घेणारीं गिऱ्हाइके अगदीं त्या घटकेला मुंबइंत जिवंत आहेत! या साऱ्या होत्या अगदीं शंभर टक्के सत्यकथा!.. पण रस्त्यांतून चालतां चालतां देखोल त्यांची चांगलीच ओळख पटत होती त्यावेळीं!–

ज्या गोष्टी दुरून संपूर्ण हेरतां येतात,त्या अगदीं आपल्या पाया-खालीं आल्या कीं लपून जातात. आपल्या पायाखालचें आपल्याला नेहमींच उशीरां पहातां येतं! आणि त्यामुळेंच जगांत खूप मोठाले घोंटाळे माजतात!–

तसाच एक घोटाला त्यावेळीं त्या रस्त्यांतलि त्या छत्रधारी मंडळींत एकदम माजला!–

एक गुब्रगुब्रित गालाचे, बटाऱ्या डोळ्याचे, घोंसदार मिशांचे, गणपतीच्या पोटाचे नी हत्तीच्या पायाचे वामनराव, आपली छत्री सांवरीत –कां कोणास ठाऊक–मुंगीच्या पावलानें–म्हणजे भरभर–चालले होते!

तोंच मुंबईच्या लोकांच्या खाण्याच्या आवडीचे दोन भयंकर पुरावे त्यांच्या दोन्ही पायांखाली एकदम आले. क्षणभरच ते आपल देह-भान विसरले. त्यांच्या पायांना जणूं वंगण मांखलेली चक्रं लावावींत असे, ते वरच्यावर अलगद दोन फूट पुढें सरकले. मग न्यूटनचें प्रमाणशीर गुरुत्वाकर्षणहि झालं. आणि शेवटीं, ते आपली उंची क्षणकाळ विसरून आपल्या जाडीइतके खाली आले!–

त्यांची छत्री तर आकाशदिव्याप्रमानें वर उडून लांब पडली!

तीन चार शेजाऱ्यांनी प्रसंगावधान राखलं; नी आपल्याला वाचव-ण्यासाठीं झटकन् बाजूला होऊन त्यांना जागा करून दिली!..

आणि एक क्षणांत या सर्व गोष्टी घडून, वामनराव आपली लांबी जमीनीवर मोजीत पडले. धरणीकंपाच्या अनपेक्षित धक्क्यानें जमिनीचा पृष्ठभाग जसा वर खालीं व्हावा, त्याप्रमाणें त्यांचं पोट उताणं पडल्या-पडल्या वर खालीं होत होतं!–

डोकंच आपटल्यानंतर आंत होता नव्हता तेवढा त्यांचा मेंदू एकदम जागा झाला! आपण घरांतल्या गादीवर नव्हे तर रस्त्यांत अगदीं फूटपाथवर पडलों आहों हें त्यांनीं तत्काळ ओळखलं! चिखलानें माखलेलं अंग व कपडे, भिजलेल्या मांजराप्रमाणें झाडत, ते उठून उभे राहूं लागले; एका-दोघांनी 'त्यांच्या वंशा जाऊन' त्यांना हातहि दिला...पण इतर मात्र...

हो, जागच्या जागीं एकदम थबकून, ते सारे खदखदां हंसत होते; उगीच कसली भानगड नको म्हणून आपलीं हसरीं तोंडं ते फिरवत होते.

क्षणभर जवळपासच्या छत्र्यांच्या महासागरावरील खवळत्या लाटा हलायच्या थांबल्या होत्या; त्याऐवजीं त्यांच्या खालीं स्तब्ध उभ्या झालेल्या मानवसागराच्या पोटांतल्या पोटांतच हास्याच्या लाटा फुटत होत्या.

मी चमकून नी मोठ्या रागानेंच तिकडे वळून पाहिलं. अनेक उघडीं तोंडं, त्यांतून दिसणाऱ्या दांतांच्या पुढें आलेल्या रंगीबेरंगी कवळ्या!... तेथून बाहेर येणारा आवाज...

पण त्यांतलाच एक कोंवळा चेहरा माझ्या डोळ्यांत विशेष भरला.

एक चौदापंधरा वर्षाचा पाटीवाला पोरगा होता तो! त्याचे कपडे तर खूप फाटले होते अगदीं भिजून ओले झाले होते; अंगाला चिकटले होते!– त्यातूनच त्याचं काळं कुळकुळीत अंग दिसत होतं!... आणि कमरेवर हात घेऊन व डोक्यावर छत्रीच्या ऐटीनें आपलीं फाटकी पाटी ठेऊन तो मनमुराद हसत होता!

त्याच्या गद्गदून हसण्याचा आवाज भोंवतालच्या साऱ्या गोंधळा-तून माझ्या कानावर अगदीं स्पष्टपणें आदळत होता. त्याच्या तेल लावल्या-प्रमाणें दिसणाऱ्या काळ्या गुळगुळीत चेहऱ्यावर, त्याच्या पांढऱ्या शुभ्र हिरकण्यांप्रमाणें चमकणाऱ्या रेंखीव दंतपंक्ती माझ्या दृष्टीनें तरी उठून दिसत होत्या.. चकाकत होत्या...

तें ध्यान मी क्षणभर पाहिलं मात्र!.. इतर हसणाऱ्या चेहऱ्यां-



बद्दलचा माझा राग अगदीं तत्काळ कोठल्या कोठें पळाला! शेवटीं, मीहि नकळतच... क्षणभर हसलों. हसत त्याच्याकडे पहात उभा राहिलों!..

पण हसतां हसतां पुन्हां थांबलों; नी चमकून पाहिलं तों पाय घसरलेली ती व्यक्ती आतांपर्यंत उठून चालूंहि लागली होती!–

जनसंमर्दाच्या पावलांनी पदपथ पुन्हां मर्दिला जात होता....

तो पोर मात्र अजूनहि तसाच उभा राहून तितक्याच जोरजोरानें खदखदत होता..

मला त्याच्या हास्याचा संसर्गजन्य रोग पुन्हां होऊं लागला होता!.. कांहीं केल्या मला माझं हसूं आवरेना!!..

क्षणभर मला मोठं कोडंच पडलं; इतर हसले तें पाहून मला राग आला... आणि हा त्याच गोष्टीला हसला! ते मला आवडलं इतकंच नव्हे तर मलाहि तो खदखदवून हसवीत आहे!– कां?–

तें एक कोंवळं पोर होतं!.. श्रमाच्या घामांत बुडलं होतं...पण नवे नवे अनुभव अजून मिळवीत होतं... त्या त्याच्या मोकळ्या हास्यांत त्याची कुत्सित दृष्टी नव्हती... त्या प्रसंगांतील विकृति–चमत्कृति त्याला त्याक्षणीं तर नाविन्यदायक वेड लावत होती!.. आणि तो खदखदत होता... तरी चांगला समोर उभा राहून अगदीं टिवल्याबावल्या करीत हसत होता!... त्यांत लप्पं छप्पं कांहीं नव्हतं!. माझ्या मनांत आलं...

आणि तीं दुसरीं?–

तीं जगाच्या चौरस चौफेर बाजारांत फिरलीं होतीं!.. त्यांचेहि पाय पूर्वी कधींना कधीं घसरले होते... जगांतील विकृति त्यांना चांगलीच ठाऊक होती!.. त्यांना तो जरा देखील चमत्कार नव्हता!!.

पडलेल्या माणसाहून आपण त्याक्षणीं तरी कितीतरी वरच्या उंचीवर आहों हा आत्मगौरवच त्यांना तसा हसवीत होता!.. आपण हसत आहों यांत सामाजिकदृष्ट्या कांहीं तरी वाईट आहे याचीहि–अंधुक कां

होईना—त्यांना चांगलीच जाणीव होती आणि म्हणूनच तीं सारीं हळूंच तोंडं फिरवून लपत छपत हसत होतीं !

यामुळेंच मला वाटलं,.. त्यांच्या हसण्यामुळें त्यांचे दांत तेवढे दिसले...ते त्यांच्या घशांत जातील अशी भीतीहि वाटली मला !

पण तो मुलगा मात्र अजूनहि तेथेंच उभा राहून तसाच कमरेवर हात ठेऊन निष्पापपणें हंसत होता !.. त्याच्या डोक्यावर कोणाचं कसलं छत्र नव्हतं...वरून आकाशांतील निर्मल पाणी तेवढं त्याच्या अंगावर निथळत होतं.... आणि त्यामुळें त्याचीं उरलीं सुरलीं पापेंहि धुवून निघत आहेत असा मला भास होत होता !..

म्हणून तो तसा खदखदा हंसत होता तरी मला त्याचे दांत दिसत नव्हते..

तेथें उलट त्या निष्पाप चेहऱ्यावर झळकणाऱ्या दोन मोत्यांच्या माळा तेवढ्या दिसत होत्या !!—

---

## तारा ३ : : : "कल्पनांच्या आठ्यापाट्या"

खटाववाडीच्या मोठ्या फाटकाजवळचें मॅजेस्टिक सिनेमाकडून येणारे रस्त्याचं वळण..म्हणजे तिथला तो कोंपरा कोणत्याही महाराष्ट्रीय फिरत्या माणसाच्या चांगलाच परिचयाचा असेल !..

आणि त्यांत पुन्हां सकाळीं दहासाडेदहाची वेळ असं म्हटलं की मग उगीच सविस्तर वर्णनानें जागा अडवायलाच नको मुळीं !—



जगातल्या गडबडघाईची क्षणांत चुणुक पहावयाची तर त्या कोपऱ्यावर उभं रहाणं हा अगदीं सोपा उपाय !—

एक काटकोळी चवळीची शेंग, हातांस बुटकी छत्री नी चांबडयाची सांखळीवाली पसरट पर्स घेऊन, आपली सॅंडलं खटखटवीत, लवचीकपणें आपल्या अंगाचा झोंक सर्व बाजूनें वळवीत त्या गर्दीतून वाट काढीत सेंट्रल सिनेमाजवळच्या फुटपाथवरून जात होती. आणि पृथ्वीच्या घोरणावर असणारं तिचं पिवळ्या किनारीचं पांढरं पातळ वाऱ्यानें किंचित उडत असल्यामुळें, मागून पंख उघडलेल्या एखाद्या बगळ्यासारखी ती दिसत होती.

आणि योगायोग असा, कीं त्याच वेळीं मॅजेस्टिक सिनेमाच्या बाजूनें धोतराचा ओबड धोबड काचा मारलेला, लॉंगकोटप्रमाणें फुगीर खिशांचा शॉर्ट कोट घातलेला, चुरलेली विटकी बनातच डोक्यावर टोपी म्हणून चढवलेला, तीशीकडला, किंचित् दाढी वाढलेला नी मध्यम उंचीचा कारकून, आपल्या हातांतल्या सरस्वती छापाच्या मळक्या पिशवींत कांहींतरी गुंडाळून घेऊन, लगबगीनें फास्ट गाडी पकडण्यासाठीं चर्नीरोडकडे जीव घेऊन धावत सुटला होता.

भविष्यकारांच्या भविष्यांत त्या दिवशीं त्याच्या राशीला लहानसा अपघात सांगितला होता कीं काय नकळे. पण गाडींत नसला तरी खटाववाडीजवळच्या भरनाक्यावर तरी तो होण्याची सारी पूर्वचिन्हें दिसत होतीं, एवढं मात्र खरं !—

शेवटीं, ज्या ठिकाणीं अनेक मराठी साहित्यिकांच्या तासतास चालणाऱ्या उभ्याउभ्या गांठीभेटी होतात, त्याच ठिकाणीं ती गडबडीनें जाणारी चवळीची शेंग व हा फास्ट गाडीमागें धांवणारा गांवठी भेंडा दोघे एकमेकांच्या समोरासमोर आलीं.

आणि मग कल्पना नसताना नी पूर्वी कांहीं ठरलंहि नसतांना

भररस्त्यांत त्यांचा आट्यापाट्यांचा खेळ सुरूं झाला.

पहाणाऱ्यांना समांतर रेषांवरील पुढें मागें होणाऱ्या दोन बिंदू-सारखी त्यांची ती हालचाल वाटत होती. पाटी कोणी धरली आहे तें न समजून शेवटीं दोघांनीं सुराप्रमाणें मधल्या उभ्या रेषेवरून सुरकांड्याप्रमाणें सरळ पुढें धावून जाण्याचा प्रयत्न केला!– नी शेवटीं, दोघेंहि एकाच रेषेवरून एकमेकांना हुलकावून विरुद्ध दिशेनें धावूं लागतांच, सर्वांनी आधीं अपेक्षिलेला अपघात झाला. दोघेंहि सडकून एकमेकांवर आपटलीं.

माणसांचे ज्ञानतंतु त्यांना नकळत काम करत असतात म्हणतात!.. खरं आहे तें! त्यानें अधिक कांहीं गोंधळ होऊं नये म्हणून आपल्या हातांतील पिशवीसकट तिच्या दोन्ही दंडांना घट्ट धरलं!.. पण लागलीच त्याचा चेहरा भयंकर गोंधळला. एखादा विंचू डसल्याप्रमाणें त्यानें आपले हात सोडून बाजूला पाय टाकला. व तो पुटपुटून म्हणाला, "सॉरी ऽऽ सॉरी...एक्स्क्युझ् हं ..."

पण त्याला जन्मांत तसला कधीं अनुभव नव्हता. त्याच्या तोंडांतील शब्द बंद झाले! पण नेहमीच्या सरावानें त्याचे पाय मात्र यंत्रासारखे भरभर चालू लागले. त्याला संकोच वाटला होता. अगदीं अपराधी वाटलं होतं! पण.. त्याच्या शरिरानें एकाद्या यंत्रासारखं पुढलं काम केलं! तो दूरदूर जाऊं लागला!–

ती चवळीची शेंग त्या धक्क्यानें मोडून पडते कीं काय अशा प्रकारें हादरली. तोंडानें कांहीं तरी पुटपुटली. मोटार जाऊन आपल्या अंगावर चिखल उडावा किंवा तिसऱ्या मजल्यावरून टाकलेला केर पर्जन्यवृष्टीप्रमाणें डोक्यावर पडावा, म्हणजे जी हालचाल होते त्या पद्धतीनें तिनें आपल्या पर्समधून छोटा रुमाल काढून आपले दंड व अंग झाडलं. आणि रागेल्या तोंडानें ती कांहीं तरी पुन्हां पुटपुटली.

पण तो लांब निघून गेला तरी ती पुन्हां पुन्हां मागें वळून पहात



थबकत होती! तिच्या दृष्टींत 'काय मेला धटिंगण!.. मवाल्यानें मुद्दाम धक्का दिलान् अगदीं!!–' असले शब्द स्पष्टपणें तरंगत होते.

कारण ती पुन्हां पुन्हां त्यानें त्या छोट्या अपघातांत धरलेले आपले दंड चारबोटें रुंदीच्या आपल्या रेशमी रुमालानें झाडून झाडून साफसूफ करीत होती!–

तो देखावा पाहून कोणालाहि वाटलं असतं...काय अहंगडी सहानुभूतिशून्य स्वभाव माणसाचा!.. तिला त्यानें मुद्दाम धक्का मारण्या-इतकं सौंदर्यहि तिच्याकडे नव्हतं. खडबडीत चेहऱ्याचा व हातांचा गोरेपणा पावडरीच्या डब्यांतला होता. तारुण्यहि विशेष वायां जात नव्हतं! पण तरी ती आपलं स्वतःचं मोठेपण तेवढं भडकपणें रंगवून, त्याला मात्र मवाली ठरवीत होती!–

वास्तविक, त्या आभावितपणें झालेल्या आट्यापाट्यांच्या सामन्या-मागें.. दृश्यसृष्टींतील त्या प्रत्यक्ष खेळामागें.... निदान त्यावेळीं तरी दोघांच्या मनांत झालेल्या, समोर असलेल्या प्रत्यक्ष परिस्थितीबद्दलच्या कल्पनांचाच आट्यापाट्यांचा खेळ होता! व त्या मनांतील विरोधी कल्पनांच्या आट्यापाट्यांत झालेल्या अभावित अपघातामुळेंच तो प्रत्यक्ष सृष्टींतील निरुपद्रवी अपघात घडला होता. तसं पाहिलं तर कोणी सुद्धां दोषी नव्हतं!..

पण ती मात्र स्वतः एकट्यालाच मोठी प्रामाणिक व सज्जन समजत होती! व तसा ती विचार करीत असतां, (दोन मिनिटें वेळ गेल्यामुळें) धडपड करून जेमतेम गाडी गांठीत असलेल्या त्या निरुपद्रवी प्रवाह पतिताला एक अस्सल मवाली समजत होती!

## “न्यायदेवतेचं घड्याळ”

त्याचे वडील त्या दिवशीं त्याच्यावर खूपच रागावले होते!– आणखी चार महिन्यांनी पंचविशी संपूर्ण होणार असल्यामुळें त्याची गद्धे-पंचविशी सुरूं असल्याचा त्यांचा निर्णय अगदीं वस्तुस्थितीला धरूनच होता!–

आंकडेमोडीचं नी त्याचं सात जन्माचं वैर! तेव्हां इन्कमटॅक्स खात्याचं नांव त्याच्या वडिलांनी घेतांच त्या भाषा–पदवीधराचा भाषाभिमान जागृत झाला; नी त्यानीं काढलेलीं पुढलीं सारी सुखस्वप्नें वरच्यावर हवेंत विरून, वाङ्मयसेवेचा आपला निर्धार त्यानें जाहीर केला!– त्यामुळेंच वडिलांचा इतका घुस्सा झाला होता त्याच्यावर!

पांच रुपयांतून पावणेदोनशें रुपये, बेलिफांतून हेडक्लार्क, कारकुनां-तून न्यायाधीश, वकिलांतून जस्टीस, असलीं कित्येक समीकरणं त्याच्यापुढें नांव–गांव–सनांचे दाखले देऊन त्यांनीं मांडलीं!.. त्यानें शांतपणें सारं ऐकलं आणि तरी पुन्हा म्हटलें, “कबूल...पण ते दिवस आतां नाहींत!... पुढल्या स्वर्गाची आशा धरून, दुबळ्या झालेल्या विश्वामित्रांना नाहक हांका मारीत, आम्ही मध्येंच त्रिशंकुप्रमाणें आयुष्यभर लोंबकळत रहायचं! त्यापेक्षां आम्हाला परिचित असलेली गरीब पृथ्वीच बरी!–”

त्याच्या तसल्या स्पष्टवक्त्या आचरटपणामुळें त्याच्या वडिलांचा राग उलट वाढलाच. पण तरी त्यावर ते गप्प बसले. तोहि ‘सुटलों’ म्हणून हळूंच काढता पाय घेऊन ओटीवर गेला!–

पण थोड्या वेळानें त्याचे वडील एकदम त्याला हांक मारून म्हणाले, “अरे, जस्टिस ×× मला काल रस्त्यांत भेटले होते. तुला पहायचंय् त्यानां ते म्हणाले!.. तेव्हां त्यांच्याकडे तुला मी आजच पाठवतों म्हणून म्हणालोंहि



आहें काल! आज सुटीच आहे, तेव्हां तूं आतांच जा पाहूं मुंबईला!– मोठीं माणसं कशीं असतात, वागतात, बघावं जरा!... कधीं कोणाची कोणाला कशी मदत होते सांगतां येत नाहीं!”

तो अगदीं गप्प राहिला. ते आणखी पुढें कांहीं चार वाक्यें बोलल्या-वर त्यानें कोट–टोपी घातली नी त्यांनीं तरीहि पुढें बोलणं चालूं ठेवल्यावर मिळालेला पत्ता हातीं घेऊन गपचूप स्टेशनकडे तडख चालूं लागला तो!

गामदेवीला तो रस्ता होता; आणि त्या रस्त्यावर त्यांचा स्वतःचा बंगला होता!–

तो दोन मजले चढून दारांत उभा राहिला. त्यानें समोरची घंटा वाजवली!...

कोणीतरी कारकुनासारखा दिसणारा मनुष्य दार उघडून त्याच्या-पुढें उभा राहिला. त्यानें आपलं नांव सांगून, जस्टिसना भेटायला आल्याचं कळवतांच त्यांनीं म्हटलं, “आतांची अ‍ॅपॉइंटमेन्ट होती? कार्ड द्या आपलं!”

त्यानें नकारात्मक मान हलवली; आणि मग त्याला पुढल्या खोलींत वाट पहात तिष्ठत बसावं लागलं!–

सुमारें वीस मिनिटें तो पहाणी करीत होता. भिंती ओक्याओक्याच होत्या! फक्त दोन तीन ठिकाणीं फ्रेम केलेल्या पण हळूहळू तुकडे पडूं लागलेल्या ऐतिहासिक डिग्र्या नी तारखा गेलेलीं दोनतीन जुनीं कॅलेंडरें भिंतीवर दिसत होतीं. त्याच्या जन्मापूर्वी विकत घेतलं असावं असं दिसणारं एक काळवंडलेल्या तबकडीचं घड्याळ, खपल्या पडलेल्या भिंतीवर लटकवलेलं दिसत होतं! त्यांतला बुरसलेला पितळी हलता लोलक ‘आला क्षण– गेला क्षण’ म्हणत निघून चाललेला काळ मोजत होता!–

इतक्यांत मघाचे ते कारकूनवजा मनुष्य बाहेर येऊन त्याला कुजबुजत हळूंच म्हणाले, “आंत साहेब बोलावताहेत तुम्हाला; पण हें पहा.. घाई आहे बरं त्यांना जरा..”

त्याला जरा प्रश्नच पडला. घाई असेल त्यांना तर त्याला तरी कुठं वेळ होता?.. आणि उगीच भेटण्यासारखं तरी काय होतं?.. पण घरीं एखाद्या वेळेस त्याला त्याचे वडील रागावतील या कल्पनेनें तो आंत शिरला!...

नी त्याची दृष्टि 'साहेबां'ना शोधूं लागली!–

आंतल्या खोलींत रंग उडालेल्या वाटोळ्या टेबलाजवळ समोरासमोर दोन खुर्च्या होत्या. त्यापैकीं एकीवर 'साहेब' बसले होते. गुडघ्याखालपर्यंत जेमतेम पोंचणारं धोतर, लहानमोठ्या व्यासांचीं अनेक वर्तुळें असलेला पूर्वीं पांढरा असलेला पण आतां काळसर रंगाकडे झुकणारा गंजीफ्राक, धोब्याकडे द्यायला झालेलं, पीळ पडलेलं दोरखंडवजा जानवं गळ्यांत, सोनेरी काड्यांचा कपाळावर चढलेला चष्मा, किलकिले डोळे, गुळगुळीत काळसर चेहरा नी तुळतुळीत टाळू...

समोरच्या वाटोळ्या टेबलावर पुष्कळ कागदांचा ढीग पडला होता नी त्या ढिगाजवळच जुनं टाइमपीस उभं राहून टकटकत होतं.

तो आंत शिरतांच गंभीर चेहऱ्यानें त्यांनीं एकदां त्याच्या बाजूस वर पाहिलं; त्याला हातानें बसायला सांगितलं नी मग पुन्हां कागदांत त्यांची दृष्टी बुडाली!–

तिऱ्हाइताला रद्दी वाटणारे खूप कागद पुडक्यापुडक्यांनी कोपऱ्या-कोपऱ्यांतून रेकॉर्डावर ठेवले होते!....

तेवढ्यांतच ते मान वर करून, गालाला किंचित् सूक्ष्म खळी पाडून त्याला म्हणाले, "रावसाहेब बरे आहेत?–"

तो उत्तरादाखल लागलीच 'हो' म्हणाला; पण कालच दोघांची भेट झाली हीती. त्यांनीं हितगुजहि केलं होतं म्हणे! आणि पुन्हां आजहि त्याला त्यांनीं तोच प्रश्न विचारला! हें मात्र त्याला जरा चमत्कारिक वाटलं!–

तेवढ्यांत पुन्हां त्यांनी कागद वरखालीं केले! तेथें नांदणाऱ्या



अस्वभाविक शांततेमुळें त्याचा जीवहि तसाच वरखालीं होत होता. आतां त्यानंतर पुढें कोणता प्रश्न येणार याचा तो साशंक मनानें विचार करीत होता; कारण त्याच्या वडिलांच्या म्हणण्याप्रमाणें त्यांनां त्याच्याबरोबर खूप बोलायचं होतं. आपल्या मित्राच्या तरुण मुलाचे विचार मोकळेपणें समजून घ्यायचे होते म्हणे!...

"बी. ए. झालास ना?.." कांहीं वेळ तसाच गेल्यावर त्यांनीं आपला चष्मा डोळ्यावर ओढून त्याच्याकडे पाहून विचारलं.

"हो" तोहि तितक्याच थंडाईनें त्यांच्याकडे पहात त्यावर म्हणाला.

त्याक्षणीं त्याला भयंकर मोठं कोडं पडलं होतं, तें त्याच्या वडिलां-विषयीं! आणि त्या समोर बसलेल्या त्यांच्या मित्राविषयींहि!–

त्याच्या मनांत मोठा विचार आला, "मग काल हे दोघे माझ्या-विषयीं असें बोलले तरी काय? आणि आज मला वडिलांनी असं मोठ्या आगत्यानें यांच्याकडे पाठविलं आहे तें तरी कां?"

पण असा विचार करतां करतांच तो एकदम केवढ्यानें तरी दचकला! त्या वाटोळ्या टेबलावरील तें वाटोळं घड्याळ जणूं काय त्याच्याकडे पाहून मोठमोठ्यानें बोंबलत होतं! इतक्या उशीरां न्यायाधीश सकाळीं उठतात असं गृहित धरणं त्याला क्षणभरहि शक्य वाटेना. मग त्या अबोल न्यायाधीशांच्या टकटक करणाऱ्या घड्याळाचा गजर कां झाला!

तोंच 'ॲलार्म'चा कांटा 'सायलेंट'च्या बाजूस ओढत ते त्याच्या-कडे साभिप्राय पाहूं लागले!–

तेवढ्यावरूनच त्यानें ओळखलं. तो आंत येण्यापूर्वी त्यांनी तो गजर लावला असावा! नी आतां त्यापुढें त्यांच्या व्यग्र आयुष्यांत दुसरें काम नसल्यामुळें त्या घड्याळाच्या काट्याबरोबरच त्यानेंहि एकदम 'सायलेंट' होण्याची वेळ आली होती!... त्या यंत्राचें चोख काम, प्रेमळपणा नी भोळेपणा त्याला पटला नी तो झटकन् उठून उभा राहिला!–

तेहि त्याच्या हालचालीकडे अपेक्षीत दृष्टीनें पाहून म्हणाले, "बरं ऽ येत जा हं कधींतरी असाच! नी रावसाहेबांना माझा नमस्कार सांग!"

तो यांत्रिकपणें पायऱ्या उतरला! त्यावेळीं त्याला मंडळींकांची ऐतिहासिक आख्यायिका आठवली, मग आपल्या वडिलांचा त्यादिवशींचा राग आठवला! दोन मिनिटांपूर्वीं कानावर एकदम आपटलेला गजर आठवला! नी 'रावसाहेबांच्या नमस्कारा'चीहि त्याला आठवण झाली!

त्यानें न्यायदेवतेच्या त्या घड्याळाला चालतां चालतां कोंपरापासून नमस्कार केला!

घड्याळांची नी यंत्रांची आवड नसल्यामुळें हीच गोष्ट पुन्हा पुन्हा आपल्या वडिलांना सांगून, त्यांच्या मित्रवर्यांना पुन्हा भेटण्याच्या त्याच्यावर कोसळूं पहाणाऱ्या त्यानंतरच्या आपत्त्या, धडधडीत खोट बोलून तो आतांपर्यंत टाळत आला आहे!

---

## तारा : ५ "परिस्थितीचे बळी"

खोट्या नाण्यांच्या या काळांत हल्लीं लोक ताकसुद्धां फुंकून पिऊं लागले आहेत. सुक्याबरोबर ओलं जळतं; आणि चोर सुटून संन्यासी सुळीं जातो.

किती तरी वेळ गर्दींत उभा राहून मी त्या वृद्धाकडे पहात होतों. त्याचा माझा कांहींएक सम्बन्ध नव्हता; तरी माझं, त्याच्याविषयीं व त्याचं आतां पुढं काय होतं याविषयीं, कुतूहल वाढलं होतं!—



त्याच्या शरीराचं शुष्ककाष्ठ झालं होतं; भिंवयावरचे नी कानांच्या पाळ्यांवरचे पांढऱ्या केसांचे वाढलेले झुबके वाऱ्यानें हळूंच भुरभुरत होते!— निळ्या शिरा जाडजूड होऊन वर आल्या होत्या. गाल अगदीं आंत जाऊन जबड्याचीं हाडं उंचावलीं होतीं. डोळ्यांच्या खांचा खोल गेल्या होत्या नी आंतले डोळे बाहुलीच्या काचेरी डोळ्यांप्रमाणें वर आले होते!— पाठीला पोंग पडून मान 'नका हो नका!...मी आतां म्हातारा झालों आहें!' असं सारखी म्हणत होती!—

कारण त्याच्याभोंवतीं त्याक्षणीं दोनतीन सत्ताधारी खाकी शिपाई उभे होते; आणि खुर्चीवर बसलेले जमादार त्याला अगदीं हडसून खडसून कांहीं प्रश्न विचारीत होते!...

तेवढ्यात... "कां हो हेरम्बराव?"...अशी एका कारकूनवजा गृहस्थानें त्या वृद्धाला जातां जातां पृच्छा केली. त्याबरोबर जमादारानें चमकून त्याला विचारलें, "कांहो, ओळखतां तुम्हीं या थेरड्याला?"—

"तर तर!—असं कां म्हणतां बरं जमादार!...दर दोन महिन्यांनीं केळव्याहून येतात पेन्शन घ्यायला! आज सकाळींच यांची सही घेऊन मी पंचवीस रुपयांच्या नोटा दिल्या"...त्यांनीं माहिती पुरवली.

"अर्र— मग सारा घोटाळाच झाला कीं!...बरं म्हातारबुवा...मग जा तर आतां तुम्ही"...जमादार पोलिसांना बाजूला होण्याची खूण करून म्हणाले व त्यांनीं एकदोन नोटा व सुटे रुपये त्यांच्या हातीं दिले.

म्हातारा कांहीं न बोलतां काठी टेकीत बाजूला झाला!...त्याचे डोळे थोडे पाण्यानें भरले होते, व तो आपल्याशींच कांहीं तरी पुटपुटत होता!...

चालतां चालतां हाताच्या मुठींतील पैसे आपल्या किलकिल्या डोळ्यांनीं पहात तो क्षणभर थांबला. त्यानें ते सारे रोख रुपये एकदोनदां मोजले, आणि मग त्याच्या डोळ्यांतून आणखी पाणी गळूं लागलं.

त्याच्या आयुष्याच्या नाटकाच्या चालू अंकातील त्या प्रवेशांत

शिरावंसं मला वाटलं ! नी मी जणू काय ओळख आहे अशा स्वरांत त्याला म्हणालों, "हेरम्बराव, आतां पहांटेशिवाय गाडी नाहीं तुम्हाला केळव्याला जायला...."

"हं...'सिक् शप्' (6up) चुकली नी घोटाळा झाला..." हेरम्बराव किंचित् चमकले नी मग आपल्या पाठीचे म्हातापणचे कुबड तिरकस फिरवून त्यांनीं मला उत्तर दिलं !—

"कोण तुम्ही ?" म्हातारपणच्या दरडावण्याचा सूर त्यांत होता, "अंहक् ! कांहीं नको !...चौकीवर बसणार होतों कुलपांत तें आतां स्टेशनवर बसेन...बांकड्यावर."

आणि तो स्वाभिमानी म्हातारा शरीरानं वांकला होता तरी मनानं वाकलेला नसल्यामुळं मन्द पावलं टाकीत स्टेशनच्या बाजूस जात जात शेवटीं दिसेनासा झाला...

स्टेशनवर तिकिटाच्या खिडकीजवळ गर्दींत, पाऊण तासापूर्वी, मी त्याला पाहिलं प्रथम !...तेव्हांच तो घोटाळा मला आठवला. 'त्या अनुभवानं पोळूनच म्हाताऱ्यानं माझं अनोळखी आमन्त्रण नाकारलं नसेल ला ?' असंहि मला वाटलं !—

दोन महिन्याला पंचवीस रुपये पेन्शन घेणारा हा नोकर पूर्वी ऐन उमेदींत कसला अधिकारी होता असेल कोणास ठाऊक ?...पण घोरणीपणाची, चाणाक्षपणाची नोकरी तो करत नसावा खास ! कारण नाहींतर तिकिट खिडकीशीं झालेल्या त्या घोंटाळ्याला कारण झालं नसतं...तो घडला असता तरी तसा वाढत गेला नसता नी पोलिसांबरोबर त्याला चौकीवरहि जाव लागलं नसतं.

"मास्तर, एक केळवा द्या !" आपल्या लांब कोटांतून पुरचन्डी काढली व त्यांतला एक रुपया पुढें केला.

रुपया आपटून परत मागें टाकत मास्तर म्हणाले, "खोटा आहे !... दुसरा द्या."



हेरम्बरावांनीं दुसरा पुढें केला; मास्तरांनीं दुसराहि वरखालीं फिरवून आपटला व म्हटलं, "दुसरा द्या हो. ..."

"अरेच्या..." म्हणून हेरम्बरावांनीं पुरचुन्डींतून तिसरा काढला.

पण आश्चर्य हें कीं तोच नव्हे तर आणखी चार रुपये मास्तरांनीं पुन्हां मागें फेंकले नी ओरड केली, कां हो...खोट्या नाण्यांची एखादी टांकसाळ आहे कीं काय तुमची...हें काय चालवलंय् ?..."

त्यापुढल्यानेंहि बद्द आवाज काढतांच मात्र मास्तर ओरडून म्हणाले, "मला बनवताय् काय ?—थांबा...सोनेरी टोळीचे तुमचे डाव माझ्याकडे चालणार नाहींत !...पोलीस...ए पोलीस..."

पोलीस जमले; भोंवतीं भरभर गर्दी जमली...म्हाताऱ्याची झडती झाली !...

साडेआठ रुपयांचीं रोख नाणीं निघालीं !...त्यांत आठ रुपये होते नी त्यांतले सात साफ खोटे होते !...

पोलिसांची मगरूर दमबाजी झाली !

"एका दुकानांत दहाची नोट मोडून आपण दीड रुपयाचें धोतर पान घेतलं !" याहून हेम्बरराव आपला कांहींच बचाव करीत नव्हते !—त्या दुकानांत चौकशी केली, तों हा—आपल्याकडे कधींच आला नसल्याचं दुकानदारानं सांगितलं !—

"एकामागून एक रुपये काढून 'हा चालेल' 'हा पहा' असें हा सांगत होता" म्हणून तिकिट मास्तरनें सांगितलें.

"तुमची कोणांकोणाची टोळी आहे रे थेरड्या ?" या प्रश्नानें शेवटीं पोलिसी फेर विचारपूस झाली. पण म्हातारा रडत म्हणाला, "अहो! माझे हातोहात दहा रुपये त्या दुकानदारानें खाल्ले नी तुम्ही टोळी कसली विचारतां मला ?..."

पण त्या प्रश्नाला उत्तर म्हणून त्याला चौकीवर नेण्यांत आलें.

तिथें झालेला प्रकार नी त्यानन्तर झालेला प्रकार!...

अदृश्य झालेल्या हेरम्बरावांच्या ठिकाणीं मला किती तरी दुर्दैवी जीव दिसूं लागले !...

खरीं नाणीं म्हणून विविध बाबतींतलीं खोटीं नाणीं त्यांच्या भाबडे-पणानं नी गफलतीनं त्यांच्या गळ्यांत पडतात! त्यांना ठाऊक नसतं म्हणून निष्पापपणेंच तीं खोटीं नाणीं खरीं नाणीं म्हणून चालवूं पहातात! आणि मग जगांतल्या काल्पनिक निर्भेळ खऱ्याचे खोटे कैवारी एकदम जागृत होतात, व खोटीं नाणीं खरीं म्हणून राजरोसपणें चालवणारे, या आरोपावर त्यांनाच मुळांत खोटे ठरवतात!...

—आणि म्हणूनच खोटीं नाणीं जगांत खरीं म्हणून प्रसृत होतात नी खरीं नाणीं खोटीं म्हणून अनेकदां दुर्लक्षिलीं, हेटाळलीं, पापी गणलीं जातात!—

---

## तारा : ५ "एक जुनाट शिलालेख"

मोठ्यामोठ्यानें खदखदां हसूं लागलों मी!—

पण मग माझं हसूं थांबलं आणि माझा मलाच खूप राग आला!... वस्तूमागल्या भावना काळानुसार नाहींशा झाल्या तरी त्या वस्तूंचें नीं त्या कृतींचं इतकं कांहीं हसूं व्हायला नको! असा एक मोठा उपरतीचा विचार माझ्या मनांत एकदम शिरला!...



पण मग तोहि विचार मागें हटला; नी मी पुन्हा मोठ्यानें हंसलों.

शर्टाला नी केसांना लागलेलीं कोळिष्टकें व धूळ झाडून मी माझ्या समोरील वस्तू वरखालीं करूं लागलों.

"अगे, वरची तुझ्या पुस्तकांची अडगळ जरा बघ!.. घरीं आहेस ना!— आतां उंदीर अगदीं खालीं उतरून माझ्या कागदपत्रांच्या कपाटा-भोंवतींहि फिरूं लागले आहेत रात्रींबेरात्रीं!.." असं माझे वडील त्या रविवारीं सकाळीं मला निवांतपणें वर्तमानपत्रें चाळतांना पाहून म्हणाले.

वास्तविक त्यामागें खूप राग होता. आणि मी चड्डीधारी असतों तर ते माझ्या अंगावर जोरानें खेंकसलेहि असते!—पण मुलें मोठीं झालीं म्हणजे वृद्ध वडील माणसांचं कांहीं चालत नाहीं!.. त्यांना सारं समजतं; पण जमत मात्र नाहीं!..

आतां आपणहि अंत पहाण्यांत अर्थ नाहीं असं वाटून मी अपराधी चेहऱ्यानें त्यांच्याकडे पहात उठलों व अगदीं अस्पष्ट आवाजांत 'हो हो' म्हणून गुपचूप वरच्या माळ्यावर चढलों.

संन्याशाच्या संसाराची मला तशी कल्पना नाहीं. पण संसारी माणसाचा संसार मात्र कसा होतो, कसा वाढत जातो, याची मला तिथलं सारं दृश्य पाहून तात्काळ खात्री झाली!..

माझ्या पुस्तका–कागदांची अडगळ होती एका कोपऱ्यांत! नी बाकीच्या तीन कोपऱ्यांत अगदीं मंगलोरी कौलांशीं खांदा भिडवणाऱ्या चार पांच राशी पडल्या होत्या!.. त्यांत मोडके पाट, फुटकीं भांडीं, जुन्या घरांच्या खिडक्या–दारें,...आणि इतर लाखो वस्तू होत्या.

पण त्यांची मात्र 'माळ्यावरील अडगळीं'त गणती करण्याची मुळींच प्राज्ञा नव्हती माझी! कारण त्यांत वडिलांच्या आयुष्यांतील अनेक ऐतिहासिक प्रसंगांच्या पुराव्यांचे अवशेष होते. तेव्हां त्यांतले कोणते महत्वाचे व कोणते क्षुद्र हें मी कसं ठरविणार होतों!— उगीच मतभेदाचे प्रश्न उकरून

काढल्याचा माझ्यावर कारण नसतां आळ येण्याचा संभव होता! तेव्हां त्या साऱ्या राशींना मी मनांतल्या मनांत जरी अडगळींत जमा केलं, तरी देखील माझ्या हक्काच्या चौथ्या कोपऱ्याकडे फक्त माझा मोर्चा फिरवला! सांगितलं असेल तेवढं करावं, बाकी चांभारचौकशा कशाला? हा कमात कमी धोक्याचा मार्गच मी त्यामुळें अवलंबिला होता!

होती खरीच माझ्या कोपऱ्यांतील ती अडगळ मोठी!.. 'करमणूकी' पासून तो 'निर्भीड'–'नवयुगा'पर्यंत तेथें साऱ्या मराठी नियतकालिकांचा प्रत्यक्ष इतिहास होता! गुलबकावली–फार्सापासून अगदीं माझ्या अलीकडच्या पुस्तकाच्या प्रुफांपर्यंत ग्रंथवाङ्मयहि तिथं उपस्थित होतं. आणि माझ्या मराठी शाळेपासून तो मास्तरकीच्या पदवीपर्यंत झालेल्या माझ्या अभ्यासाचे अवशेष तिथं दिसत होते. वह्यांचे तीन ढीग अगदीं आढ्याला लागले होते.

तिथं डोक्यावरच आलेल्या हिरवट रंगाच्या कांचेरी कौलांशी दोस्ती करून ते ढीग त्यांना जणूं सांगत होते..."अहो, आहे तें सारें ठीक आहे! झांकली मूठ सव्वालाखाची!.. आम्ही उगीच ढीगभर बोलण्यांत काय अर्थ? या विद्यार्थ्याच्या अकलेचे आमच्या पोटांत सापडणारे पुरावे जर कोणाला समजले...तर त्या 'विद्वान्' प्राण्याची निदान अब्रू तरी अगदीं थेट तुमच्या सारखीच ठरेल!.."

मी लागलीच तें आव्हान स्वीकारलं!.. आणि ज्यांच्या देवाणघेवाणींत वेळोवेळीं चणेफुटाणे नी चिवडाभेळ मिळाली असती, त्यांची 'खाल्ल्या घरचे वासे मोजणारी' ती वटवट एकदम बंद करण्यासाठीं, त्यांना मी खसकन् खालीं ओढलं!–

ढिगांनी व्यापलेली जागा आतां एकदम चौपट विस्तारली... आणि कांही वह्या नी कांही पुस्तकें आश्चर्यानें आ वासून उताणीं पडलीं!... मी हसून त्यांच्याकडे पाहिलं!...



एकींत कापलेला बेडूक दिसत होता...त्याच्या तांबड्या पेन्सिलीनें काढलेल्या लालभडक रक्तवाहिन्या माझ्या डोळ्यांत एकदम भरल्या... आणि अनेक हालचाल करणारे बेडूक नी त्यांचीं कांल्याप्रमाणें थंडगार अंग मला पहातां पहातां कल्पनामय स्पर्शानें तेथें भासली!..

त्याचीं भुतं भोंवती कुठं भिरभिरत होतीं कां कुणास ठाऊक!– पण तिथं एकदम खोल आवाज घुमला... "कां रे आमची चिरफाड केलीस उगीच?.. तूं शेवटीं शास्त्रज्ञ झाला नाहीस तो नाहीसच!– अरे, तुझ्या शास्त्रीय ज्ञानाच्या मर्यादा अगदीं सुरवातीपासूनच जाणून आम्ही आमचे हातपाय झाडत होतों... पण तरी तूं त्यावेळीं मोठ्या उद्धटपणें चालला होतास.... आमचे तुकडेतुकडे तेवढे झाले... तुझ्या ज्ञानांत मात्र त्यांतल्या एकाइतकीहि भर पडली नाहीं!... कुठं वहात गेलास तूं बाबा शेवटी? नी आम्ही मात्र जगांतून नाहक...."

मी त्या वह्या बाजूला सारल्या; डोळे घट्ट मिटले; नी तोंड क्षणभर बाजूला वळवलं!–

दुसऱ्या वह्यांची उचलठेव करतांनाहि एकामागून एक प्रसंग, वाक्यें आवाज पुढें येत होते.

शास्त्र सोडून वाङ्मयाच्या प्रांतांत शिरल्यावर, 'मिल्टनच्या सैताना'चा अभ्यास वर्गांत चालला असतां शिकवणाऱ्या प्रोफेसराचं कार्टून काढल्याचा पुरावा! ज्ञानेश्वरी मराठीचा अभ्यास चालला असतां नुसती गणपतीछापाची बाजारी पिशवी काढल्याचा पुरावा! न्यूमनच्या संस्कृतिपोषक शिक्षणाचा व आदर्श विश्वविद्यालयाचा अभ्यास चालला असतां नुसता लांब काठीचा झाडू काढल्याचा पुरावा!... शाळेंत एकच एक येत असलेलीं चार गणितें, आलटून पालटून पांचपांचवेळां सोडवून, होमवर्कवर जोशी सरांच्या राजरोस कबुलीसह्या घेतल्याचा पुरावा....

मला माझ्या विद्यार्थीदशेचे ते सचित्र पुरावे अधिक पाहवेनात!–

मी सारेच्यासारे ढीगच धाडकन् ढकलून दोन्ही हातांनी बाजूला सारले....

तेवढ्यांत मला त्या वह्यांच्या तांड्यांत एकच एक फाटकं पुस्तक दिसलं.

मी पटकन् तें उचलून वर घेतलं....

पानें चाळूं लागतांच मी हसूंहि लागलों...

माझं इंग्रजी पहिलीचं तें पुस्तक होतं!..

त्यावरचं नांव मी फाटकसरकडून लिहून घेतलं होतं; पण आंत मात्र प्रत्येक दोन पानांच्या अंतरावर मी स्वतःच, पहिल्या-दुसऱ्या-तिसऱ्या लिपींचा गोंधळ करून माझ्या सह्या घटवल्या होत्या!.. माझ्या सहीला पुढें खूप मोठी किंमत येणार आहे अशी माझी त्यावेळची कल्पना होती असल्यास नकळे!.. मधल्या पानांत जिवंत रहायला कुंकू घातलेलं मोराचं पीस शेवटीं मरून पडलं होतं!.. पुढल्या दोनतीन पानांत जपून ठेवलेलीं धोतरावरचीं लेबलें उंदरांनीं कुरतडलीं होतीं. गुलाबांचीं त्रिदळें सुकून मोडलीं होती... पाण्यांत बुडवून कागद ओढून उतरावयाचीं रंगी चित्रें पहिल्या पानावर एका रांकेंत फलटणीप्रमाणें उभीं राहिलीं होतीं!..

आणि शेवटच्या पानावर तर एक भली मोठी यादी होती... वाचतांच माझ्या लक्षांत आलं! तीं त्यावेळच्या माझ्या एकंदर भांडाराची (माझ्या बँक अकाउंटची) मोठ्या कसोशीनें केलेली खानेसुमारी होती. कारण, त्यांत "कैची पाकिटें ४८, हत्ती ९७, बैदूल ८, काचेळया १७, हिरवा मांजा ४, रिळें... सोनें ५५, मेणकागद १३७, पाणचित्रें २८..." असला कांहीं तपशील सांपडत होता मला!

मला हसतां हसतां '५५ सोन्या'ऐवजीं रुपेरी कागदाचे तुकडे नी मेणकागदाच्या ठिकाणीं खिशातला छापखाना दिसूं लागला!..

मी पुन्हा एकदां तें पुस्तक डाव्या हाताचं पहिलं बोट व आंगठा यांत धरून भुर्रर् करून चाळलं. ठिकठिकाणीं हिरव्यातांबड्या रंगांतील



पातळ–परकर–पोलकीं सरकून गेलीं... पोरींच्या मिशा डोळ्यांत खुपल्या.. पुरुषांचं कुंकू चमकलं.......

त्या रंगसंगतीवरून व रंगपसंतीवरून त्यावेळच्या माझ्या महत्वाकांक्षांत (चित्रकार नाहीं तरी) निदान रंगारी होण्याची माझी एक महत्वाकांक्षा असावी असा मला वास येत होता!...

आणि म्हणूनच मी खदखदां हंसत होतों!...

मी सारा ढीग गड्याला खालीं आणायला सांगितला; आपल्या आज्ञाधारक मुलाकडे पाहून वडिलांना समाधान वाटलं!..

पण माझं इंग्रजी पहिलीचं शिलालेखवजा ऐतिहासिक पुस्तक मात्र मी त्यांतलि साऱ्या तपशीलांसकट हळूच कपाटांत टाकून कुलूप घातलं!

---

## तारा : ७ : : "टळलेला अपघात"

पशू व मनुष्य यांत एवढा फरक पडण्याला मोठं कारण म्हणजे, मला वाटतं, माणसाकडे असलेला मोठा थोरला सहानुभूतीचा ठेवा!– आपण दुसऱ्यांच्या सुखदुःखाच्यावेळीं त्यांच्या स्थितींत स्वतःला पटकन् कल्पूं शकतो. दुःखांची, संकटांची वेळ म्हणजे तर याची चांगलीच कसोटी होय.

त्या दिवशीं माझ्या एका कौशल्यवान् थापाड्या मित्राला मी घाबरत घाबरत थाप मारली, "अहो, मुंबईंतले बरेच अपघात केवळ आपघातानेंच टळतात. म्हणजे समजा, एक मोटार साठ मैल वेगानें धावत

असली नी पुढें मनुष्य आला तर तो ती मोटार चुकवून जीव जगवण्यासाठीं धडपडतो!– कसा तें पहा. चुकून उजव्या बाजूनें तें धूड जाईल या कल्पनेनें तो डाव्या बाजूला उडी मारतो; आणि तो चुकून डाव्या बाजूला जाइल म्हणून तो बेफाट ड्रायव्हर भरकन् उजव्या बाजूला चाक फिरवतो. धोरणापेक्षां स्फूर्तीनेंच या गोष्टी अगदीं एका क्षणीं योगायोगानें घडून येतात! नी म्हणूनच केवळ चुकून घडलेल्या असल्या अनेक अपघातांमुळें तो पुढला खरा अपघात टळतो. दोघेहि नीट पुढें पाहून अपघात टाळण्यासाठींच जर हालचाल करतील तर नक्की अपघात होतील! किंबहुना मुंबईत अपघात घडल्याचे जें आपण नेहमी ऐकतों ते अपघात टाळण्याचा फाजील प्रांजल प्रयत्न दोन्ही बाजूंनी झाल्यामुळेंच घडून येतात!–"

त्यानें येथपर्यंत माझें स्पष्टीकरण कबूल केलें!–

तेव्हां अपघातावेळची मानवी सहानुभूतीची हालचाल मी पुढें वर्णन करतानां त्याला सांगितलें, "मला तर कोणी अपघातांत सापडेल असं वाटलं कीं छातींत कालवल्यासारखं होतं! दुबळा म्हणा मला पाहिजे तर; पण धांवत्या ट्रॅममध्यें कोणी चढूं लागला कीं मी (मला अपघात होईल तर; पण धांवत्या ट्रॅमममध्यें हें विसरून) असेन तेथें, रस्त्यांत तर रस्त्यांतच उभा रहातों. ट्रॅममधून कोणी उडी मारत असला आणि त्याचा झोंक पुढल्या बाजूला असला तर मी माझा झोंक मागल्या बाजूला कलवतों नी त्याचा मागच्या बाजूला असला तर मी पुढें झुकून सरळ ओणवाच होतों!.."

हें विधान मात्र त्यानें चोराचीं पाउलें आम्हाला ठाऊक आहेत असें म्हणून थापेच्या सदरांत ढकललें!..

तरी तो प्रामाणिक प्राणी त्या थापेला सत्याचा आधार चांगलाच असल्याचं शेवटीं कबूल करून गेला!–

पण कांहीं का असेना, मी असले अनेक अपघात प्रत्यक्ष पाहिल्यामुळें आतां बराच दुबळा झालेलों आहे, मनानें... त्या बाबतींत!.. खिडकी



उघडी पाहिली कीं लढाईचें चित्र माझ्या डोळ्यासमोर येऊन, ती बंद करून ठेवल्यावाचून मला चैन पडत नाहीं!.. तिसऱ्या चौथ्या मजल्यावरून खुर्चीवर उभं राहिलेलं मूल खालीं पहातांना दिसलं कीं मी आपपर भाव झटकन् विसरून त्याला चापट मारल्यावाचून नी रडवल्यावांचून सोडत नाहीं. प्लॅटफॉर्मच्या कडेवर वांकून येणाऱ्या गाडीच्या आवाजांत गुंगलेल्या माणसाला खसकन् मागें ओढून त्याची समाधी उतरविण्यांत मला फार सुख वाटतं!–

आणि मग असले अपघात प्रत्यक्ष सृष्टींत झाले नाहींत म्हणून मला त्यांचं विस्मरण झालं तरी टळलेले अपघात म्हणजे माझ्या भित्रेपणाला अधिक मूर्त स्वरुप आणण्यासच आतां कारण झाले आहेत!

तीन वर्षांपूर्वींचा एक प्रसंग याच अपघातापैकींचा एक!.. पण तो आज आतां पांच मिनिटांपूर्वींच घडल्याप्रमाणें माझ्या डोळ्यासमोर सारखा उभा रहात आहे.

बी. बी. सी. आय्. चे डबे बाहेरच्या बाजूस उघडतात ही गोष्ट अगदीं मशहूर आहे. कडी दोन हप्त्यानीं संपूर्ण लागते. आणि पहिल्या हप्त्यावर विसंबून असणं हें फार धोक्याचं असतं!..

त्या दिवशीं मी भाऊबिज संपवून मुंबईस परतत होतो. डब्यांत खूप गर्दी होती. पण एक तरुण जोडपं व त्याचं दोनतीन महिन्याचं छकुलं असे तीन जीव आंत शिरले.

त्या नव्या जीवाकडे पाहून, त्यांच्यापैकीं दोघा जीवांना बसायला लोकांनीं जागा करून दिली.

तो मात्र माझ्या पंक्तींत पडून माझ्या खिडकीजवळच्या दारांत उभा राहिला.

त्या छोट्या जीवाकडे पाहून मीं ठोकताळे बांधूं लागलों. अगदीं [illegible]त लग्न झालं असलं तरी हा दुसरा दिवाळसण नी पहिलंच बाळंत-

पण संपवून, दोहोंचे तीन होऊन, तें जोडपं मुंबईस परतत असावं.

ती त्याचे लाड करत होती; तो तिचे लाड करीत होता! मला तो संसारी प्रेमाचा त्रिकोण सुखद संपूर्ण वाटत होता!—

शेवटीं गाडी सुरूं झाली. वेगानें धावूं लागली. वरखालीं हलूं लागली.

प्रत्यक्ष खिडकीहि माझ्या वांट्याला न आल्यामुळें मधूनच माणसांची गर्दी चुकवून एखादी वाऱ्याची झुळूक माझ्या अंगाला चाटून गेली कीं मला आनंद वाटे!

पण गाडीचं खटखटणं वाढत वाढत गेलं नी मी एकदम चमकलों.

माझ्या डोक्यांत एक भयंकर संशय विजेसारखा चमकून गेला. नी मी यांत्रिक बाहुल्याप्रमाणें दचकून माझी मान झटकन् दाराकडे वळवली!—

तो दाराकडे पाठ करून व दारावरच्या उघड्या खिडकीचा आश्रय घेऊन, दाराला ओडगूनच उभा होता व आपल्या चिमुकल्याच्या लीला पहाण्यांत नी थोडसं काजळ घातलेल्या डोळ्यांच्या आपल्या बायको-कडे हळूंच हसण्यांत गुंगला होता....

माझ्या छातींत धस्स झालं! क्षणभर सगळीं गात्रें बधिर झालीं नी वेड लागल्यासारखा धांवत माझ्याजवळ खिडकी अडवून उभ्या असलेल्या मळकट कपड्यांच्या दोघां गुजराथी हमालांच्या बाजूला मी अंग कलवलं.

त्यांना वाटलं, मी त्यांची खिडकी घेऊं पहात आहें. नी म्हणून त्यांनीं दाटीदाटीनें उभे राहून मला न बोलतांच मज्जाव केला!—

माझा जीव तर खालींवर होत होता. पण तोंडून शब्द बाहेर पडणें मला शक्य वाटत नव्हतं!—

मी पुन्हा घाबऱ्या मनानं त्या दाराला ओडगलेल्या आनंदांत गर्क असलेल्या तरुणाकडे पाहिलं; तों तेथें खिडकीचा कोंपरा व त्याचं अंग



यांत माझा हात जाण्याइतकी फट मला दिसली. मी पटकन् पुढं झालों नी त्या फटींतून घाईघाईनं हात बाहेर काढला.

तो पटकन् भानावर येऊन चमकून नीट सरळ उभा राहिला नी मला म्हणाला, "काय पाहिजे हो?.."

तेवढ्यांत मी सावधपणे मान व हात पुढं करून पाहिलं. दाराच्या कडीचा फक्त पहिला हस्ताच पार पडला होता.. ती पूर्ण बंद नव्हती.

मी झटकन् ती वर ओढली नी मग मला हायसं वाटलं एकदांचं!—

मग मी मान आंत घेतांना त्याला माझ्याकडे टवकारताना पाहून जणू स्वतःशींच पुटपुटलों, "नाहीं...जीव जरा गुदमरल्यासारखा झाला होता!...आतां रहा तुम्हीं उभे..."

या साऱ्या गोष्टी जवळजवळ मिनिट सव्वा मिनिटांत झाल्या होत्या.

माझ्या सर्वांगाला नी डोक्याला झालेला तो ताण जाऊन मी पूर्ण आंत व्हायला पुढलीं पांच मिमिटं गेलीं असतील.

शेवटीं एक निश्वास टाकून रुमालाला कपाळाचा घाम पुसून मी त्या तीन्ही जिवांकडे पाहिलं!..

तीं पूर्वीसारखींच अगदीं आपल्याच आनंदांत गर्क होतीं!

टळला ना अपघात!.. बरं झालं!..." मी आपल्याशींच म्हणालों पण माझ्या जिवाची पांच मिनिटांपूर्वींची धडपड यांना ठाऊकहि नाहीं! साहजिकच आहे!— पण अनर्थ ओढवला असला तर..."

तरी...तीं पुढलीं भयंकर चित्रं माझ्या डोळ्यापुढून सरकलीं!..

अर्धवट लागलेली कडी उघडली...'सूं ऽ ऽ खट् खट्'..आवाज.. दरवाजा सताड उघडा...दोघे जीव तेवढेच आंत...तिसरा जीव?.. दूर..दूर!! कोठें??..आरडा ओरडा थांबलेली गाडी...छिन्नविछिन्न निर्जीव कलेवर...हृदयविदारक आक्रोश...

मला सहन होईना तें कल्पनाचित्र !... मी डोळे बंद केले...पाटी पुसावी तसे डोळेच जोराजोरानें चोळले...नी पुन्हा प्रत्यक्ष सृष्टींत स्वतःला आणलं...

पूर्वीप्रमाणेंच तीं तिघेंहि अजून हसत होतीं; आनंदीत होतीं !..

आणि तो मधला भयंकर क्षण !...हो कायमचा नाहींसा झाला होता !.. अनादि अनंत काळांत विलीन झाला होता !..कोणाला त्याचा मागमूसहि राहिला नव्हता !..

आणि माझ्या जिवाची मुग्ध धडपड...तीहि आतां जगाच्या अंतापर्यंत पूर्णपणें विस्मृत रहाणार होती !.

कारण ? तो एक टळलेला अपघात होता !!...

पुन्हा तें मध्येंच तुटलेलं चित्र भरभरून पुढं जाऊं लागलं !..

तो क्षण त्याला आपल्या आयुष्याबरोबरच कायमचा पारखा झाला असता...

नि ती आपल्या पांढऱ्या कपाळावर हात टेकतांना तो क्षण सारखी आठवत राहिली असती !..

जिवावरचं हातापायावर गेलं असतं तर ?..त्यानेंहि तो क्षण आठवला असता आपल्या आयुष्यभर....

पण आतां !...तो क्षण...तो टळलेला अपघात...ती माझी निरपेक्ष पण महत्वपूर्ण धडपड....सारं कायमचं नाहींसं, विस्मृत झालं होतं !...

तें छबकडं अज्ञानानें हातपाय हालवीत होतं...

आणि त्याची ती आईबापें ? तींहि वाढलेलीं बालकेंच....

पण मला गंमत वाटली एकाच गोष्टीची !...

मी त्याला वांचवण्यासाठीं धडपडलों मधां !..पण त्याला क्षणभर वाटलं मी त्याची दाराजवळची जागा घ्यायलाच धडपडत होतों !..



असले टळलेले अपघात नी ते भयंकर क्षण लोक विसरतात याचं नाहीं कांही वाटत !..

--पण आपल्याबद्दल निरपेक्ष नैसर्गिक सहानुभूति दाखविणाऱ्या लोकांबद्दलहि सहानुभूतीनं विचार करायला लोक बहुधा विसरतात हें शल्य मात्र फार फार बोंचतं माझ्या मनाला !!!..

---

तारा : ८ : : **'ढालीच्या दोन बाजू'**

चाळिशीपुढें गेलेले गृहस्थ आणि नेहमी आपल्या घोंसदार मिशा, चालतांचालतां मधूनच लाडुकपणें गोंजारणारे !... ऑफिसमधील ओळख चांगलीच; पण म्हणून कांहीं जसा घरोबा होता असं म्हणतां येणार नाहीं !.

गिरगांव नाक्यावर अचानक ट्रॅममधून उतरले. आणि हें काय ?.. आज त्यांच्या मिशाच मुळीं जाग्यावर नव्हत्या..त्या या जगांतहि नव्हत्या !..

नेहमीची टोपी जागेवर नसली..नेहमीचा कोट अंगांत दिसला नाहीं किंवा धोतर नेसणारा मनुष्य सुटाबुटांत फिरतांना दिसला म्हणून तिऱ्हाइत मनुष्य कदाचित दचकला तरी फार मोठ्यानें दचकत नाहीं !..

पण मिशांची गोष्ट त्या यादींत पडत नाहीं !...आणि विशेषतः वर्षानुवर्षें मिशांत पाहिलेला माणूस आपल्या गुळगुळीत ओठांवरून हात फिरवीत असतांना दिसला कीं मनाचा मोठा गोंधळ उडतो एकाएकीं !..

त्यांतून तो मनुष्य त्या पूर्वींच्या पंधरावीस दिवस कामावर आलेला नसला आणि मग तसा पटकन् प्रथमच बिनमिशांत दिसला, म्हणजे त्या-

मागली परिस्थिति 'एक अधिक एक म्हणजे दोन' इतकी स्पष्ट होते कोणालाहि !.

वयस्क माणसं आणखी एक गोंधळ करतात. एखादी गोष्ट दुसऱ्याला वरवर दिसणाऱ्या खुणाखुणांवरून सहज समजेल हें त्यांच्या कधींच लक्षांत येत नाहीं. आणि ते ती गोष्ट अगदीं स्पष्ट शब्दांत आपणच सांगून टाकूं पहातात !..

आपल्याबरोबर आपण पूवा एकदोनदां पाहिलेल्या सिनेमाला आपल्या मित्राला नेऊन..." आतां लक्ष्या त्याला दोन ठोसे लगावील... मग तेवढ्यांतच तिची मोटार मागे ब्रेक लागून थांबेल" वगैरे वगैरे पद्धतीनं सगळा सिनेमा लहान मुलाला सांगतात त्याप्रमाणं तोंडानं आधींच तयार करणाऱ्या मंद बुद्धीच्या माणसाची अशावेळीं आपल्याला आठवण झाल्यावांचून मात्र रहात नाहीं !.

ते या माळेतलेच होते. आणि ते समोर दिसल्यावर त्यांच्या गुळगुळीत चेहऱ्याकडे क्षणभर दृष्टी स्थिर होण्यापूर्वीच जरा पडका चेहरा करून त्यांनीं आपणच पुकारलं, "चमत्कारिकच झालं बुवा !..शेवटीं आमचे वडील आम्हाला पंधरा दिवसापूर्वी एकदम सोडून गेले...आतां हाच सकाळीं नाशकाहून परत आलों एवढंच.."

त्या बातमीनं घोटाळा उडणं साहजिक होतं. एवढ्या प्रौढ माणसाचे वडील जगांतून गेले; अर्थात् सत्तराच्या घरांतलं एक पिकलं पान निस्सत्व होऊन शेवटीं गळालं !..घरांतलं एक शुष्ककाष्ट गेलं असंहि त्यांना वाटणं साहजिकच असेल.

आणि म्हणून कोणाला बिनधोकपणें म्हणावसं वाटलं अशावेळीं, कीं..." चाललंय !..माणसाचा वियोग वाईट खरा ! पण 'जातस्यहि ध्रुवो मृत्यु'.. आणि 'मरणं प्रकृति शरीराणाम'..पुन्हां वय झालेलं !..मनाची समजूत करून घेतली पाहिजे ! नाहीं कां ?"..



आणि तेंच त्यावेळीं ते समोर भेटल्यावर झालं !...

पण त्यामुळें पुढला दुसराच एक अनर्थ झाला !..

त्यांचा चेहरा एकदम पालटला !..त्यावर जगांतला सारा त्रागा उतरला होता... त्यांत आणखी रागाच्या सूक्ष्म छटा मिसळलल्या दिसत होत्या !... दुःख व चुटपूट यांचीं स्पष्ट प्रतिबिंबें पडलीं होतीं !...

आणि म्हणूनच ते शेवटीं जणू अगदीं हमरीतुमरीवर आल्याप्रमाणं कडाडले !..." तुम्हाला काय सुखासुखी संस्कृत वाङ्मयाचं मंथन करायला नी तें आम्हाला कोळून पाजायला ?..मोठे आले तत्वज्ञानी तत्वज्ञान सांगणारे !..आतां उद्यां वाण्याच्या बिलाची, दुधवाल्याची नी घरमालकाच्या भय्याची, तिहेरी गदा माझ्या पगारावर येईल तेव्हां तुम्ही नि तुमचं हें तत्वज्ञान नाहीं येणार आहे माझ्या मदतीला धावून !!.."

त्यांच्या वडिलांच्या मृत्यूचा नि त्यांच्या घराकडे अगदीं न चुकतां चळणाऱ्या या मासिक जळवांचा काय संबंध ? याचं कोडं सुटण्यापूर्वीच ते रागानं म्हणाले, "आमचे बाबा ओसरीवर नुसते खोकत पडत ! पण त्यांच्या खोंकण्याच्या आधारावर मी हजारों वाणी नि दुधवाले दमांत परतविले !..अहो, ते सरकारी पेन्शनर होते !!.."

माझ्या चमकण्याची पाळी खरीच ती !..

पण एक मात्र निश्चित ठरलं त्यावरून...

ढालीप्रमाणंच कोणत्याहि बाबीला दोन बाजू असतात !...

## तारा : ९ : : “खोट्याचा सासुरवास”

वास्तविक ज्या जगांत माणसंसुद्धां माणसाला खातात तिथें माणसें कांहीं निर्बळ प्राणी खातात या गोष्टीचे एवढें गुपित नी अवडंबर कां केलं जावं हें मला तरी अजून कोडंच आहे एक मोठं थोरलं!...पण त्यामुळेंच माझ्या लहानपणींहि माझ्यापुढं एक मोठं कोडं उभं राहिलं होतं! —

त्याच सुमाराला आमच्या शेजारीं एकाएकीं गोरक्षणाचं बंड सुरू झालं होतं. एकाएकी अशी पीडित गाईंची संख्या जगांत कां वाढावी व त्यासाठीं आसपासच्या लोकवस्तीलाहि रविवारच्या सुटीच्या दिवशीं पीडित केलं का जावं अशाप्रकारचं कोडं डोक्यांत येण्याचे कांहीं ते दिवस नव्हते; त्यामुळें आम्ही आपले आ वासून पहात असूं तो प्रकार! —जो उठला तो खांद्याला झोळी अडकवून “उठा या घाला! उठा या घाला! बंधूनों, गोग्रासाला!...” अशा ललकाऱ्या मारू लागलेला दिसे!

किती लोक स्वतः उठून ग्रोग्रास घालीत असत याची कल्पना नसली तरी माझं छोटं डोकं मात्र तत्काळ उठत असे!...

या गोग्रासाच्या कळपांत माझे कांहीं नातेवाईक भराभर शिरले होते! आणि त्यांनी आठवड्यांतून दोन दिवस झोळी खांद्याला लावण्याचं व्रत घेतलं होतं!...

झोळी लावण्याची ती कल्पना कितीहि पुण्यप्रद असली तरी आपल्याला काहीं ती कला पसंत पडेना!

गोप्रतिपालक ब्राम्हणांचं व्रत आमच्या हत्याहारी माणसांनी घेतलेलं!... पुन्हां जगांतला भयंकर रोग म्हणजे न्यूनगंड! तोहि त्यांना झालेला! त्यामुळें आमच्या घरांतली ही गोसेवक मंडळी मासळी बाजारांत



इकडे तिकडे संशयी मुद्रेनें पहात शिरत! नी खरेदी केलेला ‘बाजार’ घरीं आणताना, पिशवीच्या तोंडावर मुळ्याच्या पाल्याच्या जुडया नी उभे ठेवलेले भेंडे भरत असत!

पण कोंबडं झांकून उजाडायचं कसं थांबवणार?... आम्हाला त्यावेळीं दोन प्रकारच्या दातांची कल्पना नव्हती!...आमचे पहिले दांत अजून सगळे पडायाचे होते! —

काहीं असो, गोपालक ब्राम्हणांना गोब्राम्हणप्रतिपालक छत्रपति शिवाजींचा गनिमी कावा मात्र ठाऊक होता हें नक्कीच!—

कारण एक दिवस आम्ही खेळत खेळत तिथल्या तांदळाच्या गोरक्षक राशी नी पैशांचा पुण्यप्रद खुर्दा पहात असतां तिथले तुळशीमाळा घातलेले हिशेबनीस मज पोराबरोबर हसत हसत गप्पा मारूं लागले!

‘झोळया व पुण्य’ याचं प्रथम समीकरण तयार झाल्यावर त्या पुण्याच्या कल्पनेंतूनच त्यानीं माझ्याकडे आपले भेदक डोळे रोखून मला पटकन् विचारलं “तूं खातोस कारे?”

तो प्रश्न वरून निरुपद्रवी असला तरी त्याचा गुप्त अर्थ मला नेहमीच्या संस्कारानें समजत होता. मी त्यांच्याकडे पाहूं लागतांच त्यांनीं डाव्या हाताच्या तळव्यावर उजवा हात उभा आपटून खूण केली! मला त्यांच्या मनांतील कल्पनेचं पूर्ण स्पष्टीकरण झालं! —

आणि मी शिसारी आल्यासारखं दाखवून पटकन् म्हटलं, “शी शीः!—मी नाहीं खात...माझे वडील नाहीं...आमच्या घरांतलं अगदीं कोण्णी कोणी नाहीं!...”

“आणि तेरे ऽ तुझे......?!” त्यांनी निरनिराळ्या व्यापक खुणा करून, त्यांच्या गोटांतील माझ्या साऱ्या नातलगांची मला जाणीव करून दिली...नी खोंचकपणें माझ्याकडे पुन्हां पहायला सुरवात केली!

मी भाबडेपणें ऐसपैस मान हलवत म्हणालों, “हं...ते मात्र

खातात सगळे !...बुधवारीं,...रविवारीं, आणखी देखील कधीं कधीं !"

मी आणखीहि त्यांच्या इच्छेनुसार खुलासेवार माहिती पुरविली असती !...मला वाटलं जिथं खरं आहे तिथं डर कसली ?...

पण माझी मुलाखत संपते न संपते तोंच दाराआडून लखूनं एकदा माझ्याकड चमत्कारिक नजरेनं पाहिलं नि तो धांवतच घराकडे पळाला !

फिफ्थ कॉलमची कल्पना त्यावेळीं कोणालाच समजली नसती; पण मग मला कांहींतरी चुकलंसं मात्र खास वाटलं !

मुलाखत अर्धवटच टाकून मी बाहेर पडलों आणि दोन तीन मिनिटांनी आमच्या एकत्र कुटुंबाच्या वास्तव्यस्थानीं जाऊन पोहोंचतों तों...

लखूनें टाकलेल्या ठिणग्यांतून मोठा थोरला वणवा पेटला होता !... आणि तो विझवण्यासाठीं कीं अधिक पेटविण्यासाठीं कोणास ठाऊक माझ्या मोठ्या चुलत्याच्या दारांत घरांतल्या सर्व स्त्रीपुरुषांची ही गर्दी जमलेली मला दिसत होती !...

तीं सारीं माझीच वाट पहात होतीं ! कारण मी त्यांच्या दृष्टिपथांत येतांच त्यांच्यांतील प्रत्येकाची दृष्टी मला खाऊं कीं गिळूं या आवेशानं पाहूं लागली ! त्यांचे वटारलेले लाल डोळे पाहून एखाद्या लांडग्याच्या कळपांत एकट्या शेळीनं प्रवेश केल्याप्रमाणं मला वाटलं.

आणि माझे डोळे पांढरे होण्याची पाळी आली !– 'काकांचे जेविं थवे भ्रष्टल्या पिला.'

"बेशरम, नाहीं नाहीं त्या उलाढाल्या रोजरोज करीत असतो नव्या !.. तुला कोणी सांगितले होते हे नसते उपद्व्याप ?.." माझ्या चुलत्यांचा गडगडाट झाला.

मी मांजराच्या टप्यांत सांपडलेल्या उंदराप्रमाणं अगदीं हूं कीं चूं



केलं नाहीं ! मात्र त्याच्यासारखीच हळूच पळवाट पाहिली !

तेवढ्यांत चुलतीनें माझा रस्ता अडवला !.. आणि माझ्या पायावर नक्षत्र पडलं असल्याचा व माझ्या तोंडांत तीळ भिजत नसल्याचा निर्णय दिला व संध्याकाळीं 'भाउजी' येतांच बंदोबस्त करण्याची धमकी दिली.

"बंदोबस्त म्हणजे काय ?– वडिलांनाच सांगणार !.." हा विचार मी गप्प गप्पच बाजूला होतांना माझ्या डोक्यांत विजेसारखा चमकून गेला !.. मला त्या बुवांनी विचारलेल्या प्रश्नांची माहीत असलेलीं खरीं उत्तरें दिलीं होतीं मी, वास्तविक !..

पण तरी साऱ्यांच्या रागामुळें वडील संध्याकाळीं मुंबईहून परतेपर्यंत एका खोलींतील कोपऱ्यांत धुमसत बसलें मी !–

शेवटीं वडिलांचीं पावलें व लहान मोठ्या मंडळींच्या फिर्यादींचे निरनिराळे आवाज ऐकून मी भानावर आलें.

धंदेवाईक न्यायाधीशच ते !.. त्यांनी मला 'समन्स' काढलं. बाबू, बापू वगैरे बेलीफ आले. मी नाइलाजानें त्यांच्या पाठोपाठ गेलों.

कधींच मारणार नाहींत ते आजच सक्त शिक्षा काय करणार ? कबूल होतं मला ! पण शाहाण्याला शब्दांचा मार ! नीं पुन्हां माझी खरी बाजू असून या वादी लोकांनीं मलाच प्रतिवादी केलेलं !..

मी त्यांच्या पुढें उभा राहिलों ! हळूच वर मान करून पाहिलं. वडील किंचित गालांतल्यागालांत हंसले !.

मला न्यायदेवतेनें पहिला अनुकूल कौल दिल्याचा भास झाला !–

मग त्यांनीं साऱ्या बेलिफांना बाहेर जायचा हुकूम केला. आणि मला जवळ घेऊन माझी–'इन कॅमेरा'–जबानी घेण्यास सुरवात केली...

"खरं कारे सारं म्हणतात ते ?– अं ऽ ?"

"हो!.. मग खात नाहींत वाटतं ते?,."

"पण आपण लोकांना सांगायचं नसतं तें!–"

"कां?.."

"कां काय, वेड्या?.. असं कोणी विचारलं तर आपण सांगावं, 'आपल्याला कांहीं माहीत नाहीं त्यांतलं!'"

"आपल्याला माहीत असलं तरी खोटं सांगायचं?–"

त्या प्रश्नानें ते किंचित् घुटमळले नी चांचरत म्हणाले, "अंऽ?" आणि मग न्यायदेवतेनं किंचित् थांबून निर्णय दिला,... "चल् वेडा!.. आतां खेळायला जा पाहूं!.. पळ!!"

ग्रहण सुटलं! कोर्ट संपलं!.. मी निर्दोषी ठरलों!!!– भाऊंचं रडं किंवा वडिलांची आरडाओरडहि घरी कोणालाच ऐकू आली नाहीं!–

पांच मिनिटांनी मी छाती वाजवीपेक्षां जास्त पुढें काढून ओटी-पासून तो स्वयंपाकघरापर्यंत तीन खेपा घातल्या!!-- ०

---

## तारा : १० : : "पैशाचं सोंग"

आधींच लहान मुलांच्या हातांत कोणी पैसे देत नाहीं. त्यांतून दिडकी दिडकी करून पैसा शिल्लक टाकण्याचे असिधाराव्रत जाणते जाणोत बिचारे; त्या लहान मुलांना तरी तें कधींच साधत नाहीं. तडकाफडकी रोख पैशाची जड वस्तूंत ते अगदीं प्रत्यक्ष किंमत करून घेऊं पहातात.



म्हणूनच 'पैसा खाणें,' 'पैसा उडवणें,' इत्यादि अनेक प्रकारचे योग त्यांच्या आयुष्याच्या सुरवातीलाहि (अगदीं निराळ्या अर्थानें) जुळून येतात.

पैशामध्यें कांहीं भयंकर प्रचंड शक्ति आहे हें अशा धकाधकीच्या जमान्यांत त्याला फारसं समजत नाहीं. क्वचित चार आठ पैसे खुळखुळले खिशांत कीं त्याला जग जिंकल्यासारखं वाटतं.

अशावेळीं तो एकाद्या झकपक दिसणाऱ्या दुकानासमोर उभा राहील. तिथला पांढऱ्या दाढीचा, वेलबुट्ट्याच्या दुमडलेल्या टोपीचा, एक हात मळकट जाकिटाच्या खिशांत घातलेला व आपला घोळवाला लेंगा थोडा वर उचलून कांचेच्या पेट्यांच्या लांकडी फळकटांवरून सर्कस करीत चालणारा बोहरी म्हणजे "वत्सा, मी प्रसन्न आहे तुझ्यावर!– वाटेल तो वर माग..." असं जणूं काय आपल्या दृष्टींतून बोलणारा प्रत्यक्ष ब्रह्मदेवच (पैगंबर?) वाटेल त्याला.

त्या सर्व दुकानभर पसरलेल्या कांचेच्या पेट्या म्हणजे त्याला मिना बाजार वाटतील. त्यांत काय नसतं? सारी सृष्टीच आपलं विविध स्वरूप प्रकट करीत असल्यासारखं त्याला वाटतं. लुकलुकणारीं हिरवीं-तांबडीं पांढरीं बटनें, चकचकणारा लंबा टॉर्च, 'सोन्या'च्या क्लिपा धारण करणारीं पेनें......पण, पण त्या गोष्टींची कांटेकोर यादी करणं म्हणजे सृष्टीचा तपशील सांगण्यासारखं होय!.

तें नुसतं पहाण्यांतदेखील तो दहादहा मिनिटें रंगून जाईल एवढं खरं!...

आणि तसा कायमहि पहात राहील तो!...

पण मग तो बोहरी जागृत होईल नी त्याला विचारील "काय पायजे रे, छोकरा?..."

त्यामुळें त्याला आपण कोणी विकत घेणारा छोटा शेट्या आहों असं

दाखविणं लागलीच भाग पडेल. आणि मग प्रश्नोत्तरें सुरू होतील निर्विकार मनानें किंवा जणू त्या साऱ्या आपल्याच बाऱ्या वस्तू आहेत अशा विचारानें सूक्ष्म पहाणी करणें हें त्याला त्यानंतर अशक्यच होईल !...

आणि मग तो बोहरी पुढें विचारूं लागेल, "तुल् काय पायज्ये, बोऽल !..."

"या विजेच्या दिव्याची किंमत ?"––"दोन रुपये"

"या पेणसलीचं रे काय ?" "अस्सल ब्रिटिश हाय् ! बारा आणे."

"न् हें पेन ?"...."त्याला तुजेकडन् अढाय रुपया घेलू !"

जवळ जवळ पांच मिनिटें हा चुरशीचा सामना चालेल ! पण त्याचं पैशानं 'तद्दन' खोटं सोंग फार वेळ टिकणार नाहीं !

एकदम नवी स्फूर्ती आल्याप्रमाणं तो बोहरी आपल्या दाढींतून उजव्या हाताचीं चार बोटं ओढून त्याला शेवटीं रोखठोक सवाल करील; नी पुरावा दाखवायला सांगेल, "अरे समदा मागते कशेला खालीपिली ! आंदी तुजेकड् पैसा हाय खिशामंदी !!... बताव पावू...पयला..."

सुरवातीसुरवातीला त्याच्या या सरळ सवालानेंच तो गोंधळावयाचा. आपली कुवत समजून न्यूनगंडाच्या भावनेनं भारल्यासारखं व्हावयाचं त्याला...नी तो हळूच काढता पाय घ्यायचा हें ठरलेलंच नक्की !–

पण एकदां पैशाचं सोंग आणल्यावर तें पुरं तडीला नेणं भाग असतं, हें त्याला पोरपणींहि हलुहळूं पटेल !—अनुभवांनीं. तो नवे आराखडे बांधेल व बोहऱ्यानें तो प्रश्न विचारून पैशाचा पुरावा त्याला विचारला, कीं सरळ आंतल्या खिशांत हात घालून, तेथें चारसहा दिडक्या कां असेनात, त्याच बेडरपणें खुळखुळवूं लागेल तो पुढें पुढें !––

ही गोळी रामबाणाप्रमाणें लागू पडेल नी मग पुन्हा साऱ्या वस्तू न्याहाळण्याचा नवा परवाना त्याला मिळेल !



बोहरी धन्दा करायला बसलेला...त्यामुळें आपण सांगूं तीच किंमत बाजारांत येणार नाहीं, हें तो जाणून असेल ! आणि त्या बालवीराला सर्व वस्तू पाहिजे असल्या, तरी एकहि वस्तू घेण्याची ताकद नसल्यामुळें, आपल्याला निदान किंमत करायचा अधिकार जन्मजातच आहे या गोष्टीची जाणीव होत जाईल हळूहळू त्याला...

आणि मग त्यामुळेंच त्या पूर्वीच्याच प्रश्नोत्तरांना जरा निराळं स्वरूप मिळेल तें असं––

"दोन रुपये दिव्याचे ?.. आठ आणे देईन ! "लऽऽयू शेणा .."

"आमच्या शाळेंतल्या एका मुलानें तीन आण्याला शिशाच्या तुकड्यांसह घेतली होती पेणसील असली !..."––"अरे ज्याऽ !..आमी नाय देते !"

"मुम्बईला १५ आण्याला हें पेन मिळतं !—" "खारा पानी पिवून ये मग !"

या प्रश्नोत्तरांत आपलं बिनधोक निरीक्षण तरी चालूं शकतं व आपल्या रिकाम्या खिशांतील 'पैशाचं सोंग' आपल्याला पाहिजे तेवढा वेळ चालू रहातं अशी त्याची अगदीं शेवटशेवटपर्यंत प्रांजल कल्पना असते. त्यांत कसला धोका असणार असं त्याला स्वप्नांतहि वाटत नाहीं.

कारण हें सोंग चालू ठेवतांना नी ती बतावणी करतांना नेहमी त्यानें सांगितलेल्या किंमतीचा एक पंचमांश करून त्यांतून एक आणा वजा करायचा ! नी सौदा पटवण्याचा प्रामाणिक आव आणायचा, असा सुरक्षित मार्ग अनुभवानं ठरवलेला असेल त्यानं...

पण एखाद्या दिवशीं घोटाळा होईल नी पैशाच्या सोंगाचं त्याचं बेंडच फुटेल...चमत्कारिकपणं !.

त्या दिवशीं सर्व गोष्टी नेहमीप्रमाणं सुरळीत पार पडतील नी प्रश्नो-

त्तराचा सौदा ठरवण्याची दुसरी फैर सुरू होईल...

"हें पेन आठ आण्याला देतोस तर दे ..." "रुपया देते काय ?..."

"नको, आतां सात आणे देईन !" "बरा तुला बारा आनेला लेऊन ज्या, लेते तो !..."

"तूं आणखी कमीजास्त करूं नको !..सहा आण्याला देऊन टाक !..—"

तो बोहरी क्षणभर उन्दराकडे पहाणाऱ्या मांजरी दृष्टीनें त्याच्याकडे पाहील ! नी मग म्हणेल 'चल काढ पांच आनां' नी तें पेन आपल्या हातांत अगदीं बंदुकीप्रमाण धरून तो बोहरी ते शब्द उद्गारील !..

गरीब बिचारा पोर भयंकर दचकेल !-- त्याच्या अंगाला कांपरं सुटेल. नी अगदीं दरदरून घामहि सुटेल !...

क्षणभर खिशांत हात घातल्यासारखं तो करील; मग तो मनांतल्या मनांत स्वतःला 'घुम् ज्याव' म्हणेल; नी त्या बोहऱ्यानें त्याची मानगुटी पकडण्यापूर्वींच, कमरेजवळपास पाय पोंचवीत, सुमारें वीस मैलाच्या वेगानं तो धूम ठोकेल.

—आणि त्या प्रसंगानं त्याला इतकी कायमची दहशत बसेल, कीं चांगला मोठा झाल्यावरसुद्धां तो त्या गांवीं गेल्यावर त्या बोहऱ्याच्या दुकानाच्या बाजूला आसपास फिरकायला भयंकर घाबरेल !

---

## तारा ११ : : : "बोळक्याची लाज"

जगांत कांहीं चिंतातुर जंतु वळवळत असतात; त्यांना जगांतील साऱ्या घडामोडींची नोंद करण्यासाठीं ब्रह्मदेवानें नेमलेले आपण चित्रगुप्तच आहों असा वारंवार भास होतो. आपल्याच सुखदुःखांत ते रमण्यापेक्षां दुसऱ्यांच्या सुखदुःखाच्या कांटेकोर चांभारचौकशा करून त्यांतच मोठेपणा, सुख, समाधान मानण्याची त्यांना भयंकर खोड असते.

आमच्या गांवीं एक असेच वृद्ध चिंतातुर जंतु आहेत. त्यांचं घर म्हणजे खेडेगांव व आमचं छोटं शहर यांचं जंक्शनच !– ते स्वतः नुसते सुखवस्तु आहेत; पण त्यांच्या या स्वभावामुळेंच त्यांच्या घराला पोलीस चौकीचं स्वरुप आलं आहे.

जणूं येणाऱ्या जाणाऱ्या साऱ्यांनीं त्यांच्याकडे हजेरी लावल्याशिवाय, त्यांच्या उलट तपासणीला तोंड दिल्याशिवाय त्या घरापुढून जायचं नाहीं !

वृद्धत्वामुळें त्यांना हातांत मोठी काठी घ्यावी लागते. मान थोडी थोडी हलते. दांतांनीं आपलं ठाणं उठविल्यामुळें गालांना आंत आंत ओढणारं फुप्फुसांचं आकर्षण कायम सुरूं असतं !-—

पण तरी त्यांना हा आपला पहारेकरी पेशा सोडणं अशक्य वाटतं ! त्यांना सहसा नामोहरम करण्याची कोणाची प्राज्ञा नसते !..

पण एके दिवशीं मात्र एक भयंकर प्रसंग घडला !.. त्यावेळीं मला वाटलं... 'तेथें पाहिजे जातीचे'... शेराला सव्वाशेर हा जगांत निर्माण झालेलाच असतो ! तो योग मात्र घडून यावा लागतो !..

त्यांच्या आयुष्यांतील तसला योग मला प्रत्यक्ष डोळ्यांनी पहायला

मिळाला त्या दिवशीं!..

एक बाजाराचा दिवस होता तो. विक्रीसाठीं आपला माल बाजाराकडे न्यायचा खेडवळांचा रस्ता तोच. त्यामुळें 'प्रश्नोतर शिकारी'ची तो दिवस म्हणजे पर्वणीच आमच्या शेजाऱ्यांना!..

कित्येक वर्षांचा अनुभव! त्यामुळें जाणारे येणारे सावधगिरीनेंच जाणार!.. पण बिचारे आमच्या शेजाऱ्यांना ते बचकत असत...

आमचे शेजारी फाटकापाशी रेंगाळत उभे राहून रस्त्यावर लांबपर्यंत पहात असत. कोणी दृष्टिपथांत दिसलं कीं आपले प्रश्न तयार करूं लागत! बिचारीं पोटामागें लागलेलीं तीं सारीं 'कच्चीं मडकीं' निमुटपणें त्यांच्या 'चावडी'वर हजेरी देत नी मग पुढल्या प्रवासासाठीं पाय पुढें टाकीत!..

त्या दिवशीं त्यांच्या आयुष्यांत पहिल्यांप्रथम एक 'पक्कं मडकं' अवतीर्ण झालं!

आणि तो अनुभव इतका भयंकर ठरला कीं नेहमी साऱ्या जगाची काळजी लागलेले आमचे म्हातारबुवा शेजारी तसे रस्त्यांत उभे राहून प्रश्नासाठीं तोंड उघडायलाहि त्यापुढे घाबरूं लागले!—

पांचसहा खेडवळ त्या दिव्यांतून शीरसलामत पार पडले होते.

तेवढयांत आकाशाच्या पार्श्वभूमीवर लांबून रस्त्यानें आमच्या घराच्या बाजूस येणारी एक नवीन आकृती दिसली.

आमचे शेजारी मोठ्यानें खोकले. त्यांनी आपल्या हातांतील सोटा आपल्या खांद्यावर ठेवला!..

सकाळींच हजामत केलेल्या आपल्या तुळतुळीत डोक्यावरून उगीचच हात फिरवला. आणि फाटकाजवळच्या माणसांकरिता केलेल्या झाप्याची खिळखिळी झालेली कडी एकाद्या सुताराची ऐट आणून घट्ट करण्याचा प्रयत्न करीत ते उभे राहिले.

पण त्यांची दृष्टी खरें पहातां त्या पुढें येणाऱ्या आकृतीकडे लागली होती. खोल गेलेल्या त्यांच्या डोळ्यांत त्यांचें जन्मजात कुतूहल ओतोप्रत तरंगत होतें. नेहमीच्या त्यांच्या रिवाजाप्रमाणें 'उलट तपासणी'चे सारे प्रश्न त्यांच्या मनांत एकवटून घोळूं लागले होते.



तेवढ्यांत ती पुढें येणारी आकृती अगदीं स्पष्ट झाली.

ती एक उंच नीच वारली जातीची तरुणी होती. तिच्या डोक्यावर भाजीची भरगच्च टोपली होती. तिचा चेहरा घामानें डबडबला होता. सरळ नाक, काळे डोळे, सावळी कांती, कानांतील पिवळ्या मोठ्या बाळ्या यामुळें ती विशेष आकर्षक दिसत होती. कोपरापर्यंत चोळी असलेले तिचे दोन्ही हात पाटीवर होते. अदबीनें तिनें पदर वक्षस्थळावरून घट्ट घेतला होता. व तो कमरेला खोंवला होता. गुडघ्यापर्यंत पोंचणाऱ्या जाडजूड लुगड्याचा तिनें काचा मारला होता. व धांवत्या चालीनें ती अनवाणीच लगबगीनें जात होती. त्यावेळीं तिच्या सावळ्या पण मांसल भरघोंस पोटऱ्या मोठ्या गमतीदारपणें हलत होत्या!

ती फाटकासमोर येतांच आमच्या शेजाऱ्यांनीं तिला मोठ्यानें हटकलं, "काय ग ए! थांब.. उतर टोपली खालीं..."

त्या अनपेक्षित हुकुमानें ती किंचित् दचकली.

पण माल विकून पैसा करायलाच ती बाहेर पडली होती. तिनें कांहीं न बोलतांच आपले तीक्ष्ण डोळे एकदां समोरच्या म्हाताऱ्याकडे रोखले; व तिनें आपली टोपली वरच्यावर झाप्याच्या आधारावर उतरली.

म्हातारबुवानीं मेथी, कोरळ, अंबेलीकेळी, दुध्या, वगैरे टोपलींतील भाजी वर खालीं केली.

तरी ती गप्पच उभी!...

पण तरी संवयीमुळें त्यांना शेवटीं राहवेना. ते आपल्या मनांत

उफळणाऱ्या कुतूहलाला संतुष्ट करण्यासाठीं तिला विचारूं लागले...
'कोणत्या ग गांवची तूं?"

"मल्हाळीची!.. काय घ्यावाचा?" ती घाम पुसत म्हणाली; त्यावेळीं तिचा निरोगी रेखीव चेहरा अगदीं मोहक दिसत होता.

"कधीं बाजाराला जातानां दिसली नाहींस पूर्वी?" त्यांनीं आपल्या प्रश्नावलींत एक ओघानेंच पुढें येणारा आगंतुक प्रश्न टाकला.

"औंदाच घ्येतली वाडी आमी लावाया!.." तिनें नाखुषीनेंच त्या चौकस प्रश्नाला घाईनें उत्तर दिलं.

पण तरी ती पुढें म्हणालीच, "घ्यावाची असल भाजी तर भाजीचा भाव कर, डोकऱ्या! मना वखत होतो!.."

"तुझा नवरा कोण ग?" आमच्या शेजाऱ्यांनीं स्त्रियांना विचारावयाचा आपला नेहमीचा प्रश्न नंतर दोन निष्पापपणें तिच्या पुढें टाकला.

"थेरड्या, मेल्या...तुला रे कलाऽपायजे?.. बोळक्याची लाज धर!.." ती लगबगीनें टोपली डोक्यावर चढवून रस्त्याकडे वळत म्हणाली.

त्यावेळचा तिचा फणकारा, तिची चमकणारी नजर, स्वाभिमान यामुळें ती विजेप्रमाणें मोहकतेनें तळपल्यासारखी दिसली मला!-

पण आमच्या शेजारच्या चिंतातुर बुद्रुकांना मात्र त्या अनपेक्षित विजेचा भयंकर धक्का तेवढा बसला. त्यांचा तोल गेल्यासारखं त्यांना वाटलं.

फाटकाचा व हातांतील काठीचा कसाबसा आधार घेऊन त्या लगबगीनें लांब जाणाऱ्या जगदंबेच्या पाठमोऱ्या आकृतीकडे ते कितीतरी वेळ सुन्न होऊन पहात होते.

---

## तारा : १२ : : "भटो भटोऽऽ"

शेजारच्या नाना-माईच्या पोरकट खेळांत मी एवढा कसा गुंगलें होतो कोणास ठाऊक!

शेवटीं 'भटोभटोच्या फणसाचे गरे' त्यांनी वाटले नी गऱ्यांऐवजी गुरांच्या वाटचीं चारखंडे जेव्हां मला निमूट खावीं लागलीं, तेव्हां कोठें मी भानावर आलें. आणि अगदीं मनमुराद हंसत सुटलें.

तीं गोड पोरटीं गेलीं भराभर निघून नी त्या विचारी मनःस्थितींत माझ्यापुढें दुसरींच कांहीं बिलंदर पोरें उभीं राहिलीं!-

प्रथम मला तो भयंकर देखावा दिसला! माझ्या डोळ्यांत अश्रू आले.

आपल्या मामाला आणायला हिंदु कॉलनींतून स्टेशनवर एकटाच गेलेला माझ्या एका मित्राचा सात वर्षांचा मुलगा!..

"पैसे नाहींत तिकिटाला!.. जाऊ आंत?" म्हणून तिकिटकलेक्टरला मोठ्या गोड शब्दांत त्यानें विचारलें, नी तो छोटा वीर पुढें सरकला.

"पण देशील काय तूं मला?" त्यानें त्याचं कौतुक केलं.

"माझ्या मुंजीला तुम्हाला जेवायला बोलवीन्" त्यानें आंत शिरून ऐटींत हमी दिली!

मामांना घेऊन घरीं गेल्यावर, त्याच्या वडिलांनी कौतुकानें विचारलं, "गुलामा, साऱ्यांना मुंजीच्या जेवणाचं आमंत्रण देतोस? खूप गर्दी नी खर्च होईल हो!"

"नाहीं जमलं आपल्याला, बाबा, तर नुसती पानसुपारी वाटूं

आपण!" त्यानें सल्ला दिला.

सगळीं मोठ्यांनें हंसलीं! हसतां हसतां त्यांनी त्याच्या भवितव्याचा मनांतल्या मनांत दिव्य स्वप्नें रेंखाटलीं!

पण पंधरा मिनिटांतच दुःखाचा कडेलोट झाला! मोठ्या उत्साहानें मामांसाठीं तो 'यज्ञदानी'तून बिस्किटांचा पुडा आणायला गेला!.. नी खाडकन् एका अजस्र लॅारीच्या भक्ष्यस्थानीं पडला!..

कळस झाला तो हॉस्पिटल मध्यें इतर बडबडीबरोबर जगाचा निरोप घेण्यापूर्वी पांचच मिनिटें आधीं त्यानें सांगितलें. "माझी एक नवी वहाण पायांतून आली; पण दुसरी तिकडेच पडली असेल तर घेऊन या जा मामा!"

खोलींत बसल्याबसल्या तें समोर दिसणारें भयंकर दृश्य पुसून टांकण्यासाठीं मी माझे दोन्ही डोळे खसखसा चोळले.

मग मला हसूं आलें. कारण मला भिंतीवर चित्रपट चालल्यासारखा एक गोड देखावा दिसूं लागला.

माझ्या पांच वर्षांच्या भाच्यासह मी बैलगाडींतून चाललों होतों... नुकतीच विकत घेतलेली पांच शेर साखरेची पुडी त्याच्याजवळ ठेऊन स्वतःच बैलगाडी हांकत होतों मी.

थोड्यावेळानें मागें वळून पहातों तों...स्वारीनें पिशवीला गादी-खालच्या गवताच्या काडीनें हळूंच भोंक पाडलें आणि साखरेचे कण हळूंहळूं गाडीखालीं रस्त्यावर पडत असलेले! आणि पुन्हां स्वतः साखर कशी पडत आहे, तें पहात होता निरखून!—

"अरे काय हें पुर्षा"—मी रागानें ओरडलों, "दिसत नाहीं तुला साखर सांडते आहे ती?—"

पण तो मजकडे एकदां पाहून पूर्वीइतकाच शांत निरीक्षक चेहऱ्यानें खालीं पडणाऱ्या साखरेकडे पहात मला कुजबुजत म्हणाला, "हं! थांबा-



थांबा, मामा!.. पडूं दे!.. रस्त्यावर खूप खूप मुंग्या असतलि ना?.. त्यांना होईल ती साखर!

प्रथम क्षणभर माझ्या कानांवर माझा विश्वासच बसेना!.. नी मग त्या जैन महात्म्याच्या हातून ती साखरेची पुडी सोडवून घेतांना मला हंसावें कीं रडावें तेंच समजेना!

ती परस्परविरोधी पण स्मृतिमय झाल्यामुळें सारखींच सुखद वाट-णारीं दृश्यें माझ्यापुढून जात होतीं तोंच नाना—माई पुन्हां दुडुदुडु धांवत येऊन माझ्या खांद्यापाठीवर चढूं लागलीं...

मला वाटलें ही त्या पहिल्या चित्रांत चमकून नाहींशा झालेल्या गोड बाळासारखीं वर्षानुवर्षें त्याच बालस्वरूपांत दिसतील का मला?.. नाहीं, आणि तेंहि मला सुखद आहे!

पण ही बालस्वरुप मूर्त सुखें! हे आनंदकंद माणसाच्या मनाला आपपरभाव विसरायला लावून किती वेड लावतात!.. त्याच्या दुःखांत त्याला विरंगुळा आणतात! त्यांची असली अतिमानुष लीला काय किंवा अगदीं पोरकट वटवट किंवा वागडणें काय कोणत्याहि माणसाला देहभान विसरायला लावतात! कित्येकदां विचारी बनवतात!..

पॅटमूर कवीचें असेंच झालें होतें!— तो आपल्या मातृविहीन मुलावर रागावला!.. तें छबडें कष्टी होऊन रडरड रडलें! शेवटीं आपल्या खेळाचा सारा पसारा आपल्या भोंवतीं पसरत आपलें मन आपणच रंज-विण्याचा प्रयत्न करीत दमून भागून झोपीं गेलें!.. पॅटमूर विचारांतून भानावर येऊन बाळाच्या खोलींत जाऊन पाहूं लागला तों तें गाढ झोंपेलें!..

अत्यंत पश्चात्तप्त मनानें तो मनांतील देवाला म्हणाला, "आम्हींहि तुझीं बालकें,...यांच्यासारख्याच चुका करतों...त्याहून थोर असे अपराध करतों!.. मन रंजविण्यासाठीं भोंवतालच्या निर्जीव निरुपयोगी पसाऱ्यांत

असेच गुंतून शेवटीं झोपीं जातों!.. तूं मात्र आमचे अपराध पोटांत घालून आमच्यावर दया करतोस!.. आणि आम्ही या मुलांशी वागताना मात्र...”

आपणहि असेच अनेकदां पॅटमूर होतो!— हीं आपल्या गृहोद्यानां-तील फुलें...आपल्याला व इतरांना सारखीच आनंदी करतात, शांतता देतात!...तीं जेवढा पल्ला गांठतात तेवढा कधीं कधीं आपल्यालाहि गांठता येत नाहीं!..

पण त्यांचा सहवास—सुगंध बिचाऱ्या दुर्दैवी चार्ल्स लँबला लाभला नाहीं!.. संकटपरंपरा नी निराशा यांनीं त्याच्या आयुष्यांतील हें सुख अपूर्णच राहिलं!..

—आणि म्हणून त्यानें स्वसमाधानासाठीं ‘कल्पना बालकें’ खेळवली!...हो, त्यामुळेंच त्याची उत्कृष्ट कला निर्माण झाली!...

---

## तारा : १३ : : सोदे आणि मंडळी

दुसरी घंटा व्हायची वेळ झाली नी माझ्या मित्राला आठवण झाली-- “अरे, धूम्रनालिका नाहींत आणल्या...आतां परत येतो हं.”

आणि तो बाहेर पडेपर्यंत दिवे जाऊन जाहिरातीचे हिरवे निळे पिवळे प्रकाश पडद्यावर पडूंहि लागले होते.



“ हॅलो एव्हरी बॉडी, धिस इज्...” असला युनिव्हर्सल न्यूजच आवाज ऐकूं येत होता नी पडद्यावर गरगरणारी पृथ्वी हळूहळू अदृश्य होत होती, तोंच माझ्या शेजारच्या दाराजवळ जमिनीपासून साडेचार फूट उंची-वर एक धगधगता कमीजास्त प्रज्वलित होणारा निखारा दृश्यमान झाला. आणि मग काळोखांतून माझ्या बाजूस त्याचें भ्रमण होऊं लागलें.

शेवटीं माझा मित्र माझ्या शेजारी येऊन बसला. नी म्हणाला, “ तरी धांवत आलों मी...मला वाटलं न्यूजरील बुडतो मला !...कसेबसे पैसे मुठींत धरले नी आलों....मोजायलाहि वेळ झाला नाहीं....”

मी त्यानें दिलेली सिगारेट शिलगावण्यासाठीं काडी पेटवतांच त्यानें मूठ उघडी करून पुढे धरली...नी तो हळूंच पैसे मोजूं लागला.

त्याचे अर्धवट पैसे मोजून होईतों काडी चिमटीपर्यंत जळत येऊन मला चटका लाऊन विझली.

पण माझ्या मित्राला कसला चटका लागला होता पैसे मोजता मोजतां कोणास ठाऊक ?...तो मोठ्यामोठ्यानें हसत म्हणाला, “ दुसरी पेटव काडी, रे बघूं बघूं...”

मी दुसरी काडी पेटवल्यावर त्यानें पुनः सगळे पैसे मोजले नी ओरडला, “ सफ्फाऽ मेला साला इराणी !...पांच रुपयाची नोट देऊन मी साडेदहा आण्याचा खर्च केला !...नी हा आतां मला नऊ रुपये साडेपांच आणे देतोयू...”

तो पुन्हा विजयी आवाजानें हसूं लागला...आमचं दोघांचेंहि लक्ष सिनेमावरून साफ उडालं होतं !...

त्याला विजयानंद वाटत होता. मला त्या इराण्याबद्दल भयंकर सहानुभूति उत्पन्न होऊन हृदयांत कालवल्यासारखं झालं होतं!...शेवटीं, मी कोणत्याहि सज्जनाला येईल अशा संतापानें त्याचयवर ओरडलों,

लाज नाहीं रे वाटत हसायला !...त्या गरीबाला बुडवला सुखासुखीं ! ही सभ्य भामटेगिरी वाटतं !...चुकून दहाची नोट समजला तो..."

"दलित वर्गाचे कैवारी !...पीडितांचे मायबाप...भावनानिधी दया सागर !...खूप झाला तुमचा उपदेश !..." माझा मित्र आपण जरा आवाज चढवला याची जाणीव होऊन शेवटीं हळूहळू कुजबुजला..."चूक मी केलेली नाहीं...यानें केली....तिचें प्रायश्चित त्याला भोगलेंच पाहिजे..."

"अरे, पण चुकीच्या दंडालाहि कांहीं मर्यादा...."

"चूक म्हणजे चूक...तिला नैसर्गीक दंड ठरलेलाच असतो. आपण त्यांत ढवळाढवळ करायची नसते !..."

तरी मी त्याला ते जादा आलेले पांच रुपये नेऊन देण्याचा आग्रह करूं लागलों.

"मी ते नेऊन दिले म्हणजे काय होईल ?..."

"त्याला बरं वाटेल...आणि तूं प्रामाणिकपणें वागल्यासारखं होईल."

"मग मलाहि बरं वाटतंय् कीं, पैसे मिळाल्याबद्दल !...त्याला नेऊन दिले तर गल्ल्यांतले नाहींसे झालेले पैसे यानें प्रामाणिकपणें परत केले याची त्याला जाणीवहि नसणार ! पांच रुपये अचानक मिळाले, म्हणून तो फार तर 'थँक यू' म्हणेल...त्याची माझी ओळख ना देख...लाभ झाला म्हणून तो आभार मानील...तूं ह्मणतोस त्या माझ्या प्रामाणिकपणाबद्दल नव्हे !... तसला दुबळा प्रामाणिकपणा नको आहे मला !..."

मला त्याला तसें पटण्यासारखें उत्तर कांहीं देतां येईना ह्मणून मी फक्त उपहासानें त्याला ह्मणालों, "तुह्मी लोक नुसते सोदे आहां !... दुसऱ्याला लुबाडण्यांत तुह्मांला कांहींच वाटत नाहीं !..."

"चूप !...एका बाजूनेंच बोलूं नको !...समज मी त्याच्याकडे



रुपयाचें खाल्लें असतें...नी चुकून माझा खिसा मागून रिकामा दिसला असता...त्यानें केवढा मोठा देखावा केला असता ?...मला मवालीहि म्हटलें असतें...समज, त्यानें दिलेल्या नाण्यांतला एक रुपया खोटा आला असता...नी मी त्याला तो परत प्रामाणिकपणें द्यायला गेलों असतों...दिला असता बदलून त्यानें ? उलट कानावर हातच ठेवले असते !...माझ्या चुकीमुळें मला नुकसान अपमान सोसूं द्यायला कांहींच वाटलें नसतें. मग मीच कां खोटा तकलादी प्रामाणिकपणा दाखवूं ? तूं ह्मण बापडा मला सोदा ?...पण मग सारं जगच 'सोदे आणि मंडळी' आहे !...आज मी लबाडी न करतां, केवळ नरो वा कुंजरो वा करून पांच रुपये मिळवले... त्या प्रत्यक्ष लाभापुढें तकलादी प्रामाणिकपणा मला मुळींच दाखवण्याची इच्छा नाहीं ...."

मी फक्त एवढेंच त्याला ह्मणालों..."बरं, आतां लोकांना त्रास होतोय् तुझ्या बोलण्याचा. आतां गप्प सिनेमा पहा...नी मला पाहूं दे... तो गँगस्टर बघ बँकेवर हल्ला करतो आहे...चूप बोलूं नको !—"

---

## तारा : १४ : : : माणसांतला मी

• शाळेंत त्या दिवशीं उशीरां पोहोंचल्यामुळें अर्धा तास त्याला उभं रहावं लागलं. दुसऱ्या तासाला भूमितीच्या व्याख्या पाठ झाल्या नाहींत

म्हणून बांकावर उभं रहावं लागलं, आणि तिसऱ्या तासाला राजाराणी नी गुलाम यांच्या गल्लतीची हातचलाखी एकदम आंगलटी येऊन त्याला वर्गाबाहेर जावं लागलं शेवटीं !—

त्या चढत्या भांजणीला कंटाळून चौथ्या तासाला तो देवासारखा अगदीं गपचूप बसला होता; नी इतिहासाचे गुरूजी लिहीत असलेले फळ्यावरील सन तो टवकारून पहात होता.

तोंच शिपाई एक नोटीस घेऊन आला...

तिचा आशय एवढाच कीं...''गेले आठ दिवस गांवांत ठिकठिकाणीं जादू करीत असलेले प्रो. भुरटे आपल्या शाळेंतहि हातचलाखीचे व जादूचे प्रयोग दुपारीं करणार असल्यामुळें दुपारी सुटी आहे. तरी सुटीनंतर परत येतांना दोन आणे घेऊन सर्वांनीं यावयाचें.''

त्याचा आनंद गगनांत मावेना !...ज्या संधीची गेले दोन दिवस तो मोठ्या आतुरतेनें वाट पहात होता ती संधि तर तशी आपोआप स्वतःच शाळेंत चालून आली होती !...

शाळेंत यायला त्याला आज उशीर झाला होता; भूमितीच्या व्याख्या पाठ झाल्या नव्हत्या...पत्त्यांची जादू भर वर्गात करण्याचीहि स्फूर्ती झाली होती !

पण सर्वाला तें कारण एकच !...आणि तें म्हणजे प्रो. भुरटे !...

गांवांत चांगली मध्यवर्ती जागा न मिळाल्यामुळें त्याच्या वडिलांची परवानगी काढून, मामलेदार कचेरीजवळच्या पटांगणांत प्रो. भुरट्यांनीं मामलेदारांचाच तंबू ठोकला होता; नी त्यांत कचेरींतल्या खुर्च्या नी कचेरींतलींच जाजमें घातलीं होतीं !...यामुळें उपकृत वाटून त्यांनीं प्रेमानें मामलेदार साहेबांना आठ दिवसांच्या मुक्कामाचा फुकट पास दिला होता.

तें एक झोन तिकिटच होतं !— तरी पण स्पष्ट आणि उघडपणें ट्रॅन्स्फ-



रेबल होतं ! — तेव्हां मामलेदारांना जादूची व जाग्रणाची आवड विशेष नसल्यामुळें तें झोन तिकिट व त्याबरोबरच तंबूतली पहिल्या रांगेंतली मधली खुर्ची त्यांच्या युवराजाला — राजाला — लाभली होती !...

आणि त्याचा राजानें अगदीं पूरेपूर उपयोग केला होता; त्याचाच परिणाम साऱ्या हालचालींवर झाला होता. त्यांच्या त्या प्रयोगांपैकीं कांहीं विधायक धडपडींचाच आज परमोच्च बिंदू आला होता !

अगदीं आजच सकाळीं राजानें रात्रीचा दिवस व दिवसाची रात्र करून प्रो. भुरट्यांच्या तीन चार जादूंचा कसून छडा लावला होता !... व म्हणूनच तो आतां त्यांच्याशी दोन हात करायला, अगदीं आखाड्यांत दंड थोपटून उतरायला सज्ज झाला होता !—

भुरट्यांच्या जादूच्या पहिल्या दिवशीं, राजा वडिलांऐवजीं स्वतःच खुर्चीवर जाऊन बसला. दोन तीन खेळ पार पडले ! मामलेदार हजर नव्हते. (नी राजाला तर हट्ट करूनहि अजून वडिलांकडून आंगठी मिळाली नव्हती) म्हणून प्रो. भुरट्यांनीं त्याच्या शेजारी बसलेल्या अव्वलकारकुनांचीच आंगठी उचलली नी पुढला प्रयोग सुरू केला.

एका छोट्या पेटींत आंगठी घालून, पेटीची किल्ली प्रो. नीं राजाच्या हातांत दिली ! ती पेटी बारा पेट्यांच्या पोटांत घातली; तिच्या पार्सलला अगदीं लाखेनें सील केलं !...

मग एक अंडें फोडून एका डब्यांत टाकलं ! स्पिरिटनें तें साफ जाळूनहि टाकलं. डब्याचें झांकण बंद केलं.

मग मध्यें सोन्याचें अंडें घालणाऱ्या हंसीची व अंड्याला बांधलेल्या सिंदबादच्या सफरींची गोष्ट प्रोफेसरांनीं गमतीदारपणें सांगितली.

तीन मिनिटांनीं पार्सल फोडून बारा पेट्यांच्या पोटांतील पेटी

राजाच्या खिशांतील किल्लीनें उघडली ! पण तरीहि त्यांत अवलकारकुनांची आंगठी नव्हती !...

आणि मिनीटभरानें डबा उघडला तों त्यांत 'कॉ कॉ कॉ' करणारी काबऱ्या खवळाखवळांची कोंबडी निघाली नी तिच्या गळ्यांत पेटींतून नाहींशी झालेली आंगठी बांधलेली सांपडली !...

राजा केवढ्यानें दचकला !...भांबावला...आश्चर्यानें अगदीं पांच मिनिटें सारखा टाळ्या पिटीत राहिला !...

त्या रात्रीं घरीं गेल्यावर तर कितीतरी वेळ तो बिछान्यावर तळमळतच पडला होता...

पण 'भुरट्या' जादुगिरीचा पक्का तलास लावण्यासाठीं तो दुसऱ्या दिवसापासून मनानें एकदम गुप्त पोलीस रामराव झाला, त्यामुळें त्याला अनेक नवीन गोष्टी दिसूं लागल्या !

दुसऱ्या दिवशीं त्याच खेळाच्यावेळीं राजा सोन्याच्या अंड्याला किंवा सिंदबादच्या सफरीला बळी पडला नाहीं म्हणून त्याला टेबलावरील पार्सलजवळ मागल्या बाजूनें आलेला एक गुप्त हात चांचपडतांना दिसला व त्यानंतर तेथें एक छोटी पेटी – अगदीं त्याच पेटीच्या आकाराची – ठेवलेली दिसली. पार्सल फोडल्यावर अव्वलकारकुनांनीं पेटी हातांत घेतली पण ती अदृश्य हातानें ठेवलेली दुसरी पेटी होती. त्या अंडें जाळलेल्या डब्यांतून तसलीच खवळाखवळांची काबरी कोंबडी 'कॉक कॉक' करीत बाहेर पडली. राजा संशयी मनानें घरीं गेला.

दुसऱ्या दिवशीं राजा शाळेंत गेल्यावर दहा मिनिटांच्या सुटींत त्याला त्याच्या शाळेजवळच्या घरांत रहाणारा गबदुला पार्शी कोंबड्याच्या खिल्लारामागें धांवत असलेला दिसला ! – 'कॉ कॉ' आवाज करीत



कांहीं कोंबड्यापुढें नी तो पारशी त्यांच्यामागें, अशी शर्यत चालली होती. तेवढ्यांत एक कोंबडी 'कॉ कॉ कॉ' करीत जी उडाली ती सरळ राजाच्या अंगावर आपटली...तेवढ्यांत पारशीहि धावत येऊन त्याच्याजवळ आपटला व त्यानें त्या कोंबडीला पकडलं.—

राजा प्रथम ओरडून नंतर भानावर येऊन समोर पाहूं लागला आणि अतिशय दचकला !...तीच ती पट्ट्यापट्ट्याची काबरी काबरी कोंबडी ! प्रो. भुरट्यांच्या हातांत दोन दिवस ओरडत होती तशीच आतां त्या पारशाच्या हातीं ओरडत होती !—

आणि तोच तो पारशी ! – त्यानेंच प्रो. भुरट्यांच्या त्या गांवांतील जादूचा मक्ता घेतला होता ! – रोज तिकिटऑफिसजवळ राजा त्याला पहात असे, आणि तोच राजाचा पास – 'झोन' – पाहून त्याला आंत सोडीत असे !...

राजा, चारआणेमालांमधलें सर्व ज्ञान एकवटून खर्च करूं लागला !..आणि त्याच्या डोक्यांतील अनेक गोष्टींवर नवा प्रकाश पडला !...

पुढल्या दोन दिवसांत त्या काबऱ्या कोंबडीला, शाळेजवळ चरतांना नी प्रो. भुरट्यांच्या हातांत अगदीं एखाद्या ओळखीच्या माणसाप्रमाणें वावरतांना राजा ओळखूं लागला. आणि त्यापुढें तिसऱ्या दिवशीं छोटी पेटी टेबलावर ठेवणारा मागला जादूचा हात आणखी अनेकदां त्याला गोंधळ घालतांना दिसला !...आणखी पुष्कळ गोष्टींचा त्यानें छडा लावला.

आईनें जुन्या लुगड्यावर घेतलेला डब्यांत डबे असलेला 'सट' सकाळीं उठल्याबरोबर पळवून त्यानें सर्व कल्पना करून घेतली; पण ती होईपर्यंत शाळेला उशीर झाला होता !...त्यापुढें त्या दिवसाचे, प्रो. भुरट्यांच्या जादूच्या खेळाबद्दल नोटीस येईपर्यंतचे सारे अनर्थ त्यांच्यावर

कोसळले होते, आणि आतां दोन हातांना तो तयार झाला होता !–

आयती संधि चालून आली होती !—

दुपारीं आपलें ज्ञोन दाखवूनच तो पिशवीसह आंत गेला. प्रो. भुरट्यांच्या प्रयोगांना सुरवात होऊन पत्याच्या जादूंतून ते पेटी कोंबडी आंगठीच्या जादूपर्यंत येऊन पोहोंचले.

राजा छाती पुढें करून सरसावून बसला !...त्याच सार्‍या गोष्टी होऊं लागल्या...हंसीचें अंडें प्रो. भुरट्यांनीं सुरू करतांच तो पाळत ठेऊन म्हणाला...'हात संभाळा !'...सिंदबादची सफर चालली असतांना तो अर्धवट उठून म्हणाला, "पेटी बदलली !"

दोन्ही वेळां प्रो. भुरटे दचकले !...गोष्टींत मध्येंच तो बडबडतांना पाहून मुलें ओरडलीं ! – मास्तर रागावले !...प्रो. भुरट्यांनीं एकदां तिरक्या डोळ्यांनीं राजाकडे पाहिलं !...

तो खेळ संपला; आणि मग प्रो. भुरटे सर्व मुलांना म्हणाले, "तुम्हांला कोणाला येईल का हें ?"...

मुलें भांबावून गप्प राहिलीं आहेत नाहींत तोंच राजानें उठून पुकार केला, "हो मी सांगतों..."

आणि त्यानें पिशवींतून...डब्यांतून डबे काढायला सुरवात केली... तो भराभर बोलूं लागल्यामुळें 'पारशी' 'काबरी कोंबडी' असले शब्द तेवढे त्या गोंधळांतून ऐकूं येत होते...

प्रो. भुरट्यांचा चेहरा थोडा पालटला !...ते रागावलेलेहि दिसले!... तेवढ्यांत त्यांनीं राजाला मोठ्यानें विचारलें, "मास्टर मॅजिशीअन् !... तुम्ही हे डबे न् या पेट्या घेऊन करून दाखवाल का ही जादू !..."

राजा एकदम चपापला !...तो घुटमळला ! – त्याला काय बोलावं



तें सुचेना !...

तेवढ्यांत प्रो. भुरटे हंसून त्याला थोपटीत म्हणाले, – "बालजादुगार, प्रो. राजाभाऊ ! जादू लोकांना करून दाखवायची असते ! अशी नुसती सांगायची नसते लोकांना !..."

कां कोणास ठाऊक ! राजाला एकदम मूठभर मांस चढल्यासारखं झालं !..आपल्याशींच तो पुटपुटला, "मी बालजादुगार 'प्रो. राजाभाऊ !'"

मग तो हंसला, नी मग तो गपचूप खालीं बसला !...

तात्पर्य काय ? – पण तात्पर्य सांगण्याचे हे दिवस नाहींत !!

---

## तारा : १५ : : "ओळखीचा अनोळखी"

जेमतेम गाडी गांठली नी दादर स्टेशन सुटलें. धांवपळीचा शीण घालवण्यासाठीं 'हुश्श्' करून बांकावर बसतों तों अगदीं समोरच्याच बांकावर एक ओळखीचा अनोळखी चेहरा माझ्याकडे साभिप्राय पाहून हंसत आहे !....

माझ्या सर्वांगांतून एक भीतीची लाट निघून गेली, पण तेवढ्यासाठीं धांवत्या गाडींतून उडी टाकून जीव गमावण्याचीहि माझी इच्छा नव्हती !....

मी हळूंच त्याच्याकडे पाहिलें न पाहिलेसें केलें; किंचित् हंसल्या-सारखें दाखविलें !....नी दाराजवळचें सामान लावण्याच्या मिषानें जागचा उठलों.

चेहरा ओळखीचा म्हणजे जगाच्या बाजारांत कुठें तरी नक्कीच चांगला पाहिलेलासा वाटला !...पण तो अनोळखी होता म्हणजे...त्या घटकेला मला त्याच्याबद्दल कांहीं एक समज पडत नव्हता...ओळख लागत नव्हती !...आणि मी तर नाशिकला जायला निघालेलों....आणि तो उघडा ब्रोडका बसलेला...म्हणजेच कदाचित् मनमाडपर्यंतहि जाणें शक्य असलेला!...

मी उठलें होतों तें हळूच जमलें तर बांक-जागा बदलतां आली तर पहावी म्हणून....

पण तेवढ्यांत त्यानेंच मला सरळ माझ्या नांवानें हांक मारली ! — आणि मग मात्र माझी क्षणभर गाळणच उडाली....

तवढ्यांत तो पुढेंहि म्हणाला, "कायरे !....अगदीं मुंबईतल्या मुंबईंत राहून आपण कधीं एकमेकांना अलिकडे भेटतहि नाहीं !....काय आहेस तरी काय मांडलं !....अं !....मधूनच लेका खूप आठवणी येतात!... आपण हॉस्टेलमध्यें होतों तेव्हांच्या....नी बायॉलजीच्या टेबलावर बेडुक, झुरळें नी गांडूळ कापतां कापतां केलेल्या साऱ्या गप्पाहि अजून आठवतात बघ ! — शास्त्रांत कांहीं चालेना म्हणून कला कवटाळली पोटाशीं.... आम्ही....चाललोंय् — पुण्याला....तुझी गाडी गेली नाशिकला — पण इतकी कांहीं आठवण नकोस विसरायला मला वाटतें !—"

मी सामान जागच्याजागीं तीनदां ओढून वेळ घालवण्याचा प्रयत्न केला....कसल्या आठवणी पुढें येणार होत्या कोणास ठाऊक ! — ओळखीचा माणूस पत्करतो....अगदीं अनोळखी माणूसहि पत्करतो....पण ओळखीचा अनोळखी....छातींत अगदीं धडकी भरते.



मी मनांत कांहीं ठोकताळे बसवीत नुसता तोंड पसरून हंसलों... पण त्या हास्यामागें फारशा मोठ्या जिव्हाळ्याच्या भावना पाहाणाऱ्याला दिसत असाव्यात असं मला वाटत नव्हतं.

पण शेवटीं मनाचा धडा करून मी पुन्हां त्याच्यासमोरच्या बांकावर बसकण घेतली.

तेवढ्यांत तो म्हणाला,...."परवांच तुझं कोणीं पुस्तक दाखवलं मवं मला !....छान !....पण....आतां उद्यां डॉक्टरची पाटी लावली मी दारांत...नी स्वतःच कंपाऊंडर-बिलकलेक्टर झालों स्वतःचा कीं मग आह्माला रे कुठं तुमचं वाङ्मय नी काय काय समजणार आहे ?....पण ह्मणून दोस्त, जुनी ओळख कांहीं टाकायला नको अगदीं ! — बरं पण मग आतां केव्हां येतोस आमच्याकडे सांग !....आजच ठरव अगदीं."

माझा जीव भांड्यांत पडला होता ! — मला वाटलें हा मनुष्य जगांत अगदीं रहाण्याच्या लायकीचा आहे !!—

कारण तो स्वतःविषयींच जास्तींत जास्त बोलत होता. माझ्याविषयीं बोलत होता तेवढ्याची त्याला पक्की खात्री होती. — मला कोडीं घालायला तो प्रश्नोत्तर करीत नव्हता. ....आणि मुख्य ह्मणजे त्याचीं चार दोन वाक्यें ऐकल्यानंतर मी तरी त्याच्या नांवाशिवाय कोणत्याच बाबतींत बुचकळ्यांत पडलेलों नव्हतों.

...माझ्या आयुष्याच्या कोणत्या कालखंडांत आणि वातावरणांत, कोणत्या प्रकारें, कधीं व कोठें तो वावरला होता याची मला भ्रांत पडण्याचं मुळींच कारण नव्हतं !...शेवटचा प्रश्नहि अगदीं ओघानेंच मोठा सूचक आला होता !...

...आणि त्याच्या त्या एकंदर दिलखुलास प्रेमळ एकतर्फी बडबडी-

वरून, त्याच्याबद्दल मी अज्ञानी होतों, मला कसलं विस्मरण झालं होतं, असला संशयहि त्याच्या मनांत डोकावत नसावा असं मला स्पष्ट दिसलं !...

तेव्हां मी धोरणानें ती संधि साधून घेतली !...

आणि अगदीं नैसर्गिक वाटेल अशा पद्धतीनें मी त्याच्याच बडबडीच्या ठोकताळ्यांवर माझ्या बोलण्याची इमारत रचली नीं म्हटलं, "वाः वाः ! – विसरलों कसं म्हणतोस ?...हल्लींचा नक्की पत्ता माहित नाहीं तुझा कांहीं नाहीं !...पुन्हां दुसरं असं ...आम्ही दुपारीं कधीं मोकळे असणार तर तुम्ही त्यावेळीं लोक सकाळपासून संध्याकाळपर्यंत मेल्या माणसांच्या चौकशांची चिरफाडी करत बसणार !...काय ?...मग भेट कशी व्हावी सांग !..."

आणि त्याच्या बोलण्याला मध्यें अवसर न देतां मी अगदीं धाडसी पद्धतीनें माझ्या खिशांतली ऑनेस्टी डायरी काढून, चालू धोरणानें धडधडीत खोटें बोललों, "पण तसं कशाला ?...आतां पुन्हां पत्ता विसरायला नको उगीच !...हें घे...हातासरशी अत्तांच या मेमोरँडमच्या पानांत तुझ्या पत्त्यानिशीं तुझा ऑटोग्राफच दे बघूं !...मग झक् मारत तुझ्याकडे वेळांत वेळ काढून आठ-पंधरा दिवसांत येतों कीं नाहीं पहा !..."

माझी छाती धडधडत होती !...कारस्थान अंगावर बसरतं कीं काय असा प्रत्येक क्षणीं दाट संशय येत होता ! – पण तरी त्या सरळ मनाच्या प्राण्यानें अगदीं निःशंक अंतःकरणानें माझी डायरी हातांत घेतली नी माझ्या अपेक्षेप्रमाणें त्या पानांत आपलें सबंध नाव नी नकाशासह सारा विस्तृत पत्ता लिहिला !...

मी अधीर मनानें डायरी हातांत घेतली नी वरवर त्याच्या जागेच्या नकाशाकडे पण वास्तविक त्याच्या वरच्या सबंध नांवाकडे गडबडीनें दृष्टि टाकली....



नांव वाचल्यावर कुठं माझा आतांपर्यंत कासावीस झालेला जीव भानावर आला !...

अर्थात् त्याच्या त्या नांवावरून व मघा बोलतां बोलतां त्यानेंच दिलेल्या काळ, स्थळ, वातावरणाच्या गुरुकिल्ल्यांवरून, त्याची नऊ वर्षांपूर्वींची माझ्याबरोबर अभ्यास करणारी विद्यार्थी मूर्ती साऱ्या भरीव पार्श्वभूमीसह माझ्या डोळ्यांसमोर उभी राहिली !...

आणि मी डायरी खिशांत घालीपर्यंत कोणत्याहि प्रकारें दोघांपैकीं कोणालाहि कसला त्रास न होतां...आमच्या विद्यार्थी दशेप्रमाणेंच मुंबई ते थेट नाशिकपर्यंतच्या आमच्या संयुक्त प्रवासास दिलजमाईनें, भावनामय सहवासानें सुरवात झाली. त्या प्रवासांत मधल्या काळांतील अनेक गप्पा मारून आम्ही आमच्या जुन्या दाट ओळखीला नवा उजाळा तजेला आणला!...

आतां सुरवातीला त्याला मी दिलेल्या वायद्याप्रमाणें आठ-पंधर दिवसांत त्याच्याकडे नकाशावरून पत्ता शोधीत खरोखरच मी गेलों कीं नाहीं हा अनाठायीं प्रश्न कोणी मला विचारण्यांत अर्थ नाहीं !...

कारण असल्या वायद्यांत खरा अर्थ कांहींच नसतो, हें विचारांतीं कोणालाहि पटेल !...त्या वायद्याला कांहीं एक किंमत नसते !...किंमत असते ती त्या प्रत्यक्ष क्षणींच्या दोघांच्या सोज्वल भाव-भावनांना... त्यावेळच्या सहजासहजीं मिळणाऱ्या क्षणिक सुखाला !...

ओळखीचा वाटणारा अनोळखी, भावना न दुखावतां अगदीं पूर्वीइतकाच ओळखीचा करणं ही कला मोठी सुखद असते !...

तारा : १६ : : "हरवलेल्या वस्तू"

"नवीन घेतलंत्?" हा प्रश्न त्यांना मी विचारण्याचें कारण अगदीं तसल्याच रंगाचं, आकाराचं एक पेन मी तीन वर्षांपूर्वी हातोहात गमावलं होतं!

पंधरा रुपये किंमतीपेक्षां, तें ज्या व्यक्तीनें मला आनंद-प्रसंगाची भेट म्हणून दिलं होतं, त्या व्यक्तीच्या त्यागाची खूण या दृष्टीनेंच तें हरवल्यामुळें मला त्यावेळीं चुटपुट लागली होती! – पंधरा रुपये जमविण्यास त्या व्यक्तीला किती दिवस लागले असतील, किती त्रास पडला असेल, किती उपभोगांना चाट द्यावा लागला असेल, याची मला पूर्ण कल्पना होती.

आणि मनांत कायम वास करणाऱ्या चुटपुटीनेंच मला तसलं पेन माझ्या सहकाऱ्याच्या हातीं दिसतांच मी तो प्रश्न केला.

पण 'कधीं-केव्हां-कोठें' असली प्रश्नमालिका माझ्या तोंडून बाहेर पडण्यापूर्वींच त्यांनी चमत्कारिक अनपेक्षितपणें प्रश्न केला, "तुम्हांला पाहिजे आहे कां? घ्या ना!"

मी चमकलों. हा पाहिजे असण्याचा प्रश्न नव्हता! – मला पाहिजे असतं तर...पण मी बहुमोल पेनें वापरण्याची आपली गबाळग्रंथीपणामुळें लायकीच नव्हे अशा विचारमालिकेनें मुद्दामच प्लॅटिनमपर्यंत मजल गांठली होती.



त्या भीतीनें, कोणी आपणहून तसलं पेन आतां पुन्हां मला देऊं केलं असतं तर मी सरळ 'नकोच' म्हणालों असतों!—

आणि तेंच माझ्या सहकाऱ्यांनीं एकदम केलं!...मी न बोलतांच त्यांच्याकडे टवकारून पाहूं लागलों; तेवढ्यांत त्यांनीं तें बंद करून मजपुढें करीत म्हटलें, "घ्या ना!...माझं पेन देत नाहीं आहे मी तुम्हांला, महाशय! – तुमचंच तें!...पहिली बच्या स्टेजखालीं धुळीच्या ढिगाऱ्यांत तुम्ही घरीं गेल्यावर सांपडलं!...माझा रुपया घरंगळत गेला नी तो काढतांना हें सांपडलं! – हीं पहा एनीशल्स तुमचीं!—"

क्षणभर खरंच वाटेना मला!...पण तरी मी चमकून कुतूहलानें, गोंधळानें तें त्यांच्या हातून घेतलं! – खरोखर तें माझंच हरवलेलं पेन होतं!....

त्याच्यासाठीं मी आठ दिवस बेचैन झालों होतों!....एकाएकीं तसं पुन्हां हातीं येतांच मी किती तरी आनंदलों!—

पण तो आनंद क्षणभर होता!....मला चिंता पडली....सध्यां खिशांत असलेल्या प्लॅटिनमचें काय करायचं पुढं?....तें सध्यां माझी सेवा चाकरी बजावीत आहे!....त्यानें काय पाप केलं? त्याला बडतर्फ करण्याइतका त्यानें एकाएकीं गुन्हा तरी कोणता केला?....

वामन मल्हारांच्या आश्रम-हरिणीसारखीच परिस्थिती उत्पन्न झाली होती! – 'पारकर'चा कांहीं दोष नव्हता! – 'प्लॅटिनम'चा तर मुळींच नव्हता!.. पूर्वी हरवलेल्या वस्तू अशा एकाएकीं मिळत गेल्या तर?...धरणीकंपाचे धक्के सुरूं होतील माझ्या आयुष्यांत...त्या साऱ्या एकाच दिवशीं एकदम प्रकट झाल्या तर प्रलयकाळच सुरूं होईल!...रात्रंदिवस मी हातांत बाळगी तें मोठं कचकड्याचं बाहुलं! मी पूर्वींसारखें तें हातांतून वागवूं? सॅचच्या वेळीं ग्राउंडबर मी विसरल्यामुळें हरवलेली गोंड्याची मखमली

जरीटोपी! आज आकाशांतून एकदम माझ्या बोडक्यांत पडली तर खात्रीनें मी टोपी काढून टाकण्याचेंहि भान न राहून पळत सुटेन! – एके काळीं त्या वस्तु मला प्रिय होत्या, या जोरावर त्यांना डोक्यावर घेऊन फिरणें मला शक्य होणार नाहीं! – मानवी व्यक्तीसुद्धां हरवल्यावर एकाएकीं सापडल्यास मोठा गोंधळ होईल. त्यांचें आपल्यांत पुन्हां अवतीर्ण होणें मला तरी सुखद खास वाटणार नाहीं!...जुने धागे कल्पनेंत सुखद असतात ह्मणून त्यांनीं त्याऐवजीं नवीन बनलेल्या प्रत्यक्ष सुखद भावना-धाग्यांना तटातट तोडून टाकावं असं मला वाटत नाहीं!...त्यामुळें त्यांची असलेली किंमतहि नाहींशी होईल!

आणि ह्मणूनच मी 'पारकर' पेन थरथरल्या हातानें हातीं घेतलं. धडधडल्या छातीनें थोडा वेळ त्यानें लिहिलं; पण शेवटीं पूर्ण विचार करून 'पारकर' आंतल्या खिशांत कोंबून 'प्लॅटिनम्' नेहमींच्याच जागेवर लटकविलं!—

आजच्या घटकेचा कायदेशीर व नैसर्गिक हक्क प्लॅटिनम्‌चाच होता!.... आणि त्यानेंच तो मिरवला पाहिजे असं मला पूर्ण विचारांतीं वाटलं!—

---

## तारा : १७ : : : "भवानी आयची परक्षा"

एका हातांत पितळी देवीची मूर्ती असलेली लहानशी टोपली, आपल्या खांद्यावरून लोंबकळणाऱ्या उजव्या बाजूच्या हळदीनें माखलेल्या



पिशवींतून, स्वतःवर व समोर दिसणाऱ्या कोणत्याहि प्राण्यावर पिवळा भंडार उडवीत, जेजुरीच्या भवानी आईच्या गळ्यांतला एखादा ताईत पाइक माझ्या दारांत ललकारी मारून उभा राहिला कीं सुरवाती सुरवातीला माझ्या अंगाला कांपरे भरे!

समजतं पण उमजत नाहीं अशा चमत्कारिक मनोवृत्तीचं ते वीशीच्या आंतल्या सरहद्दीजवळ रेंगाळणारं आयुष्य मोठं त्रासदायक असतं! – त्यामुळें माझ्या नुकत्याच मिसरुड फुटलेल्या चेहऱ्याला अगदीं कपाळावर पिवळा टिळा टेकायलाहि मी त्याला संकोचानें परवानगी देत असें.

आणि तो त्यानंतर भंडाराची पिवळी धुळवड उडवूं लागला कीं त्या वातावरणानें लांबूनहि माझा जीव कासावीस होई. त्याचें बोलणारें यंत्र आवाज करूं लागलें कीं कसली तरी अज्ञात ओळख पटून मी हिज् मास्टर्सच्या कुत्र्याप्रमाणें अगदीं मुकाट्यानें वरखालीं माना हलवून त्याच्याकडे व त्याच्या शब्दांच्या जाळ्याकडे टवकारून पाहूं लागे.

आणि तो तुटक बोलूं लागे..."भवानाऽय् तुझी परक्षा घेते...तिला तुजं काई नको...एक आण्याचं नाणं पाहू?...इटं काढून ठेव...तुजं नवं धोतर आहे का?...ठेव इठं! – तिला यांतलं काई नको!...तुला तिचा आशीर्वाद आहे...ती तुजी केवळ परक्षा घेते......"

आणि एखाद्या मंत्रमुग्धाप्रमाणें भारून जाऊन मी अत्यंत प्रामाणिकपणें माझा नवा कोट, नवं धोतर, टोपी-भवानीआईनें सुचवलेलें तें नाणें-सारें कांहीं निमूटपणें पुढें ठेवी! –अर्थात्‌च त्यापुढल्या त्याच्या बोलण्याच्या महापुरांत त्यांतील बहुतेक गोष्टी वाहून जात...आणि त्याच दिवशीं कोट, टोपी, धोतराच्या वियोगामुळ माझी बाहेर जायची पंचाइत झाली कीं मी आपले आपल्यावरच दांत-ओंठ खाऊं लागे. आणि त्यावेळीं रागानें डोक्यावरील केस पिंजारले कीं, माझ्या डोक्यांत विचार डोकावे...भवानाय्

ती परक्षाच नव्हे तर सत्वपरक्षाच होय...पण बुंदसे गयी तो...

त्यामुळें पुढें पुढें मी अशी 'भवानाय् भंडार' उडवीत माझ्या भेटीला आपण होऊन दारांत उभी राहिली कीं नवें धोतर म्हणून गोधडीच्या मालमसाल्यांतील धोतर पुढें करूं लागलें, नवा कोट म्हणून उंदरांनीं कुरतडलेला कोट आणून पुढें ठेवीत गेलें...आठ आण्याचें नाणें म्हणून काळी शिवराई खिशांतून बाहेर काढण्याचें प्रसंगावधान राखलें!...आणि कल्पनाच करायला देवीचा आशीर्वाद मिळून थोडक्यांत 'परक्षें'तून शीर-सलामत सुटूं लागलों!—

परवां एक असाच एक आधुनिक मल्हारी भंडार मार्तंड भवानायूचा पाइक माझ्याकडे आला होता...त्याचा पोषाख सुटाबुटाचा होता. त्याच्या डाव्या हातांत देवीच्या मूर्तींची टोपली नव्हती...एक सुंदरशी ब्रीफ केस होती. गळ्यांत पिवळी पिशवी नव्हती...हातांत गोल्डफ्लेकचा पिवळा वाटोळा डबा होता...उजव्या हातानें तो गळ्यांतल्या पिशवींतला भंडार आपल्यावर व इतरांवर उडवीत नव्हता. ...त्या पिवळ्या डब्यांतून पुन्हां पुन्हां पांढऱ्या नळ्या काढून आपल्या तोंडांत व दुसऱ्यांच्या अंगावर उडवीत होता...ठिकठिकाणीं पिवळ्याऐवजीं पांढरी धूळ तो टाकीत होता... व निळसर निळसर धूर वातावरणांत पसरला होता.

त्यानें माझ्याकडे येतांच त्याचा आधुनिक भंडार मजवर उधळलान् नी शब्दांचें जाळें मोठ्या खुबीदारपणें विणूं लागला.....

मला त्याच्या ठिकाणीं ती बालपणची मूर्ती दिसूं लागली...'भवानाय् परक्षा पहाते' असं हा म्हणत नव्हता, तरी "कारे? तुझ्याकडे किती पैसे आहेत खिशांत? संध्याकाळपर्यंत पाहिजे होते!" हा त्याचा प्रश्न पूर्वी-इतकाच मला परिचित होता.....

मी आधींपासूनच ठरविलें होतें....अशा प्रसंगीं खिशांत असलेल्या पैशाचा रुपये आणे पै हिशेब करायचा नाहीं!



तेव्हां मी माझें नवें सुंदर पाकीटच प्रत्यक्ष बाहेर काढलें....कांहीं एक न बोलतां तें हातावर ओतलें! — त्यांत दीड़दोन रुपयांचा खुर्दा तेवढा होता....

तेव्हां तोहि पुढें कांहीं बोलला नाहीं....थोड्या वेळानें पुन्हां एकदां भंडार उडवून जरूरी कामाचें निमित्त सांगून निघून गेला!....

मी शांत निश्वास टाकला....बाहेर काढलेलें माझें पाकीट खिशांत घातलें!....

मारवाड्याच्या अस्सल वहीप्रमाणें माझें दुसरें अस्सल जुनें मळकट पाकीट मी बारक्या खिशांतून ठेवतों!....तें बाहेर काढलें नी खात्री करा-यला सहज आंतल्या वस्तू पाहिल्या....

वरवर मोजमाप करूनहि त्यांत नव्वदाच्या नोटा शीरसलामत राहि-लेल्या दिसतांच मला अत्यानंद झाला!—

त्या भरांत मी त्या नोटांइतक्याच प्रेमानें दीड रुपयाचा खुर्दा असलेल्या माझ्या बाहेरच्या खिशांतील कोऱ्या करकरीत पाकीटाचेंहि चुंबन घेतलें!-—

जुन्या पुराण्या पद्धतीनेंच या नव्या अद्यतन 'भवानायूच्या परक्षें'-तून — ह्या भयंकर गंडांतरांतून...मी शीरसलामत सुटलों होतों!....

समयसूचकतेनें झटकन् दीड-दोन रुपये धोक्यांत टाकून मी त्या दिवशीं माझ्या ठरल्या नियमाप्रमाणें काळाच्या झोंपेंतून नव्वद रुपयेहि वांचविलेले होते नी पाकिटासह खुर्दाहि वांचविला होता.

---

तारा : १८ : : "एक गोड अर्ज"

"दादा, पुस्तक सगळंऽझालं छापून ?"...नुकतीच साडी नेसूं लागलेली ती तीन-चार वर्षेच इंग्रजाळलेली माझी छोटी बहीण, मी प्रुफं तपासत आहे हें पाहून, माझ्याजवळ लाडुकपणें येऊन म्हणाली.

मला समजेना, हिला माझ्या नव्या पुस्तकाच्या प्रसिद्धीबद्दल इतकी चिंता कां लागून रहावी तें. कांहीं तरी विशेष प्रसंग असावा असा मला दाट संशय आल्यावाचून राहिला नाहीं.

आपला शेंपटा हलूंच माझ्या मानेवरून फिरवून मला गुदगुल्या करीत तिनें पुन्हां लाडुकपणें आपले पातळ ओंठ पुढें काढले नी ती पुन्हां माझ्या खांद्यावर हात टाकून मुद्दाम हेल काढीत म्हणाली, "ए...हेऽऽऽ काय?... सांऽऽऽग नारे दादा !...मी काय विचारतेंय् !..."

मी अजून शेवटच्या प्रुफांत शब्द घुसडून कंपाझिटरांचा नवा रोष अंगावर ओढून घेण्याचा सपाटा चालवलाच होता !..तिच्या गुदगुल्यांनीं हाताला धक्का नी एक मोठा रफाटा प्रुफावर उठला. मी ओरडून म्हणालों, "काय ग बया !...काय उगीच तुझी कटकट मध्येंच ! लिहिणं पत्करलं पण हीं प्रुफें तपासणं नको...आणि त्यांत पुन्हां तुझा हा लाडुकपणाचा त्रास..."

तिचा चेहरा पालटला. ती माझ्यावर रागावली. बाजूला झाली नी गाल फुगवून माझ्याकडे किंचित् रागानें पहात म्हणाली,..."बरं जा... मोठ्ठा आला...लेखक !...आमी नाय् जा !..."

त्या शब्दांतील प्रेम मला मोहवीत होतं! मी पटकन् प्रुफांच्या कचाट्यां-



तील माझें मन बाहेर ओढून काढलं तिला जातां जातां पकडलं नी गोड गोड शब्दांत म्हणालों, "ए ए...असं नाहीं ग !...माफी...माझी सपशेल माफी ! बस्स् ?...सांग कां विचारीत होतीस ? ऐकतों आतां !..."

तिची कळी खुलली...राग गेला नी अधिकच लाडुकपणें ती मनमोकळें हंसली !...

पण गम बोलायचें तेवढें थांबली...

"ए बया..सांग ना ? प्रस्तावना लिहीन म्हणतेस ? कीं तंत्राच्या दृष्टीनें कांहीं आगाऊ सूचना का करायच्या आहेत तुला या कादंबरींत प्रसिद्धीपूर्वी ?...कीं नायिकेचं नांव बदलून तुझं घालायला सांगणार आहेस... कीं..." मी मुद्दामच भरमसाट कल्पना करून तिला चिथावीत होतों...हेतु एवढाच कीं तिनें बोलायला लागावं...

"असं कायरे ?" ती लाडुकपणें मुरकत नी माझ्याजवळ येऊन उभी रहात थबकून ह्मणाली, "तूं हंसणार – रागावणार नसलास तर सांगतें !..."

"अग रडकी तूं ! तुला कोण बये चिडवील !..." मी हंसून ह्मणालों, "पाण्याच्या बंबाला चार खून माफ असतात !...सांग तूं ! अभय आहे माझं ! कांहींहि बोललीस तरी नाहीं रागावणार मी..."

बया हसली...किंचित् काळ गप्प बसली नी मग अगदीं सुरवातीसारखीच लाडुकपण माझ्या खांद्यावर हात टाकून ह्मणाली, "दादा, हें पुस्तक रे तूं कोणाला अर्पण करणार आहेस ...अं? ?"

मी चमकलों...मला कोडंहि पडलं...काय चमत्कारिक प्रश्न !... आणि हिला कां एवढ्या पंचायती नी एवढं कुतूहल !...

पण तरी मी मनांतले हे विचार चेहऱ्यावर न दाखवतां अगदीं गंभीर चेहऱ्यानें न हसतां ह्मणालों, "कां ग ?...कां विचारते आहेस हें तूं ?...."

"पहिलं पुस्तक आपल्या वडलांना..." ती लाजत लाजत तुटकपणें ह्मणाली, "दुसरं आपल्या मोठ्या बहिणीला....तिसरं तें तुझ्या कोणा मित्राला...."

ती मध्येंच कां थांबली माझ्या लक्ष्यांत येईना; मी कांहीं न बोलतांच तिच्याकडे पहात राहिलों....

तेवढ्यांत ती तोंडांतल्या तोंडांत पुटपुटली, "ए मला कर ना रे दादा अर्पण हें पुस्तक तुझं, आतां !...मी माझ्या वर्गांतल्या मुलींना सुद्धां सांगून टाकलंय्...."

केवढ्यानें दचकलों मी पुन्हां !....अर्पण पत्रिकेसाठीं केवढा धाडसी अर्ज !....पुस्तक छापायला पैसे देणाऱ्यांना पुस्तक अर्पण करतात !....मग हा गोडपणा....अगदीं प्रांजल, प्रेमळ, स्पष्टवक्ता, खाजगी स्वरूपाचा लाडुकपणा...त्याला कांहींच कां किंमत नाहीं ?...त्यांत कसला खोटा अभिनिवेश नव्हता कीं खोटा दांभिक संकोचहि नव्हता !..."दादा, मला एक पारकर पेन घेऊन देशील कारे ?...मी मुलींना सांगितलंय् तूं घेऊन देणार आहेस ह्मणून !..." असल्या रोखठोक मागणीसारखाच तिला तो मामला वाटला होता !...

माझ्या डोक्यांत हे विचार येत होते तोंपर्यंत ती बया माझ्याजवळून कांहीं तरी चुकल्याचुकल्यासारखं वाटून बाजूला झाली होती...तिच्या भांबावलेल्या चेहऱ्याकडे नी त्यावेळच्या तिच्या साऱ्याच निष्पाप गोंधळी



हालचालींकडे पाहून मला जोरजोरानें हंसूं कोसळलं...

"अर्जदार धाकटी बहीण," मी खो खो हंसून ह्मणालों, "तुमचा अर्ज आह्मांला पोंचला...पण तुमची भलतीच कल्पना झालेली दिसते अर्पण पद्धतीविषयीं !...टाइम्समध्यें जाहिरात देऊन सर्टिफिकेटांसह अर्ज बोलावले जात नसतात, अर्पणपत्रिका लिहिण्यापूर्वी...तरीहि तुमची ही नवी अगदीं अभिनव कल्पना आहे !...आह्मांला पटली ती !...अर्ज फायलीला लावला आहे !....शक्य तितक्या लौकर आतां नाहीं पुढें केव्हां तरी तो मंजूर करण्याची कोशीस करूं आह्मी !...त्या निमित्तानें तरी आपण आमचीं यापुढलीं सारीं पुस्तकें काळजीपूर्वक वाचत चलाल !...आणि..."

"अंऽ हं..." पण उद्गार अर्धवट राहिले, आणि आपल्या शेंपट्यांतलं टपोरं गुलाबाचं फूल रागारागानें माझ्या अंगावर जोरानें मारून ती मानेला अनेक विचार-भावना दाखविणारा हिसडा देत अक्षरशः पळत सुटली !....

आणि त्याचवेळीं माझी खात्री झाली....तिचा तो अर्ज केव्हां तरी माझ्याकडून आपोआप मंजूर होणार !!

---

तारा : १९ : : **"गुज्जण"**

जेमतेम पंचवीस मिनिटें आधींच त्याला त्या गोष्टीची कुणकुण लागली. त्याच्या वडिलांच्या पट्टेवाल्याची माझ्यावर मोटी मर्जी ! त्यामुळेंच

तो तसा त्यांच्या कानामध्यें वेळेवर हळूंच पुटपुटला ! नाहींतर बाब्या कुठें तरी पायांतून गळणारी चड्डी संभाळून खेळत राहिला असता.

शत्रूच्या आगमनाच्या आगाऊ बातमीमुळें होईल तेवढी त्याची गडबड झाली ! – आणि त्या पंचवीस मिनिटांचा त्यानें कसोशीनें उपयोग केला; पण अगदीं गपचूप.

कारण त्याचे वडील घरांतच होते. जर का त्याच्या जागरूकतेची ती बातमी मध्येंच फुटली असती, तर एकदम 'ऑर्डिनन्स' निघाला असता...सारें 'ओमफस्' झालें असतें !—

शेवटीं अगदीं वेळेवर, फाटकाच्या नी दाराच्या मधोमध, अंगणांत नाका पकडून तो उभा राहिला.

त्याच्या मखमलीच्या कानाच्या मध्यापर्यंत येऊन पोहोंचणारा सोनेरी गोंडा नी तीन बोटें रुंद जरीची वेलबुट्टी होती. काळ्या अल्पाकचा तकतकीत लांब डगला गळ्यापर्यंत बंद होता. पायांतली सुरवारीसारखी दिसणारी पण गुडघ्याच्या सरहद्दीकडेच अधिक चढणारी तंग विजार गळूं नये म्हणून त्यानें चढवलेले ब्रेसेस त्याच्या डगल्यांत लपले होते. बाजूच्या चापाच्या बटनांनीं, पायांतले बूट जागेवर ठेवण्याची त्याला हमी दिली होती.

पंढरी पट्टेवाल्यानें आगाऊ सांगितल्याप्रमाणें जगमल शेठची मोटारहि दारांत येऊन केव्हांची वाट पहात राहिली होती !...

आतां त्याचे वडील अजूनहि आंतच राहिले होते. त्यावर त्याचा तरी काय इलाज होता !...त्याच्या बाजूनें तरी त्याची अगदीं पूर्ण तयारी होती केव्हांची !...

तेवढ्यांतच पट्टेवाल्यानें कुजबुजून म्हटलें, "हं...हं...बुवासाहेब



पहा...साहेब आले...साहेब आले !...माझं नांव मात्र त्यांना अगदीं नका हं सांगूं !..."

तो कांहीं इतका खाल्ल्या घरचे वासे मोजणारा खासत्र नव्हता.

तपकिरी बूट, पांढरी विजार, पिवळा कोट, रेशमी उपरणें नी तांबडी पगडी अशा वेषांत त्याचे वडील दारांत येऊन पहातात, तों त्यांच्या दोन पावलें पुढेंच तो तयार !...

हातांतली गांठीगांठीची काठी पुढें करीत ते चमकून म्हणाले, "तूं रे कुठें तयारी करून चाललास ?—"

त्यांचा चेहरा किंचित् हसरा दिसतांच त्यानें प्रसंग ओळखला ! नी त्यांना प्रेमानें विळखा घालून त्यानें म्हटलें, "तुमच्याबरोबर जंगल शेठकडे..."

"जंगल शेठ ? – हं हं...जगमल शेठ !...माहीत नाहीं तर कांहीं तरी बोलत जाऊं नये ! – वेडा...रागावतील हो लोक !..." 'साहेब' त्याला तेवढ्यांत सर्वंकष सूचना देत होते..."नुसता पोषाख केला म्हणजे झालं नाहीं !...लोकांकडे जायचं तर नीट बोललं पाहिजे !...वागलं पाहिजे !...पाहिलं तें मागूं – नये...तिथं आतां चहा-बिहा असेल....गोड फार खाऊं नये....उगीच कांहीं बोलूं नये....आणि...."

"आतां चुकतं तें इथंच ! – इंग्रजी पहिलींतल्या मुलाला काय ती कविता येत नव्हती थोडीच ?...चांगली पाठ केली होती त्यानेंहि ती वडिलांसारखीच मराठी पहिलींत !....

चोरी करण्याचा प्रश्न होता कुठं ?...तो खोटें बोलणार नाहीं याची त्याच्या वडलांना पूर्ण खात्री होती....पण मग इतकं असूनहि कांहीं कारण नसतां, अगदीं 'वडीलांची आज्ञा घेतल्यावाचून कोणी जागा कधीं

सोडूं नये इथपर्यंत त्यांनीं त्या गद्य कवितेंतील सार्‍या ओळी आणून सोडल्या !

त्या क्षणीं तो बिचारा गरजू होता म्हणूनच त्यानें तो अत्याचार निमूट सहन करून घेतला, आणि तहाच्या अटी आपल्याला अगदीं शिरसामान्य असल्याची कबुली सही अगदीं मानेच्या एका फटकार्‍यासरशी करून, समोरच्या मोटारींत त्यानें टणकन् उडी घेतली.

बडे सरकारी अधिकारी फिरतीवर असल्यावर त्याची चहा मेजवान्यांची नेहमीं चंगळ असते ह्मणतात. मुलानें शाळेला मेची सुट्टी पाहून हट्ट मात्र केला पाहिजे; मग त्यालाहि त्यांत वांटेकरी होतां येतें.

त्या दिवशीं त्या मोठ्या खानदेशी जिल्ह्याच्या ठिकाणीं जगमल शेठ मारवाड्यांनीं त्याच्या वडिलांना असेंच बोलावलें होतें. व त्यांचें शेंपूट म्हणूनच त्या मुक्कामीं असलेली स्वारी 'साहेबां'च्या शेजारीं मोटारींत बसली होती !—

शेवटीं, शेठजींच्या दारांत गाडी थांबली !...पंढरी पट्टेवाला उतरला. त्याच्या मागून तहाची आठवण ठेऊन तोहि उतरला !....

साहेब उतरले; तसे शेठजी, त्यांचे मेथाजी, त्यांना सामोरे आले...

शेठजी गपचूप हसले; तेव्हां त्याचे वडील न बोलतां हंसले !...आणि मग तोहि गालांतल्या गालांत हंसला !...त्याला आठवलें, "बिकट वाट वहिवाट नसावी...धोपट मार्गा सोडुं नको !"

शेठजींच्या बंगल्यांत शिरतांच जिकडे तिकडे चौहींकडे झगझगाट दिसूं लागला त्याला ! – दिवाणखान्याच्या दाराबाहेरपासून गालिचे टाकले होते. दिवाणखान्याच्या बाहेरच्या भिंतीवरसुद्धां जुन्या-पुराण्या देवांचा खडा पहारा होता....



आणि दिवाणखान्याच्या दारांत एकमेकाला हात जोडून गंभीर मुद्रेनें उभीं असलेलीं पांचसहा मुलें दिसत होती.

त्याच्या अगांतून एक आश्चर्याचा झटका येऊन गेला.

शेठजी साहेबाना आपला कापूस किती निकला आहे याबद्दल कांहीं सांगत होते वाटतं ! त्यावेळीं, खुद्द त्याचें मात्र कुतूहल जागृत होऊन त्याचं लक्ष जवळजवळ त्याच्याच वयाच्या दाराशीं उभ्या असलेल्या मुलांच्या चेहर्‍याकड व त्यांच्या सप्तरंगी इंद्रधनुष्याप्रमाणें दिसणार्‍या मखमली पोषाखाकडे लागलें होतें !

तीं तेथें उभीं राहून काय करीत आहेत व करणार आहेत याची त्याला काहीं केल्या मुळींच कल्पना होईना.

शेवटीं, शेठजींनीं 'अांत चला रावसाहेब' असें हसून म्हणून साहेबांनां वाट दाखविली; पण तरी त्याचें लक्ष मात्र होतें तिथेंच होतें.

तेवढ्यात ठरल्या आंकड्यावर कांटा आल्यावर घड्याळाचा गजर जसा सुरूं होतो, त्याप्रमाणें आपल्या वडिलांबरोबर दाराशीं येतांच त्या मुलांच्या रांगेकडून त्याच्या कानांवर एकदम भसाडा आवाज येऊन आदळला..."शज्जणांऽणोंऽ शुज्जणांणोंऽ या बैशा...आशणीऽऽ..."

त्यानें दचकून समोर पाहिलें.

किल्ली दिलेल्या माकडांप्रमाणें हात पुढे मागे करीत, 'दोन प्रहर रात्र झाली ऋषि आले भोजना ऽ' या चालीवर गभीर मुद्रेनें तें गाणें तीं पुन्हा पुन्हा आळवून म्हणत होतीं !

आतां, ज्याच्याविषयीं तीं बोलत होतीं, तें आसन दिवाणखान्यांत होतं ! आणि तीं ज्यांना उद्देशून 'शज्जण' म्हणत होतीं ती त्याच्या स्वतः सकट त्याचे वडील, यांसारखी मंडळी दिवाणखान्याबाहेर होती ! त्यामुळें त्यांचें आंतबाहेर हात दाखवणें त्याला पटकन् पटलें !

पण त्यांचा मोठा 'ण' नी धाकटा 'न' किंवा पाठफोड्या 'स'

व शेंडीफोडया ' श ' यांचा सावळा गोंधळ कांही त्याला पटेना !

त्याच्या चिमुकल्या डोळ्यांत हे असले विचार येऊन जात आहेत, तोंच पुन्हां त्यांनीं तितक्याच निर्दयपणें त्याच्या कानावर त्या भयंकर गोंधळानें भरलेली एक नवीन सरबत्ती डागली !

घरून निघतांना केलेल्या वडिलांबरोबरच्या तहाचीं सारीं कलमें त्याला नकळत तो विसरला ! ..आणि त्याला त्या वस्तुस्थितीची कल्पना होण्या-पूर्वीच तो फुसफूस हसूं लागला...

मग किंचित् थांबून, वडिलांनांहि तो अक्षरांचा गोंधळ समजला असेलच या कल्पनेनें त्यानें त्यांच्याकडे चालतां चालतां हंसतच संशयी मुद्रेनें वर पाहिलें...

पण त्यांचा चेहरा तर प्रथम अगदीं निर्विकार..मग थोडा गंभीर..मग किंचित् रागीट असा पालटत गेलेला त्याला दिसला !...

त्याला आपल्या वडिलांनीं समोर घडणाऱ्या प्रकाराकडे केलेल्या दुर्लक्षाचा राग येत होता ! . पण मग हसूंहि येत होतं त्याला !...

तो हळूच हसला नी...हंसतहंसतच त्यानें त्या मुलांकडे नी ' साहेबां ' कडे टवकारून पाहिलं – त्यांनीं त्यांच्याकडे उलट क्षणभर डोळे वटारून पाहिलं !...

तरी तो तोंड दाबून ओठाच्या कडेकोट बंदोबस्तांतून...'फू –ऽ फू – ऽ फप्' असे आवाज बाहेर काढीत होता !

शेवटीं त्याच्या वडिलांनीं हळूच त्याचा हात आपल्या हातांत घेतला नी चालतां चालतां तो रागानें दाबला ! –

नी मग लगबगीनें साऱ्या मुलांच्या कोंडींतून आपल्या दिव्य चिरंजीवांना शीरसलामत आत घेऊन ते बैठकीवर जाऊन बसले !—

त्या मुलांचं गाणंहि तोंपर्यंत थांबलं होतं...आणि तीं जातां जातां हळूहळू कांहीं कुजबुजून त्याच्याकडे चोरट्या पण रागीट दृष्टीनें डोकावून



पहात होतीं.

जणूं काय त्या मुलांना त्याला ओरडून सांगायचें होतें, "मूर्खा, तुझा कांहीं तरी गैरसमज झाला असावा. आम्ही तुला 'शज्जणांणों' म्हणालोंच नाहीं मुळीं. चार लोकांत फिदिफिदी हंसणाऱ्याला 'शज्जण' ह्मणायचं तरी कसं !...उलट, बच्चमजी, तुला आह्मी आमचा इंगा दाखवला असता चांगला !...पण तुझ्याबरोबर साहेब आहेत ! – आणि साहेबांबरोबर शेटजी आहेत ! – ह्मणून...पण कधीं आमच्या गल्लींत तर ये, बेट्या..."

त्याच्या मनाला अजून जगाच्या दंभाचे बांधतट पडले नव्हते... ह्मणून तो नैसर्गिकपणेंच एखाद्या दुर्जनासारखा उपहासानें हंसत होता.

त्याचे वडील समाजांत वावरतांना आपल्या अनुभवाप्रमाणें मुग्धता स्वीकारून 'शज्जण' झाले होते. 'साहेब' साहेब होते ह्मणूनच त्यांचा कृत्रिम भपक्यानें आदर सत्कार करून जगमल शेठ 'सज्जण झाले होते!...

– आणि खरेंच होतें त्यांचें ह्मणणें...

मनांत एक जनांत एक असें लपंछपं वागणारे ते सज्जन !...त्यां गाण्याच्या, त्या सत्काराच्या दोन्ही बाजू अगदीं पूरेपूर कृत्रिम होत्या!... तरी तो देखावा निमूटपणें शेवटपर्यंत पार पडत होता...

– मात्र त्या दिवशीं घरीं गेल्यावर त्या साऱ्या प्रसंगीं असभ्य हास्यासारखें चालूं ठेवल्याबद्दल त्याला भक्कम तंबी मिळाली !– आणि त्यानंतर असल्या प्रसंगीं त्याला वडिलांबरोबर जाण्याची कायमची बंदी झाली !!

---

तारा : २० : : : शल्यें

त्या दिवशीं, तीस मिनिटांपूर्वी चर्नीरोड स्टेशनांतील शेवटच्या सोयीस्कर लोकलमध्यें माझं मनच तेवढं बसवून मी माझं शरीर नाइलाजानें स्टेशनाला पाठमोरं करून चाललों होतों, आणि त्याबरोबरच मला स्पष्ट दिसत होतं कीं वर्षातला एक सुखद क्षण आयुष्यांतून कायमचा गेला !

जुन्या लहानपणच्या एका ओळींत नवे शब्द ओढूनताणून बसवून मी स्वतःशीच हसून म्हणालों, "खिसा संपला...गाडी हुकली...मनांत माझ्या वीज !...पण इथंच भाऊबीज !"

आणि खरं होतं तें !...बारक्या खिशांतील सारे पैसे मारे खर्चून आलों नी शेवटीं चर्नीरोड स्टेशनवर वरल्या खिशांतील रुमाल काढला तेव्हां चपापलों. मुद्दाम तिथं ठेवलेलं छोटं पाकीट आधीं केव्हांतरी कोणी-तरी कोठेतरी अलगद उचललं असावं किंवा रुमालाबरोबर उडालं असावं, एवढं खरं !

नी भाऊबीजेच्या संध्याकाळीं एकुलत्या एका एकाच रक्ताच्या बहिणीच्या घरीं साठ मैलावर पोचणारी गाडी, पस्तीस चाळीस मिनिटांनीं दादर स्टेशनांतून सुटणार होती !– हो, तीच त्या दिवसाची शेवटची गाडी !

तीन दिवस धडपडून ज्या पाकिटांत कांहीं तरी अर्थ आहे...राम आहे, असं मला सकाळीं जरा कुठं वाटूं लागलं होतं, तें माझ्या खिशांतील पाकीट त्याक्षणीं दुसऱ्या कोणाच्या तरी खिशांत...पण उगीच संशय कशाला !– माझ्या खिशांत नव्हतं एवढं खास...





डायरींत आणेवालीं सहा नी पैसेवालीं दहापंधरा पोस्टाचीं तिकिटं होतीं...हातांत रिस्टवॉच होतं सोन्याचं...करंगळींत आंगठी होती खड्याची...पारकर नाहीं तरी कॅमेल पेन होतं वरल्या खिशांत...

पण आंतल्या बारक्या खिशांत मात्र आतां फक्त तीन पैसे होते सुटे...

माझ्या कातवल्या जिवाला त्याक्षणीं वाटलं,...नाक्यानाक्याला मार-वाड्यांची दुकानं कां नसावीत !...खरंच कां नसावीत !....पण तीं नव्हतीं ही वस्तुस्थिति होती !–

मग मी 'विल पॉवर' कां काय म्हणतात ती बोलावली...दैवी योगायोगावर विश्वास ठेवला, त्याला आवाहन केलं नी ऑल्बेस बागेच्या कोपऱ्याकडे मोर्चा वळवून मी ओळखीच्या तोंडाची वाट पहात उभा राहिलो.

पण माणसाच्या आयुष्यांत योगायोग ही सुद्धां एक योगायोगाचीच गोष्ट असते...आणि इच्छाशक्ति माणसाच्या अंगांतील इतर सर्व शक्तीं-बरोबरच अलीअलीकडे नाहींशी झाल्याचीच माझी पुढल्या वीस मिनिटें नि बावीस सेकंदांत खात्री झाली.

कारण तेवढ्या वेळांत साधारण दीड मिनिटाला एक प्रमाणें ओळ-खीचीं तोंडे दिसलीं. हातांची हालचाल, गालाच्या खळ्या नी दंतपंक्तींचं प्रदर्शन झालं...

पण मला कांहीं छाती होईना बोलायची !...

नाहीं म्हणायला निरुपद्रवी थाप मारायची तेवढी छाती झाली...

दोघातिघाना त्यांनीं न विचारतांच म्हणालों,..." हॅः हॅः...बसची वाट पहातोय्..."

भीति वाटत होती ती वर असलेल्या सूर्याची, समोरच्या कोपऱ्यावरील इराण्याची, त्या ओळखीच्या तोंडांपैकीं एकाद्याच्या ड्रिंक घेणाऱ्या इच्छाशक्तीची, चुकून त्याच वेळीं मरीन लाइन्सच्या बाजूनें कदाचित् येऊन समोर धडकणाऱ्या बसच्या धडाची...

माझ्या मागून दरम्यान तीन गाड्या खटखट्‌क् करीत नी मला टिवल्याबावल्या करीत दादरला निघून गेल्या...मी मनांतल्या मांड्यांचा आंकडा दहावरून पांचावर आणला !...

आतां दादरहून निघणारी आमची 'भाऊबीज गाडी' सुटायला आठ मिनिटें होती—नी माझ्या बहिणीचा लाडका धाकटा भाऊ चर्नीरोड स्टेशनच्या आसपास योगायोगीचे नी इच्छाशक्तीचे प्रयोग करीत घिरट्या घालीत होता !...

तोंच काय आश्चर्य ? भयंकर योगायोग समोर आला !...पांच रुपयांसाठीं योगायोगावर अवलंबून असणाऱ्या माझ्यासारख्या दरिद्री धंदेवाईकाचे दोनतीन तरी शेकडे निवांत पडून असलेल्या माझ्या धंदेवाईक स्नेह्याचा व्यवस्थापकच माझ्यासमोर उभा !...

मला एकाएकीं जरा गंमत करून पहावीशी वाटली...म्हटलं, एवीतेवी गाडी गडगडलीच, आतां !

मी हास्य केलं ! किंचित् थबकलों ! त्याच्या हसऱ्या तोंडाजवळाल कानाशीं एक गुजगोष्ट केली. त्यानें ती अर्ध्या पाऊण मिनिटाची गुजगोष्ट ऐकली नी हसून दोन अस्पष्ट वाक्यें उच्चारली ! आणि शेवटी त्याची गाडी चुकेल म्हणून चर्नीरोडकडे लगबगण्यासाठीं पावलें उचललीं.

मलाहि पटलं...मंदस्मिताला, जगांत कधींच पैसे पडत नाहींत...नी म्हणूनच मीहि गमतींत स्मित केलं...

आणि लागलीच मंद पावलें टाकीत 'रॉक्सी' वरून उगीचच



'बंधना'ची चित्रें न्याहळत सॅन्डहर्स्ट ब्रिजपाशीं आलों....

'आलाईज' समोर दिसलं...नी नेहमींचं खर्चिक मन मला हळूंच म्हणालं...'कांहीं ड्रिंक घे बुवा !...

पण तिथेंहि बंधन होतं !—कारण त्याच वेळीं खिशांत हात गेला नी सध्याचे इतिहासप्रसिद्ध तीन पैसे खुळखुळले...

मी स्वतःशीच हंसून म्हणालों, "या लढाईच्या काळांत शहरी रस्त्यांत फिरणाऱ्या प्रामाणिक नागरिकाला तरी पैसा महाग झाला आहे !"

अर्थात् एका पैशाच्या टंचाईसाठीं मी समोरच्या 'गरीब आदमी' छोट्या इराण्याकडेच शिरलों...

ऑर्डर मिळतांच, पोऱ्यानें एक ललकारी ठोकली; नारिंगाचा ग्लास समोर ठेवला नी त्यांत गवताची नळी टाकून ती त्यांत उगीच एकदां फिरवून तो ताडानें म्हणाला, "नारिंगी...एकदम थंडा...एकदम अच्छा, साब..."

आणि कां कोणास ठाऊक ? मी त्या शब्दानींच एकदम चपापलों... मनाचा अजाणता कोठें तरी प्रवास सुरूं झाला होता...नी मला एकाएकीं कांहीं तरी चुकल्या चुकल्यासारखं वाटत होतं...

दोनतीन घोंट मी अस्वस्थ मनानें तसे पितों न पितों तोंच त्या पोराचे ते सहजगत्या आलेले शब्द पुन्हां माझ्या कानांत जणू प्रतिध्वनित होऊन दुमदुमले..."नारिंगी... एकदम थंडा...एकदम अच्छा साब !..."

त्याबद्दल मी मनांत कांहीं संशोधन करणार तोंच शून्य दृष्टीनें पहात असल्यामुळें समोरील ग्लासाऐवजीं तेथें दिसणाऱ्या शून्यात नकळतच एक चेहरा दिसूं लागला मला !...

लांब निष्पाप चेहरा, खोल गेलेले पण खूप चमकणारे काळेभोर डोळे, निर्लेप मंद हास्य, उंच नाक, भव्य कपाळ, उभे राहिलेले दाट बिन विंचरलेले केस....

मी चमकून मनांत म्हणालें,..." सर्वोत्तम ?!!"

हो, तो सर्वोत्तमचाच चेहरा !...

तो माझा एक मृत चित्रकार – स्नेही होता...दूर गांवचा...श्रेष्ठ कलावंत !...उराशीं मोठमोठ्या महत्वाकांक्षा बांधून शहरांत शिरला होता... त्याचे ते डोळेच सांगत सारं !...रंगाचे डबे, कुंचले, टुथब्रश नी पैसा-पासरी असल्या गोष्टींचं त्याला अगदीं वावडं...पण जगाशीं झगडत होता तो ! – कारण भोंवतीं गारठा नी घरांतहि ऊब नाहीं...मनांतली अनेक प्रकारची रसरसित ऊब शेवटीं शेवटीं थंडावत गेली. त्याचे आंत गेलेले व अंतर्मुख झालेले डोळे, पण तरीहि अधिकाधिक वरवर येणारें नाक नी अकालीं सुकत असलेलें शरीर, त्या गोष्टींना उघड उघड साक्ष देत हातं.

त्यानें माझ्याकरितां स्नेहानें काढलेलीं अनेक चित्रें मला आठवलीं; पण त्यांतलं तें त्याचं शेवटचंच चित्र तेवढं सारखं उठून पुढें येत होतं माझ्या. तें चित्र पुस्तकावर पाहून रसिक म्हणविणाऱ्या अनेकांनीं नाकें मुरडून मला मूर्खांत जमा केलं होतं. पण त्यानें तें माझ्या समाधासाठीं नी त्याच्याहि समाधासाठीं, बिछान्यावर अशक्त स्थितींत पडल्या पडल्या, पुन्हां पुन्हां तीनदां काढलं होतं ! – प्रत्येक वेळीं दोन दोन दिवस तो त्यासाठीं तळमळला होता !—

मी चित्राची माझी कल्पना त्याला साधारणपणें सांगतांच त्याचे डोळे एकदम चमकले होते; कारण चित्राचा विषयहि एक ध्येयवादी चित्रकारच होता !—

सहा महिन्याच्या अवधीनंतर त्यानें कुंचला जणूं आपल्या चित्रा-साठी जाणूनबुजून हातीं घेतला होता ! तें तयार करण्यासाठीं त्यानें तीनदां सुरवातीपासून शेवटापर्यंत त्रास घेतला होता ! शेवटीं संपूर्ण तयार झाल्यावर माझ्या शेजारींच माझा आधार घेऊन उभें राहिल्या राहिल्या त्यानें तिकडे पाहिलं होतं...



नी त्या अबोल माणसाचे बोलके डोळे पुन्हां एकदां आनंदानें अभिमानानें चमकले होते !—

काय होतं त्या चित्रांत ?—

अफाट विस्तारलेल्या, गजबजलेल्या जगाकडे वरून जणूं आकाशां-तून तो चित्रांत चितारलेला चित्रकार पहात होता ! – हातांतील कुंचला जणूं सुन्न होऊन निश्चलपणें आडवा होऊन जेमतेम जगापर्यंत येऊन भिडला होता ! – चित्रकाराच्या चेहऱ्यावर हजारों भावनांचा झगडा चालला होता...तो विद्रूपच दिसत होता...पण त्याचे चमकणारे डोळे अंतर्मुख होऊन आपल्या हृदयांतील कल्लोळांत तद्रूप झाले होते !...

...आणि जणूं त्याचवेळीं त्याच्या हातांतील कुंचल्यांतून एकच मोठा थोरला अश्रुबिंदू खालच्या जगावर पडत होता !—

" लोक कदाचित् हिडिस म्हणतील कां हो हा चेहरा " मी साशंक स्वरांत म्हणालों.

" हिडिस जगाला सुंदर चेहरे तेवढेच आवडायचे !...स्वतःबद्दल बोला. – तुम्हांला चागलं वाटतंय् ना ? – बस्स् तर..." तो हंसून बिछान्यावर लवंडत म्हणाला; पण त्या हास्यांत खिन्नताच ओतप्रोत भरली होती.

चित्राच्या पैशांचे कांटेतोल हिशेब आम्ही पूर्वी कधींच केले नव्हते. पण त्यावेळीं मात्र त्या मानी मनाला जरूरी होती हें मला ठाऊक होतें... मला फार इच्छा होती...पण दिडकी टाकून वाण्याकडे एखादी वस्तू घेण्यासारखाहि तो प्रसंग सुलभ नव्हता...

मी चित्र घेऊन गपचूप तेथून निघालों...त्यावेळीं खूप विचार नी खूप कल्पना सुचल्या होत्या.

पण माणसाचं मन संकुचित असतं...त्यानंतर पंधरा दिवसांत मी त्याच्याकडे इतर व्यग्रतेमुळें गेलों नाहीं नी कांहीं केलंहि नाहीं. —

शेवटीं एके दिवशीं चिठी घेऊन एक मनुष्य आला.

त्यानेंच लिहिलेली चिठी होती ती. —

त्यांत लिहिलं होतं,...“ कांहीं दिवसांपुरता मी आपला पांच रुपयां-साठीं ऋणी होऊं इच्छितों. -- सवड करा – लौकरच परत करीन—”

––तो चिठीचा कागद ह्मणजे एक नारिंगी रंगाचं चिटोरं होतं !—

आणि आजच्या त्या मनःस्थितींत अनेक प्रसंगपरंपरेनंतर मला एकाएकीं नारिंगी पितां पितां सर्वोत्तमची आठवण झाली. -- कां ! -- कधीं कधीं चालतां बोलतां हसतां खिदळतां माणसाचं मन तत्वज्ञानी होतं. – तें आपल्या आयुष्याचा आढावा घेऊं लागतं...

मी उठून काऊंटरकडे जात असतां मला शेजारींच उभ्या असलेल्या त्या पोराचे मघाचे शब्द आठवले...“ नारिंगी...एकदम थंडा...एकदम अच्छा...साब !—”

त्याची माझी त्यानंतर मृत्यूपूर्वीं एकदांच भेट झाली; मला फार फार आनंद झाला त्यानें म्हटल्याप्रमाणें ऋण फेडलं नाहीं त्याचा...

मीहि त्याच्या चित्राचं ऋण फेडण्याची धडपड कधीं केली नाहीं...

दोघांचींहि एकमेकांकडे ऋणें कायमचीं राहिलीं !

केवढा मोठा मनाला विरंगुळा वाटतो या कल्पनेचा !...

तेवढ्यांतच तो पोऱ्या इराणी शेठकडे पाहून पुन्हां मोठ्यानें ह्मणाला,...“ एक साब...तीन पैसा !...”

मी हंसलों... खिशांतले शेवटचे तीन पैसे तबकडींवर टाकले नी रस्त्यावर उतरतां उतरतां मागें वळून त्या पोराकडे पहात मनाशींच ह्मणालों,....“ तुझाहि ऋणाइत आहे मी पोरा आज !....बस्स ! –नारिंगी एकदम थंडा....एकदम अच्छा !....”

---

तारा : २१ : : “अहंकारी भूतदया”

सांडव्यावर नेहमींच गर्दी आढळते पंचवटींत !...

पण बुधवारचा बाजाराचा दिवस म्हणजे तर तोबा गर्दी !...ठिक-ठिकाणीं धान्याच्या राशीच्या राशी उभ्या असायच्या...बैल सोडलेल्या टपाच्या लांबट गाड्या उभ्या असायच्या...

भाजी बाजारांत टोम्याटो, काकड्या, पपई नी मेथीच्या ‘झाडां’च्या जुड्या...हे ढीग पडलेले एकेका ठिकाणीं !...

घरांतल्या वयस्क संसारी बायका नी कुठं ना कुठं तरी मिरवूं इच्छिणाऱ्या फटाकड्या पोरीहि बाजार करूं लागल्यामुळें आह्मां पुरुषांची साधारणतः सोय चांगलीच व्हायची !

पण कधींतरी आमच्या जिवावरही बाजार बेतायचाच !...त्यावेळीं कपाळाला सत्राशें आंठ्या घालून, भर दहाच्या नाशकी उन्हांत बाहेर पडणं आह्मांला भाग पडावें !...

सांडव्यावरून झुळझुळणाऱ्या गोदा-गंगेच्या पाण्यांत पाय बुडवून कपाळाला गारवा आणीत, आम्हीं पंचवटी गांठावी, मग नारोशंकराच्या घंटेकडून डाव्या बाजूस तोंड फिरवावं...नी थेट रामकुंडापर्यंत भाजीची पहाणी करत धिम्या चालीनें चालूं लागावं !...जणूं काय सारा बाजार खरेदी करायला आम्हीं बाहेर पडलों आहों, हा थाट तोंडावर दिसायचा अशा वेळीं !...

मग माणसांच्या गर्दीइतकीच पाटीवालणींची गर्दी भोंवती जमायची...

'ए भाऊऽऽ'चा आवाज कानावर पडल्यावर आम्ही भोंवतीं आपल्या बहिणी कोण कोण जमल्या आहेत तें पहायला लागावं, तो एक वीस-पंचवीस पाट्या नी त्याखालचीं प्रमदावदनें दिसूं लागत...

कांहीं ढालीसारखे कुंकवाचे टिळे लावलेल्या लेकुरवाळ्या, कांहीं कपाळभर चिरी ओढलेल्या नवोढा, कांहीं बोराएवढ्या कुंकवाच्या नवाळलेल्या पोरसवदा पोरी...

पण साऱ्यांचा जयघोष मात्र एकच..."भाऊऽऽ मी आदी आल्यें बरं का!"

ती आपापसांतील हसत हसत होणारी नंबराची चढाओढ, मारामारी नी शब्दाशब्दी!...मला अधिक कांहीं खरेदी करायची नसली तरी एखादी पाटीवाली ठरवावी अशी मला त्या गोंधळामुळें स्फूर्ती नक्की व्हायची!—

पण मग, जणूं काय, मुलगी पहायलाच आपण गेलों आहों अशा रुबाबानें मी त्या साऱ्यांकडे पाहूं लागे...आणि त्यांतून कोणती निवडावी हा मला मोठा प्रश्न पडे!

तरण्या ताठ्या पोरी! त्या जीवनकलहाच्या धकाधकींत नेहमींच हां हां म्हणतां पुढें येऊन आघाडीवर दिसत!...त्यांच्यामागें लेंकुरवाळ्या, नवळ्या झालेल्या खेडवळ गृहिणी!...आणि त्यांच्यामागें धापा टाकीत असलेल्या, वृद्धत्वाकडे झुकणाऱ्या, सुरकुतल्या तोंडाच्या, पांढऱ्या कपाळाच्या, थरथरत्या मानेच्या गरीब बिचाऱ्या!...

तारुण्याची चटका लावणारी आवड प्रत्येक तरुणाला असते म्हणतात...पण, कां कोण जाणे...मला मात्र त्यावेळीं तारुण्याची मोहिनी खासच पडत नसे!...



असले मनोमय क्षुद्र दृष्टीचे विलास, अभावितपणें मनांत क्षणकाळ अवतरले असतीलहि!...तरी पण त्यांची पकड माझ्या दृष्टीला कायमची मात्र बसत नसे!...

वाटे...मानवी मनाच्या नैसर्गिक हालचाली, या तडफेच्या फटाकड्या तरण्याबांड पोरींना नी त्यांच्या शब्दांतील लाडुक झांकेला माझ्याकडे नाहीं तर दुसऱ्याकडे कोठेंही यशद हात देईल!...त्यांचें कांहीं नुकसान होणार नाहीं माझ्या दुर्लक्षानें!—

मग माझी दृष्टी दुसऱ्या – त्यांच्या मागच्या थराकडे वळे!... संसाराचे टक्के टोणपे खाऊन त्रासलेले काळवंडलेले त्यांचे चेहरे पाहून मला क्षणभर पाटी करावी अशी इच्छा होई!...

पण मग मागला थर दृष्टिपथांत येऊन मी त्यांना हसत हसत ओरडून सांगे, "चला पळा!...एका लिंबासाठीं, दोन मेथीच्या जुड्यांसाठीं नी चार कोथंबिरीच्या काड्यांसाठीं पाटी करायला मी कांहीं कुबेर लागलेलों नाहींय्!...पळा!"

माझ्या त्या उद्गारांनीं पुढले दोन थर माझ्याभोंवतीं अधिकच जवळ जमून कटकट करीत!...पण तिसऱ्या थरांतील एखाद-दुसरी सुरकुत्या पडलेल्या चेहऱ्याची म्हातारी आपली पाटी डोक्यावर टाकून तोंड फिरवूं लागे! – आणि त्यांतून मला दातारपणीचें दुबळें मन डोकावतांना दिसे!...

तेव्हां मात्र लागलीच मी घोषणा करून तिला म्हणें..."ए – ए.... म्हातारे!....चल ये पाटी घेऊन ये तुझी!...."

भोंवतालच्या इतक्या मोठ्या प्रमदावनांतून त्या म्हातारीलाच शेवटीं निवडून काढण्यांतला माझा गाजरपारखी अरसिकपणा – दुसऱ्या कोणाला आवडण्याचा तो प्रश्न नव्हता....मला तरी फार सुखद वाटे तो!—

कोणी भाई ते पहात असता तर म्हणाला असता, "यांत नुसता

अहंपणा नी दुबळी भूतदया आहे तुमची !-–”

पण चालूं समाज-व्यवस्थेंत तरी भूतदया....केवळ भूतदया.... कांहीं गुन्हा तर नव्हे ?....‘आपली उच्च परिस्थिती’ हा अहंपणा त्यांत असला तर त्यांतहि कांहीं चुकल्यासारखं मला वाटत नाहीं !....

पण माझा त्यावेळचा अहंपणा तर त्यापुढेंहि मजल मारी !....त्या–म्हातारीची नुसती निवड झालेली असायची आतांपर्यंत....अजून देण्या-घेण्याचा प्रश्न शिल्लक रहातच असे !....

मग प्रश्नोत्तरें सुरू व्हायचीं....

“मल्हार दरवाजा....काय घेणार ग ? –”

“भाऊऽ....तुमी काय आज पाटी करता ?....द्येता तेवढंच द्या म्हातारीला....”

“तें कांहीं नाहीं !...मागून तुह्मी वांधे करतां...पांच पैसे देईन !–”

“काय भाऊ ?...दोन आने...सात पैस...सा पैस तर खरं ?”

“यायचंय् कां पांच पैशांत ?...”

“बरंऽ ! चल, भाऊ मग !...म्हातारीचं नाय् ऐकत तुमी तवा !...”

ती आपल्या फाटक्या पदरानें आपलं घामाघूम तोंड फुसून पाटी पेलीत पुढें आली कीं मी मनाशीं ह्मणे...“तिचे सात पैसे नी दोन आणे वावगे नव्हते...पण आली कीं नाहीं !”

हा अहंपणा मला त्यावेळीं खरोखरच क्षणभर ग्रासत असे. मी झटपट,...कांहींच नाहींतर शेरभर टोम्याटो, पांच-दहा लिंबें...मेथी, मुळा, कोथंबरीच्या जुड्या घेई, तिच्या टोपलींत टाकी...नी घराकडे परते...



रस्त्यांत उन्हाच्या झळा वाटूं लागल्या कीं माझ्या कंठाला शोष पडे...मग नारोशंकराच्या घंटेजवळच्या रसाच्या दुकानांत बांकावर मी बसकण घेई. म्हातारी बापडी पाटी खालीं ठेऊन दुकानाच्या दारांत थपकल मारी....

रसाचें ग्लास संपवतां संपवतां मी दुकानदाराला अगदीं नैसर्गिकपणें सांगे...“अहो, त्या म्हातारीलाहि अर्धा रस द्या !..”

रस घेऊन तो तिच्याकडे गेला कीं ती प्रथम आढेवेढे घेणार हें ठरलेलं !...पण मग त्यानें पितळेचे दोन पेले भरून ठेवले कीं ती माझ्याकडे चोरून एकदोन कृतज्ञ कटाक्ष टाकीत, आपलं किंचित् बोळकं झालेलं तोंड हलवून रस पिऊन टाके ! – त्यावेळीं मला मनांतल्या मनांत खूप गंमत वाटे नी मीहि माझ्याशींच हळूच हसे !–

मग मिरची, कोथंबीर भरलेली ती टोपली खूप जड आहे अशा मुद्दाम केलेल्या बहाण्यानें मी तिच्या डोक्यावर चढवायची नी तिनें “अरे नको भाऊ, घेईन मी !” असं ह्मणून डोक्यावर ठेवत चालूं लागायचं !...

रस्त्यांत तिच्या ताब्यांत नसलेलीं तिचीं अस्थिर पाउलें वांकडीं तिकडीं पडायचीं नी तिनें पुन्हां पुन्हां घामाघूम झालेला आपला चेहरा पुसायचा !...मी मागें राहून, चालतां चालतां तो गंमतीचा देखावा गपचूप पहात हसायचं ! –

शेवटीं घर गांठल्यावर तिच्या डोक्यावरून टोपली अलगद खालीं उतरायची !...ती जवळजवळ रिती टोपली पाहून चार चार भरलेल्या पिशव्या लोंबकळत स्वतःच घरीं आणणाऱ्या काटकसरी चुलतीच्या डोळ्यांत डोकावतांना दिसणारा राग सोसायचा – नी उलट काकूंना दुधाचा ‘पाणी कम’ चहा करायला सांगायचं !...

पाटीवाली पाय पसरून 'हुश्श' करीत गॅलरींत बसलेली पाहूनहि तिचे पांच पैसे द्यायची टंगळमंगळ करायची ..."उशीर झाला रऽभाऊऽऽ, मला पैस द्ये. –" अशी तिची तीन चारदां झालेली कुरकुर ऐकल्या ऐकल्यावर पितळेचा पेला भरून तिला शेवटीं स्वतः नेऊन चहा द्यायचा !...संकोचानें सुरवातीस 'नको नको' ह्मणून शेवटीं ती तो मिटक्या मारीत पीत असल्याचं लांबून पहायचं नी मग....

"पांच पैसे फार झाले तुला !" असं ह्मणून तिला क्षणभर सौम्य राग आणून तिच्या हातांत प्रथम एक आणा व ती माझ्याकडे किलकिल्या डोळ्यांनीं नी सुरकुतल्या निस्तेज चेहऱ्यानें राग आणण्याचा प्रयत्न करून पाहूं लागली कीं मागून एक आणा अगदीं अचानकपणें व तिला अनपेक्षित असा तिच्या हातांत ठेवायचा !

त्यामुळें ती एकदम दचकली, आनंदली, "ह्मातारा होर भाऊ तूं !" असे आशिर्वादात्मक उद्गार काढून हसली कीं मनांत शेवटचें समाधान मानायचें !...

आधीं कमी किंमत ठरवून तिला नाराज केलेलं ... पै पै सांठवण्यासाठीं कित्येक दिवसांत ती रस प्याली नसेल तो पाजलेला ...घरीं आल्यावर अगदीं दुधाळ चहा तिला मिळालेला ! – नी शेवटीं अगदीं कल्पनाहि नसतांना तिला वर एक आणा मिळालेला ! – या प्रसंगमालिकेंत तिला सर्वप्रकारें अचानक सुख खास मिळालं असेल या कल्पनेनेंच मला खूप सुखसमाधानं वाटायचं !...

नी मग माझी केवळ भूतदया, माझा अहंपणा मला कोरड्या तात्विक शब्दांपेक्षां अधिक अभिमानास्पद वाटूं लागायचा...

व ह्मणूनच मी त्या पाटमोऱ्या हळूंहळूं नाहींशा होणाऱ्या...लौकरच



कायमच्या नाहींशा होणाऱ्या आकृतीकडे किंचित् आर्द्र डोळ्यांनीं पहात उभं रहायचं !...

माझ्या आयुष्याच्या कालखंडांत असले प्रसंग तीनचारदां तरी घडले होते...तीनचार ह्माताऱ्या पाटीवाल्यांची मी अशी न्यारी निवड केली होती...

त्या साऱ्या आतांपर्यंत मातींत मिळाल्या असतील !–

पण त्यांच्या चेहऱ्यावरील त्या त्या वेळचे ते भाव ...नी त्या सुकलेल्या आकृत्या !

माझ्या मनांत अजूनहि त्या भुतासारख्या पुन्हां पुन्हां भरारून जातात !–

---

तारा : २२ : : "ब्रम्हघोटाळा"

हॉटेलांतून आह्मी बाहेर पडतांना संपादकांना मी डिवचलें, "काय महाशय, उच्च दर्जाच्या वाङ्मयसेवेचा जयघोष करतां ! पदरमोड करतां !... नी पुन्हां तुम्हा वाङ्मयसेवकांचे फोटो कांहीं कुठल्या नियतकालिकांत झळकतांना दिसत नाहींत – नाहींतर मघाचा तो 'निर्भीड' मधला त्या ह्यांचा फोटो पहा...."

संपादक वेलणकरांच्या पायऱ्या माझ्या मागून उतरून किंचित् हसले....नी हळूंच ह्मणाले, "अमुक अमुक पेंटर, अमुक अमुक टाइप-

रायटर...चुकलं का हो?...टायपिस्ट नाहीं कां?... हं; असल्या फोटोसह छापल्या जाणाऱ्या जाहिराती तुमच्या डोळ्याखालून गेल्या नाहींत वाटतं अजून? मग या फोटोचेंच कां एवढं कुतूहल वाटलं तुह्मांला?..."

"पण मोठे फरडे आहेत कां हो ते फोटोंतले लेखक?.." मी विचारलें, "तुमच्या वाङ्मयाच्या अंतःपुरांत आमचा तसा विशेष प्रवेश नाहीं ह्मणून विचारतों..."

"ते मघाचे हेच ना? –" संपादक हसले, "फरडे? हो...ह्मणजे खूप लिहितातसं वाटतं बा!...आमच्याकडे उच्च ह्मणून कांहीं बाडें घेऊन आले होते. जरा जड जिभेचे आहेत कीं काय कोण जाणे!...उच्च हा शब्द ते 'हुच' सारखा उच्चारीत होते!..."

"मग खरं होतं कसं?...बोबड्या शब्दासारखं कीं उच्च?... आणि शेवटीं पटला ना तुमचा – त्यांचा सौदा?" मी त्यांच्या खांद्यावर हात ठेऊन सलगीनें गमतींत विचारलें.

"ती फार मोठी कथा... एक रडकथा आहे..." संपादक विषय डावलीत म्हणाले, "रस्त्यांत नको उगीच...भोंवतीं उघडे कान फिरतात! कशाला कोणाला दुखवा...ब्रह्मघोटाळा व्हायचा!.."

माझें कुतूहल अधिकच जागृत झालें. छापलेल्या फोटोमागें मूर्ख-पणाचें किती भांडवल असूं शकतें, याचा मला अनुभव पाहिजेच होता!– तेव्हां मी माझे कान टवकारले.

आम्ही कांदेवाडी मागें टाकून, फुटपाथवर लटकवलेल्या आर. एन्. शिंद्यांच्या डोळ्यांखालून जाऊं लागलें; तसे संपादक सांगूं लागले, "अहो, तें बाड पुढें ठेऊन आपलें नांवगांव सांगूं लागले ते! तेव्हां मी मनांत हाय खाऊनहि वरवर हसून त्यांच्याशी अदबीनें बोलत होतों!—



लौकरच वाचून पहातों असंहि म्हणालों..."

संपादक एकदम सांगण्याच्या रंगांत आलेले पाहून, मीहि ऐकत ऐकत गप्पच चाललों होतों. त्यांचे ते त्यावेळचे हातवारे मला तर अगदीं गंमतीचेच वाटत होते.

"...पण ते कांही ऐकेनात...एक एक कविता पुढें करूं लागले... त्यांनींच गाऊन दाखविल्या असत्या साऱ्या!...पण, 'मी मनांतच वाचतो नेहमी कविता' असं म्हणतांच त्यांनी नाइलाजानें त्या गोष्टीला संमति दिली! राधा मुरली, कृष्ण...ब्रह्म...सत्...चित्...आनंद...बस्स!... माझें डोकें गरगरत होतं! आकाशाच्या पोकळींत हजारो योजने वर उडत गेलों मी..नी शेवटीं हातांतलें बाड खालीं गळून पडण्यापूर्वीच भानावर येऊन मी अत्यंत संकोची, लाचार चेहरा करून म्हणालों, 'एक्स्क्यूऽऽऽज हं! यांतली एकहि आम्हाला वापरतां येणार नाहीं!'"

संपादक रंगले होते.... मुरली...कृष्ण–ब्रह्माच्या घोटाळ्यांत ते पोहल्याप्रमाणें वरखालीं हात करीत होते.

मी तेवढ्यांत म्हणालों, "मग पुढें?"

"पुढं काय?.." संपादक खूप मोठ्यानें हसून म्हणाले, "त्यांनी आपलं बाड बांधलं––पण मग खिशांतून एक 'अमुकतनया' सहीची नवीन कविता काढून ते म्हणाले, 'आज सकाळीं गुणगुणली, दुपारीं लिहिली नी ही आतां पुढें आहे तुमच्या!...' काय तो त्यांचा काव्यमय काव्यानंदी आवेश...अगदीं पिस्तुलाप्रमाणें धरून, माझ्या अंगाकडे ती करीत ते मला म्हणाले,... बघा!... ही तरी आतां पसंत आहे कां आतां? अं ऽ'..."

पण आवेशानें बोलतां बोलतां संपादक नी मग मीहि विजेचा धक्का बसल्याप्रमाणें दचकलों. बोलणें तसेंच अर्धवट टाकून रेडिओंतली वीज एकदम गेल्याप्रमाणें पटकन् थांबलों !...

कारण समोर अगदीं ब्रह्मघोटाळाच झाला होता!...

संपादकांनी 'ही तरी पसंत आहे कां?' असें हावभावासह रंगून म्हणायला...नी समोरून येणाऱ्या एका तरण्या जोडप्यापैकीं, अस्मानी पातळाच्या, निळी फीतवाल्या शेपट्याच्या, शेडिंगवाल्या ब्लाउजच्या, काळ्या उंच चपलांच्या, मंगळसूत्रधारी तरुणीनें त्यांच्या हातासमोरच यायला....अगदीं थेट एक गांठ झाली होती!...

संधिप्रकाशानें दिशा धूसर झाल्या होत्या नी मुगभाटासमोरील मांगलवाडीच्या ओसाड माळरानासमोर आम्ही आमचीं पावलें चोरासारखीं उचलत होतों.

दोघांनी आपापले कासावीस झालेले जीव कसेबसे मुठींत धरले नी कांहीं एक झालेंच नाहीं अशा बतावणीनें चालणं चालूंच ठेवलं.

चारपांच पावलें चालल्यावर संपादक हळूंच माझ्या कानाशी पुटपुटले, "कांहो? खरोखरच ब्रह्मघोटाळा झाला कीं! चप्पलाचप्पलीचाच प्रसंग आहे हा!.."

मी चोरट्या नजरेनें हळूंच मागें वळून पाहिलें. तें जोडपेंहि मागें मान करून आमच्याकडे पहात होतें...मीहि झटकन् माझी मान वळवून सिधी केली नी हळूंच संपादकांना म्हणालों, "महाराज, अजून आपण त्यांच्या दृष्टीच्या डेंजर झोन मध्येंच आहों!... पाउलें उचला झपाझप!.. समजुतीच्या घोटाळ्यानें नाहीं तो सीन व्हायचा भर गिरगांवांत..."



माझ्या म्हणण्याप्रमाणें भरभर पावलें टाकीत 'समर्थ वॉच कंपनी' समोर येईतों संपादकांनीं दोनदां मागें वळून पहात मला एकदां म्हटलें, "कां हो?.. तीं दोघें तर अजूनहि रेंगाळत रेंगाळत मागें वळून आपल्याकडेच पहात आहेत!.. ती त्याच्याबरोबर कांहींतरी कुजबुजत आहे!.. स्फूर्तिदेवता आहे त्या जवानमर्दाची ती!... येगार कां हो कसला प्रसंग?.. तेंच नसेल ना त्याचं चाललेलं बोलणं..."

"पाहूं नका मागें!... व्हायचं तें होईल...गप्प चला आपले तुम्ही!" मी संपादकांना म्हणालों.

तेवढ्यांत मागून आवाज आला; "शुक् शुक्, शुक् शुक्..."

आणि टाळ्याहि वाजल्या मोठ्यामोठ्यानें...

धोरण ओळखून मागें न पहातांच संपादक मला पुटपुटले, "आतांऽऽ होऽऽ!?.. भरली कंभक्ति—"

पुन्हां मागून टाळ्या वाजल्या; नी शुक् शुक् झालं.

शेवटीं मी थांबून सात्विक संतापानें म्हणालों, "चला...काय व्हायचं तें होऊं द्या!— सोक्षमोक्ष करून टाका प्रथम!... आम्हालाहि घरीं आयाबहिणी आहेत! नी आमचेहि हात कांहीं कांदे खायला गेलेले नाहींत..."

आम्ही ऐवढे बोलून पुन्हां धीर एकवटला नी तोंडें फिरवलीं.

तीं दोघें थांबलीं होतीं!.. आम्हाला तोंडें फिरवलेलीं पहातांच, तीं आमच्या दिशेनें चालत येऊं लागलीं.

काळोख झाला होता. पुढल्या भानगडीच्या कल्पनेनें तो अधिकच दाटला होता!.. आम्हीहि न बोलतां त्यांच्याजवळ जायला पावलें टाकीत

होतों !–

जणूं काय, एकमेकांवर बंदुका रोखून जुन्या काळचं द्वंद्व युद्ध सुरूं झालें होतें आतां!...

तेवढ्यांत एका दिव्याखालीं दोघांची समोरासमोर भेट झाली!..

आम्ही काय काय बोलायचं...कसं समर्थन करायचं...कसं स्पष्टीकरण करायचं...याचा मनोमय विचार करीत होतों!–

प्रामाणिक माणसांनाच जगांत जास्त दुःखें असतात, असं मला त्यावेळीं वाटल्यावाचून राहिलं नाहीं!...

तेवढ्यांत समोरच्या जोडप्यांतला 'तो' संपादकांना म्हणाला, "काय हो?"

मी आतां पुढलं सारं कोसळणारं किटाळ कल्पनेनें तयार करीत होतों....

तेवढयांत तो पुढें म्हणाला, "वाः वाः! बरेच दिसतां कीं! किती शुकूशुक् करायचं ?..."

मी जिवाचे कान केले!..

"अगदीं आपल्या रंगांतच होतां!.. खूप हाका मारल्या मी, सारख्या तुम्हाला! एवढं काय बोलत होतां अं ऽ?" तो पुन्हां म्हणाला.

मारामारीचा सिग्नलच होता तो. मी हात सांवरले नी संपादकांकडे पाहिलें...पण त्यांचा चेहरा पालटलेला दिसत होता.

तोंच त्या जोडप्यांतला 'तो' पुढें म्हणाला, वा वा ऽ! संपादक, आमच्या लग्नाला आमंत्रण पाठवलं!.. आलां नाहीं शेवटीं! हो, कामाचीं माणसं तुम्ही!.. आतां काल्च आलों गोव्याहून... हिला घेऊन! उद्यां सवडीनें येणारच होतों आम्ही दोघेहि! पण चालतां चालतां ही म्हणाली..



'ते पहा तुमचे मित्र चालले आहेत!' हिला पहायला गेलों होतों तेव्हां एकदांच तुम्ही माझ्याबरोबर होतां! पण तेवढ्यावर सुद्धां हिनें ओळख ठेवली पहा!– आणि तुम्ही अगदीं आपल्याच..." अर्धवट लाजत अर्धवट हसत त्याची नवपरिणीता अद्बीनें जवळच उभी होती.

आपला जीव खालीं पडला म्हणून मी मोठा सुस्कारा टाकला.

संपादक माझ्याबरोबर वागण्याइक्याच खेळीमेळीनें त्यांच्याकडे हसत बोलत होते!

मी साऱ्यांकडे आलटून पालटून टकमका पहात राहिलों...

मला वाटलं, 'त्या मद्याच्या त्या कवीला याच प्रसंगावर एखादी 'ब्रह्मघोटाळा' म्हणून कविता.....'

## रघुवीर सामंत

यांचीं

विविध प्रकारचीं सोज्वल कलात्मक पुस्तकें

मंगलप्रसंगीं लहानथोरांना भेट द्या.

सुंदर कलात्मक गोष्टी.

**१ वाळूंतील पाउलें**

पृष्टें १६० : अँटिक पेपर

सुंदर कव्हर

**मूल्य १। रु.**

आजच्या जमान्याच्या

सांघिक व इतर कविता

**३ आजचीं गाणीं.**

पृष्टें १२४ :अँटिक पेपर :

सुंदर कव्हर व आकार

मूल्य ९ आणे.

स्निग्ध व अभिनव निबंध.

**२ पणत्या.**

पृष्टें : १०६ : अँटिक पेपर

:सुंदर कव्हर

**मूल्य १५ आणे**

समाजांत आढळणाऱ्या

'अ–सामान्य' व्यक्तींच्या

अंतरंगांचे अभिनव आलेख

**४ मासलेवाईक प्राणी**

(स्वभाव–चित्रें

पृष्टें १०६ : अँटिक पेपर

कार्टून कव्हर, मूल्य १रु.

महाराष्ट्रांतील पहिलीच अभिनव प्रदीर्घ कादंबरी

## उपकारी माणसें

| खंड १ ला | खंड २ रा | खंड ३ रा |
|---|---|---|
| प्रवासांतील सोबती | अभ्र–पटल | आकाश–गंगा |
| (मूल्य २। रु.) | (मूल्य २। रु.) | (मूल्य २॥ रु.) |

ओळखीच्या वातावरणांतून फिरल्यासारखें वाटतें; पानोपान विविध भावनांनी हृदय उचंबळून येतें.

पारिजात प्रकाशन : ७ मॅथ्यू रोड : मुंबई ४.


### 'तारांगणा'कडे

## दृष्टिक्षेप

१९३२ सालीं माझें 'हृदय' पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर, 'शब्द-चित्र' हा एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार गणून तो रूढ करण्याचें कांहीं श्रेय मला कांहीं रसिकांनीं दिलें, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

त्यानंतर माझ्या हातून मराठी वाङ्मयाची जी थोडीफार सेवा झाली, तिला मी तरी फक्त विविध प्रकारचे प्रयोग या दृष्टीनेंच काय ती किंमत देतों. लघुकथा, काव्य, लघुनिबंध, प्रदीर्घ कादंबरी अशा-रीतीनें, स्वतः मोठासा अभ्यासू तांत्रिक नसूनहि, कलेचे निरनिराळे प्रकार या अवधींत मी हाताळून पाहिले. माझ्या कांहीं लघुकथा मलाहि आवडतात पण म्हणून मी लघुकथेंत अजून यशस्वी झालों आहें, असें मला म्हणवत नाहीं. केवळ कवन करून पहावें म्हणून दहा-पंधरा दिवस त्यामागेंच लागून मी कांहीं पद्यरचना केली; पण ओबड-धोबड सांघिक गाणीं नी पद्यात्मक शब्दचित्रें या कक्षेबाहेर ती विशेषतः गेली नाहीं असेंच मलाहि वाटतें. मी लघुनिबंध लिहून पाहिले. तो प्रकार मला माझ्या मनोवृत्तीस साजेसाहि वाटला; पण माझ्या लघुनिबं-धांना दीर्घ निबंधांचें स्वरूप आलें. त्यांतहि मला शब्दचित्रांचाच भरणा दिसूं लागला. प्रदीर्घ कादंबरी लिहिली; ती दुसऱ्या कोणत्या दृष्टीनें महत्वपूर्ण ठरो न ठरो – तींतहि जागोजाग शब्दचित्रेंच विखुरलेलीं मला दिसतात. कदाचित् यामुळेंच ती कादंबरी थोडीफार तुटक वाटणें साहजिक आहे, अशी माझी समजूत आहे.

पण मुख्य म्हणजे ज्या माझ्या शब्दचित्रांचें रसिकांनीं सुरवातीस स्वागत केलें, त्या प्रकाराला स्वतंत्रपणें मी गेल्या आठ वर्षांत पुन्हां हात लावला नाहीं. यावद्दल कित्येकांनीं माझी आतांपर्यंत कानउघाडणी केली व मलाहि तें कांहीं अंशीं पटलें; आणि ह्मणूनच आतां मध्यें कांहीं शब्दचित्रात्मक स्वतंत्र वाङ्मय लिहावें ही इच्छा मनांत आली.

शब्दचित्रें पुन्हां लिहावींत ही इच्छा नि लघुनिबंधाला पोषक अशी माझी मनोभूमिका या दोहोंचा परिणामीं समन्वय होऊनच, आज रसिकांच्या हातीं पडत असलेलें हें लिखाण तयार झालें.

एखादी घटना चित्रात्मक पद्धतीनें रंगवितांना आपलीं तदनुषंगानें येणारीं मतें, आवडीनिवडी मनांत डोकावतात व तींहि कलाकृतींत प्रतिबिंबित करावींत, असें वाटतें. ही खेळकर लघुनिबंधाच्या थाटाची वैयक्तिक 'मतप्रचारी' झांक, त्यांत कित्येक वेळां सूचक तर कित्येकदां स्पष्ट प्रतिबिंबित होते, आणि यामुळेंच तें लिखाण 'शब्दचित्र' किंवा 'लघुनिबंध' दोन्ही जातींत निर्भेळपणें टाकावेसें वाटत नाहीं, ह्मणूनच मला त्याला 'चित्रबंध' हें सहज सुचलेलें नांव द्यावेसें वाटलें.

'चित्रबंध' हें जुन्या वाङ्मयांत निराळ्या अर्थाच्या वाङ्मयप्रकाराला अगर अलंकाराला नांव आहे कीं काय हें मला नक्की माहीत नाहीं. अशाप्रकारचें वाङ्मय आपल्या सध्यांच्या प्रसिद्ध वाङ्मयांतून माझ्या फारसें पहाण्यांत नाहीं. इंग्रजी वाङ्मयांतहि लघुतम कथांची गोष्ट सोडली तर असा कांहीं प्रकार माझ्या तरी मर्यादित अवलोकनांत नाहीं. मी स्वतः तांत्रिक नसल्यामुळें हा निराळा वाङ्मयप्रकार होईल कीं काय मी सांगूं शकत नाहीं, आणि तसा तो व्हावयास



तंत्रदृष्ट्या त्यांत कांहीं फेरफार, अधिक उणें शक्य आहे, जरूर आहे हेंहि मला येथें सुचवावयाचें नाहीं. तें काम लायक टीकाकारांचें आहे.

मी मात्र या पुस्तकांतील लिखाणाला 'चित्रबंध' ह्मणत आहें. कारण त्यांत लघुनिबंधाचा खेळकर मोकळेपणा नि शब्दचित्राचा हुबेहूबपणा यांचा सुंदर मिलाफ असूं शकेल असें मला वाटतें. ह्मणूनच त्यांत त्रोटकपणा, सूचकता, कलात्मकता यांचा योग्य उपयोग करून, केवळ शब्दचित्र किंवा केवळ लघुनिबंध यांपेक्षा अधिक समाधानकारक पद्धतीनें आपल्याला एखादी घटना रंगवितां येईल. मला स्वतःला तर हें एकप्रकारचें मिश्रण फारच आल्हाददायक वाटलें. कदाचित् यामुळेंच मी हे सारे चित्रबंध जवळजवळ बारा दिवसांत लिहूं शकलों. या पुस्तकांतील 'तारां'पैकीं सगळ्यांनाच निर्भेळ 'चित्रबंध' म्हणतां येणार नाहीं हें सांगणें येथें जरूर आहे.

'लघुनिबंध' ह्मणजे मित्रत्वाच्या, खेळकर, भावनारम्य, विचारशील गप्पा ह्मणतां येईल. 'शब्दचित्रां'त एका विशिष्ट बिंदूभोंवतीं केलेलें निरीक्षणात्मक चित्रण असेल; पण मला वाटतें, या पुस्तकांतील लिखाणाच्या धर्तीवरच्या 'चित्रबंधां'त – मुख्यतः शब्दांत काढलेल्या चित्राकरवीं व त्याच्या खेळकर पार्श्वभूमीचित्रणाकरवीं एखाद्या अनुभवावर अत्यंत सूचक प्रकाश-झोत पाडण्याचा एक मनोरंजक व कलात्मक प्रयत्न असूं शकेल. थोडक्यांत, लेखकाला आपल्या मनाचा एखादा सूक्ष्म कप्पा एखाद्या चित्रांत बांधून सूचक पद्धतीनें आपल्या वाचकांसमोर मांडावयाचा असेल तर तेथें शब्दचित्रापेक्षां किंवा लघुनिबंधापेक्षां त्याला 'चित्रबंधा'चाच आश्रय करावा लागेल, असें मला प्रांजलपणें वाटतें.

एखादा नवा वाङ्मय–प्रकार आपण शोधून काढला आहे,

अशाप्रकारचा हा कांहीं उद्धट अभिनिवेश आहे असें रसिकांनीं समजूं नये. याप्रकारच्या लिखाणांत कांहींतरी नाविन्य आहे अशी मला शंका आहे. आणि तसें तें खरोखरच असल्यास अभ्यासू रसिक टीकाकारांनीं त्याला योग्य दिशा व स्थैर्य आणून द्यावें, अशा हेतूनेंच हें नम्र निवेदन होय.

तथापि, या पुस्तकांतील लिखाणाला कांहींहि नांव दिलें तरी माझ्या सर्व रसिक वाचकांचें तें सात्विक कलापूर्ण मनोरंजन करील, अशी मात्र मला पूर्ण खात्री वाटते. आणि या पुस्तकाचा शालेय स्थूल वाचन म्हणूनहि उत्तमप्रकारें उपयोग करतां येईल, असें मला शिक्षक या दृष्टीनें वाटतें.

विनम्र,

**रघुवीर सामंत.**

७ मॅथ्यूरोड, मुंबई ४. २४-१२-४०

---

# रघुवीर सामंत बी. ए. बी. टी.

शब्दचित्र हा नवीन वाङ्मयप्रकार महाराष्ट्रांत प्रामुख्यानें रूढ करणारे "**कुमार रघुवीर**" १९३० सालापासून मराठी वाचकांना सुपरिचित आहेत. १९३२ सालीं 'हृदय', १९३४ सालीं 'वाळूतील पाउलें', १९३५ सालीं 'सुरंगीची वेणी', अशीं त्यांचीं कथा व शब्दचित्रात्मक पुस्तकें प्रसिद्ध झालीं. याच कालखंडात त्यांनीं आपलं रसिकप्रिय 'पारिजात' मासिक चालविलें होतें.

त्यानंतर त्यांची अभिनव प्रदीर्घ कादंबरी **उपकारी माणसें** 'पारिजात प्रकाशन' संस्थेतर्फे, 'प्रवासांतलि सोबती' (१९३८) अभ्रपटल' (१९३९), 'आकाशगंगा' (१९४०) अशा तीन स्वतंत्र खंडांत, प्रसिद्ध झाली. ही सुमारें डेमी ८०० पानांची कादंबरी अनेक दृष्टीनें नाविन्यपूर्ण झाली आहे.

१९३९ सालीं सुरवातीस 'हिज मास्टर्स व्हाइस'तर्फे त्यांच्याच कवितांची त्यांचीं दोन रेकॉर्डस् प्रसिद्ध झालीं. व त्यानंतर आजच्या समाजस्थितीची व आजच्या समाजभावनांची वास्तववादी चित्रें असलेलीं, गेय व सांघिक स्वरुपाच्यीं त्यांचीं "आजचीं गाणीं" प्रसिद्ध झालीं. १९३९ मध्येंच "पणत्या" हें स्निग्ध लघुनिबंधाचें त्यांचें दुसरें पुस्तक प्रसिद्ध झालें.

१९४० मध्यें 'मासलेवाईक प्राणी' हा त्यांचा स्वभाव चित्रांचा संग्रह निघाला. जानेवारी १९४० पासून 'ज्योति' नांवाचें मासिक ते चालवीत आहेत.

प्रस्तुत 'तारांगण' नंतर '[illegible]' ही त्यांची मनोविश्लेषणात्मक कादंबरी लौकरच प्रि[illegible]

—प्रकाशक